# संत मत्तय ह्याचे शुभवर्तमान

१ अब्राहामाचा पुत्र, दाविदाचा पुत्र येशू ख्रिस्त
ह्याच्या वंशावळीची नोंद:

२अब्राहाम इसहाकाचा जनक, इसहाक याकोबाचा
जनक आणि याकोब यहुदाचा व त्याच्या भावांचा जनक
झाला.

३यहुदाला तामारेपासून पेरेस व जेरह झाले; पेरेस
हेसरोनाचा जनक आणि हेसरोन आरामाचा जनक झाला.

४आरामाला अम्मिनादाब झाला; अम्मिनादाब
नहशोनाचा जनक झाला आणि नहशोन सलमोनाचा जनक
झाला.

५सलमोनाला रहाबेपासून बवाज झाला; बवाजाला
रूथेपासून ओबेद झाला आणि ओबेद इशायाचा जनक
झाला.

६इशाय दावीद राजाचा जनक झाला; आणि
दाविदाला जी पूर्वी उरियाची बायको होती तिच्यापासून
शलमोन झाला.

७शलमोन रहबामाचा जनक, रहबाम अबियाचा
जनक आणि अबिया आसाचा जनक झाला.

८आसाला यहोशाफाट झाला; यहोशाफाट हा
योरामाचा जनक आणि योराम उज्ज्ञियाचा जनक झाला.

९उज्ज्ञिया हा योथामाचा जनक झाला; योथाम
आहाजाचा जनक आणि आहाज हिजकियाचा जनक
झाला.

१०आणि हिजकिया मनश्शेचा जनक, मनश्शे
आमोनाचा जनक आणि आमोन योशियाचा जनक झाला.

११आणि त्यांना बाबेलात नेले त्यावेळी, योशिया हा
यखन्याचा व त्याच्या भावांचा जनक झाला.

१२आणि त्यांना बाबेलास आणल्यावर यखन्याला
शलतिएल झाला आणि शलतिएलाला जरुब्बाबेल झाला.

१३आणि जरुब्बाबेल अबिहुदाचा जनक झाला;
अबिहूद हा एल्याकिमाचा जनक आणि एल्याकीम हा
अज्ज़ुराचा जनक झाला.

१४आणि अज्ज़ुर हा सादोकाचा जनक झाला; सादोक
हा याखिमाचा जनक आणि याखीम हा एलिहुदाचा जनक
झाला.

१५एलिहूद एलाजराचा जनक, एलाजर मत्तानाचा
जनक आणि मत्तान याकोबाचा जनक झाला.

१६आणि याकोब योसेफाचा जनक झाला.
जिच्यापासून ख्रिस्त म्हटलेला येशू जन्मला त्या मरियेचा
हा पती.

१७अशा प्रकारे सर्व पिढ्या: अब्राहामापासून
दाविदापर्यंत चौदा पिढ्या, दाविदापासून बाबेलात नेईपर्यंत
चौदा पिढ्या आणि बाबेलात नेल्यापासून ख्रिस्तापर्यंत
चौदा पिढ्या.

१८आता, येशू ख्रिस्ताचा जन्म अशा प्रकारे झाला:
त्याची आई मरिया ही योसेफाला वाग्दत्त झाली होती
तेव्हा, दोघे एकत्र येण्याअगोदर, ती पवित्र आत्म्याकडून
गरोदर असल्याचे दिसून आले; १९तेव्हा तिचा पती योसेफ
हा नीतिमान मनुष्य असल्यामुळे त्याला तिचा लोकांत
अपमान करणे बरे वाटले नाही, आणि त्याने तिला गुप्तपणे
सोडण्याचा विचार केला. २०आणि तो ह्या गोष्टीवर विचार
करीत असता, बघा, परमेश्वराचा दूत त्याला स्वप्नात
प्रगट झाला आणि त्याला म्हणाला,
"दावीदपुत्र योसेफा, तू आपली पत्नी मरिया हिला
आपल्याकडे आणायला भिऊ नको, कारण तिच्या पोटी
जो गर्भ राहिला आहे तो पवित्र आत्म्याकडून आहे.
२१तिला पुत्र होईल, आणि तू त्याचे येशू हे नाव ठेव.
कारण तो आपल्या लोकांना त्यांच्या पापांपासून तारील."
२२हे सर्व ह्यासाठी झाले की, प्रभूने संदेष्ट्याकडून जे
सांगितले होते ते पूर्ण व्हावे. त्याने असे म्हटले आहे की,

२३'बघा, कुमारी गर्भवती होईल,
तिला पुत्र होईल,
आणि त्याला इम्मानुएल हे नाव देतील.'

ह्याचा अर्थ 'आमच्याबरोबर देव' असा आहे.
२४मग योसेफ झोपेतून उठल्यावर त्याने
परमेश्वराच्या दूताने त्याला सांगितल्याप्रमाणे केले आणि
आपल्या पत्नीला आपल्याकडे आणले २५आणि ती
आपल्या पुत्राला जन्म देईपर्यंत त्याचा तिच्याशी संबंध
नव्हता. आणि त्याने त्याचे येशू हे नाव ठेवले.

२ आता, हेरोद राजाच्या दिवसांत, यहुदियातील
बेथलेहेमात येशू जन्मल्यानंतर, बघा, पूर्वेकडून
यरुशलेमला मागी लोक आले; [२]आणि ते विचारू लागले,

"यहुद्यांचे राजे जन्मले आहेत ते कुठं आहेत? कारण आम्ही पूर्वेस त्यांचा तारा बघितला आणि आम्ही त्यांना नमन करायला आलोत."

[३]हेरोद राजाने हे ऐकले तेव्हा तो अस्वस्थ झाला;
आणि त्याच्याबरोबर सर्व यरुशलेमही अस्वस्थ झाले.
[४]मग त्याने लोकांच्या वरिष्ठ याजकांना व शास्त्र्यांना
एकत्र जमवून विचारले,

"ख्रिस्त कुठं जन्मला पाहिजे?"

[५]आणि ते त्याला म्हणाले,

"यहुदियातील बेथलेहेमात; कारण संदेष्ट्यानं असं
लिहिलं आहे, [६]'आणि तू बेथलेहेमा, यहुदाच्या प्रांता, तू
यहुदाच्या सरदारांत मुळीच कनिष्ठ नाहीस, कारण
तुझ्यामधून एक अधिपती येईल, आणि तो माझ्या
राष्ट्राचा, इस्राएलाचा मेंढपाळ होईल.' "

[७]मग हेरोदाने त्या मागी लोकांना एकान्ती बोलवून,
तो तारा दिसल्याचा काळ त्यांच्याकडून काळजीपूर्वक
विचारून घेतला [८]व त्याने त्यांना बेथलेहेमला धाडले व
म्हटले,

"जा आणि मुलाचा नीट शोध करा आणि तुम्हाला शोध लागल्यावर मला निरोप द्या, म्हणजे मीही येऊन त्याला नमन करीन."

[९]राजाचे ऐकल्यावर ते निघाले, आणि बघा, त्यांनी
पूर्वेस बघितलेला तारा, मूल होते तेथे येऊन, वर थांबेपर्यंत
त्यांच्या पुढे जात राहिला. [१०]आणि त्यांनी तो तारा
बघितला तेव्हा त्यांना फार मोठा आनंद होऊन ते आनंदित
झाले.

[११]आणि ते घरात आले, आणि त्यांनी मुलाला
त्याच्या आईजवळ म्हणजे मरियेजवळ बघितले, तेव्हा ते
पालथे पडले व त्यांनी त्याला नमन केले. आणि आपल्या
थैल्या उघडून त्यांनी त्याला सोने, ऊद व बोळ ह्या देणग्या
अर्पण केल्या. [१२]आणि त्यांनी हेरोदाकडे परत जाऊ नये
म्हणून त्यांना स्वप्नात सूचना मिळाल्यामुळे ते दुसऱ्या
मार्गाने आपल्या देशाकडे गेले.

[१३]आणि ते गेल्यानंतर, बघा, परमेश्वराचा दूत
योसेफाला स्वप्नात प्रगट झाला व त्याला म्हणाला,

"ऊठ, मुलाला आणि त्याच्या आईला बरोबर घेऊन मिसरात पळून जा, आणि मी तुला सांगेन तोपर्यंत तिथं रहा; कारण ह्याला नष्ट करायला हेरोद ह्या मुलाचा शोध करील."

[१४]तो उठल्यावर, त्याने रात्री, मुलाला आणि त्याच्या
आईला बरोबर घेतले आणि तो मिसरात गेला. [१५]आणि
हेरोदाच्या मृत्यूपर्यंत तो तेथे राहिला; म्हणजे, प्रभूने
संदेष्ट्याकडून जे सांगितले होते ते पूर्ण व्हावे. त्याने असे
म्हटले आहे की,

'मी माझ्या पुत्राला मिसरातून बोलावले आहे.'

[१६]मग, मागी लोकांनी आपल्याला चिडवले हे
हेरोदाने बघितले तेव्हा तो फार संतापला, आणि त्याने
मागी लोकांकडून काळजीपूर्वक विचारून घेतलेल्या
काळाप्रमाणे बेथलेहेमात व त्याच्या सभोवतालच्या सर्व
प्रांतात माणसे पाठवून दोन वर्षे व खालील वयाच्या
सगळ्या मुलांना ठार मारले. [१७]तेव्हा यिर्मया संदेष्ट्याच्या
द्वारे जे सांगितले होते ते पूर्ण झाले; त्याने असे म्हटले आहे
की,

[१८]'रामात रडण्याचा आणि मोठ्या आक्रोशाचा
आवाज ऐकू आला;
राहेल आपल्या मुलांसाठी रडत आहे
आणि सांत्वन करून घेऊ इच्छीत नाही
कारण ती नाहीत.'

[१९]पण हेरोद मेल्यानंतर, बघा, परमेश्वराचा दूत
मिसरात योसेफाला स्वप्नात प्रगट झाला [२०]व त्याला
म्हणाला,

"ऊठ, आणि मुलाला आणि त्याच्या आईला बरोबर घेऊन इस्राएलाच्या देशात जा; कारण मुलाचा जीव घेऊ पाहणारे मेले आहेत."

[२१]तेव्हा तो उठला, त्याने मुलाला व त्याच्या आईला
बरोबर घेतले व तो इस्राएलाच्या देशात आला. [२२]पण
जेव्हा त्याने ऐकले की, यहुदियात अर्खेलाव हा त्याचा
बाप हेरोद ह्याच्या जागी राज्य करीत आहे, तेव्हा तो
तिकडे जायला भ्याला; पण स्वप्नात सूचना मिळाल्यामुळे
तो गालिलाच्या भागात गेला; [२३]आणि नासरेथ नावाच्या
गावी येऊन राहिला. म्हणजे 'त्याला नासोरी म्हणतील' हे
संदेष्ट्यांकडून सांगितले होते ते पूर्ण व्हावे.

३ त्या दिवसांत बाप्तिस्मा करणारा योहान हा
यहुदियाच्या रानात घोषणा करीत येतो, [२]आणि
म्हणतो, 'पश्चात्ताप करा, कारण स्वर्गाचं राज्य जवळ
आलं आहे.'

[३]कारण,

'रानात ओरडणाऱ्याचा आवाज:
प्रभूचा मार्ग तयार करा,
त्याच्या वाटा नीट करा',

असे म्हणून ज्याच्याविषयी यशया संदेष्ट्याकडून
सांगितले होते तो हा होय.

[४]हा योहान उंटाच्या केसांचा झगा वापरी व त्याच्या
कमरेभोवती कातड्याचा कमरबंद असे; आणि टोळ व
रानमध हे त्याचे अन्न होते. [५]तेव्हा यरुशलेम आणि सर्व
यहुदिया व यार्देनेच्या आसपासचा सर्व प्रांत त्याच्याकडे
आला [६]व त्यांनी आपली पापे कबूल करून त्याच्याकडून
यार्देन नदीत बाप्तिस्मा घेतला.

[७]पण जेव्हा त्याने परोश्यांपैकी व सदोक्यांपैकी
पुष्कळ जणांना त्याच्या बाप्तिस्म्यासाठी येताना बघितले
तेव्हा तो त्यांना म्हणाला,

"अहो तुम्ही सर्पिणीच्या पिलांनो, येणाऱ्या
क्रोधापासून पळायला कोणी तुम्हाला सावध केलं? [८]तर
पश्चात्तापाला शोभतील अशी फळं द्या [९]आणि अब्राहाम
आमचा पिता आहे असं आपल्या मनात म्हणायचा विचार
करू नका. कारण मी तुम्हाला सांगतो की, देव ह्या
दगडांमधून अब्राहामाची मुलं उठवायला समर्थ आहे.

[१०]"आणि आताच झाडांच्या मुळाशी कुऱ्हाड
ठेवलेली आहे; म्हणून जे चांगलं फळ देत नाही असं
प्रत्येक झाड तोडून अग्नीत टाकलं जाईल.

[११]"मी तर, पश्चात्तापासाठी, तुमचा बाप्तिस्मा
पाण्यानं करतो; पण माझ्या मागून जो येणार आहे तो
माझ्यापेक्षा समर्थ आहे; मी त्याच्या वहाणा उचलायला
लायक नाही. तो तुमचा बाप्तिस्मा पवित्र आत्म्यानं आणि
अग्नीनं करील. [१२]त्याच्या हातात त्याचं सूप आहे; तो
आपलं खळं नीट स्वच्छ करील, आणि आपले गहू
कोठारात साठवील पण भूस तो न विझणाऱ्या अग्नीत
टाकील."

[१३]मग येशू योहानाकडून बाप्तिस्मा घ्यायला
गालिलातून यार्देनेकडे येतो. [१४]पण त्याने त्याला
अडवल्यावर म्हटले,

"मलाच तुझ्याकडून बाप्तिस्मा घ्यायची गरज आहे;
आणि तूच माझ्याकडे येतोस?"

[१५]पण येशूने उत्तर देऊन त्याला म्हटले,

"आता येऊ दे; कारण, आपण असं सर्व न्यायीपण
पूर्ण करावं हे उचित आहे."

मग त्याने त्याला येऊ दिले. [१६]आणि येशूचा बाप्तिस्मा
होताच तो सरळ पाण्यातून वर आला; आणि बघा,
आकाश उघडले आणि त्याने बघितले की, देवाचा आत्मा
कबुतरासारखा उतरत त्याच्यावर येत होता. [१७]आणि,
बघा, आकाशातून एक वाणी म्हणाली,

'हा माझा प्रिय पुत्र आहे,
ह्याच्याविषयी मी संतुष्ट आहे.'

४ त्यानंतर सैतानाकडून येशूची परीक्षा व्हावी
म्हणून आत्म्याने त्याला रानात नेले. [२]आणि त्याने
चाळीस दिवस व चाळीस रात्री उपास केल्यावर, त्याला
त्यानंतर भूक लागली. [३]आणि परीक्षक येऊन त्याला
म्हणाला,

"तू जर देवाचा पुत्र आहेस तर ह्या दगडाच्या भाकरी
व्हाव्यात म्हणून आज्ञा कर."

[४]पण त्याने उत्तर देऊन म्हटले,

" 'मनुष्य केवळ भाकरीने नाही, पण देवाच्या
मुखातून निघणाऱ्या प्रत्येक शब्दाने वाचेल' असं लिहिलं
आहे."

[५]तेव्हा सैतान त्याला पवित्र नगरात नेतो; मग त्याने त्याला
मंदिराच्या एका वरच्या टोकावर उभे केले, [६]आणि तो
त्याला म्हणतो,

"तू जर देवाचा पुत्र आहेस तर खाली उडी टाक;
कारण असं लिहिलं आहे की, 'मी तुझ्याविषयी आपल्या
दिव्य दूतांना आज्ञा देईन आणि तू आपला पाय दगडावर
आदळू नयेस म्हणून ते तुला आपल्या हातांवर घेतील'."

[७]येशू त्याला म्हणाला,

"पुन्हा असं लिहिलं आहे की, 'तू आपला देव
परमेश्वर ह्याची परीक्षा करू नकोस'."

[८]पुन्हा सैतान त्याला एका फार उंच डोंगरावर नेतो, आणि,
त्याला जगातली सर्व राज्ये व त्यांचे वैभव दाखवतो;
[९]आणि त्याला म्हणतो,

"तू जर पालथा पडून मला नमन करशील तर मी तुला
हे सर्व देईन."

१०तेव्हा येशू त्याला म्हणाला,

"अरे सैताना, इथून नीघ, कारण असं लिहिलं आहे
की, 'तू आपला देव परमेश्वर ह्याला नमन कर आणि
केवळ त्याचीच उपासना कर'."
११मग सैतान त्याला सोडतो; तेव्हा बघा, देवदूत आले व
त्याची सेवा करू लागले.

१२**आणि योहान अटकेत** ठेवला गेला आहे हे त्याने
ऐकले तेव्हा तो गालिलात गेला.
१३मग त्याने नासरेथ सोडले, आणि, तो जबलून व
नफताली ह्यांच्या हद्दीतल्या समुद्रकाठावरील कपर्णहूमला
येऊन राहिला. १४म्हणजे यशया संदेष्ट्याच्या द्वारे जे
सांगितले होते ते पूर्ण व्हावे; त्याने असे म्हटले आहे की,

१५'जबलून प्रांत आणि नफताली प्रांत,
यार्देनेच्या पलीकडील
समुद्रकाठचा परजनांचा गालील -
१६जे लोक अंधारात बसले होते त्यांनी
मोठा प्रकाश बघितला,
आणि मृत्यूच्या प्रदेशात व छायेत बसले होते
त्यांच्यावर प्रकाश उदय पावला आहे.'

१७येशू तेव्हापासून घोषणा करून सांगू लागला,

"पश्चात्ताप करा; कारण स्वर्गाचं राज्य जवळ आलं
आहे."

१८**आणि येशू गालील समुद्राच्या** किनाऱ्यावरून
चालला असता त्याने पेत्र म्हटलेला शिमोन आणि त्याचा
भाऊ अंद्रिया ह्या दोघा भावांना समुद्रात जाळे टाकताना
बघितले; कारण ते कोळी होते. १९तेव्हा तो त्यांना
म्हणतो,

"तुम्ही माझ्यामागं या आणि मी तुम्हाला माणसं
धरणारे कोळी करीन."
२०तेव्हा, लगेच, त्यांनी आपली जाळी ठेवली आणि ते
त्याच्यामागे गेले. २१तो तेथून पुढे गेल्यावर त्याने जब्दीचा
पुत्र याकोब व त्याचा भाऊ योहान ह्या दुसऱ्या दोन
भावांना आपला बाप जब्दी ह्याच्याबरोबर मचव्यात
आपली जाळी नीट करताना बघितले आणि त्याने त्यांना
बोलावले. २२तेव्हा, लगेच, त्यांनी मचवा सोडला व
आपल्या बापाला सोडले आणि ते त्याच्यामागे गेले.

२३**आणि येशू त्यांच्या सभास्थानात** शिकवीत व
राज्याची सुवार्ता गाजवीत आणि लोकांत सर्व प्रकारचे
आजार व सर्व प्रकारचे रोग बरे करीत सर्व गावोगाव
फिरला.
२४तेव्हा सूरियात त्याची कीर्ती पसरली, आणि ते सर्व
आजाऱ्यांना, नाना रोगांनी व यातनांनी पछाडलेल्यांना,
तसेच भूतग्रस्त, फेफरेकरी व पक्षघाती मनुष्यांना
त्याच्याकडे घेऊन आले; आणि त्याने त्यांना बरे केले.
२५आणि गालील, दकापलीस, यरुशलेम, यहुदिया व
'यार्देनपार' येथील लोकांचे मोठाले घोळके त्याच्या
मागोमाग जात राहिले.

५ **आणि त्याने लोकांचे घोळके** बघितले तेव्हा
तो एका डोंगरावर गेला; आणि तो खाली बसला
तेव्हा त्याचे शिष्य त्याच्याकडे आले; २मग त्याने आपले
तोंड उघडून त्यांना शिकवले आणि म्हटले,
३"जे आत्म्यानं दीन ते धन्य, कारण स्वर्गाचं राज्य
त्यांचं आहे.
४"जे शोक करीत आहेत ते धन्य, कारण त्यांचं
सांत्वन केलं जाईल.
५"जे सौम्य ते धन्य, कारण त्यांना पृथ्वीचं वतन
मिळेल.
६"जे नीतिमत्वाचे भुकेले व तान्हेले ते धन्य, कारण
त्यांच्यावर दया केली जाईल.
७"जे दयाळू ते धन्य, कारण त्यांच्यावर दया केली
जाईल.
८"जे अंतःकरणानं शुद्ध ते धन्य, कारण ते देवाला
पाहतील.
९"जे शांती करणारे ते धन्य, कारण त्यांना देवाचे पुत्र
म्हटलं जाईल.
१०"नीतिमत्वाकरता ज्यांचा छळ झाला आहे ते
धन्य, कारण स्वर्गाचं राज्य त्यांचं आहे.
११"जेव्हा माझ्याकरता लोक तुमची निंदा करतील,
तुमचा छळ करतील, आणि, प्रत्येक प्रकारची वाईट गोष्ट
तुमच्याविरुद्ध खोटी सांगतील तेव्हा तुम्ही धन्य; १२आनंद
करा आणि हर्षित व्हा, कारण स्वर्गात तुमचं प्रतिफळ मोठं
आहे; कारण तुमच्या आधी जे संदेष्टे झाले त्यांचा त्यांनी
तसाच छळ केला.

१३"तुम्ही पृथ्वीचं मीठ आहा; पण मीठ जर निचव
झालं तर त्याला कशानं खारट करणार? मग ते बाहेर
फेकलं जावं आणि लोकांच्या पायी तुडवलं जावं
ह्याशिवाय ते उपयोगी नाही.

१४"तुम्ही जगाचा प्रकाश आहा. डोंगरावर वसलेलं
नगर लपत नाही. १५किंवा कोणी दिवा पेटवून तो
मापाखाली ठेवीत नाहीत, पण दिवठणीवर ठेवतात; आणि
तो घरातल्या सर्वांना प्रकाश देतो. १६तुमचा प्रकाश
लोकांपुढं असा प्रकाशित होऊ द्या की, त्यांनी तुमची
चांगली कामं बघून तुमच्या स्वर्गातील पित्याचं गौरव
करावं.

१७"मी नियमशास्त्र किंवा संदेष्टे नष्ट करायला आलो
असं समजू नका; मी नष्ट करायला आलो नाही, पण मी
पूर्ण करायला आलो. १८कारण, मी तुम्हाला सत्य सांगतो,
आकाश आणि पृथ्वी नाहीशी होईपर्यंत सर्व पूर्ण
झाल्याशिवाय नियमशास्त्रातला एक बिंदू किंवा फाटा पण
नाहीसा होणार नाही. १९म्हणून जो कोणी ह्या लहान
आज्ञांतली एखादी मोडील, आणि लोकांना तसं शिकवील
त्याला स्वर्गाच्या राज्यात लहान म्हटलं जाईल, पण जो
त्या आचरील आणि शिकवील त्याला स्वर्गाच्या राज्यात
मोठं म्हटलं जाईल. २०कारण, मी तुम्हाला सांगतो,
शास्त्र्यांपेक्षा आणि परोश्यांपेक्षा तुमचं नीतिमत्व अधिक
झाल्याशिवाय स्वर्गाच्या राज्यात तुम्ही येणार नाही.

२१"तुम्ही ऐकलं आहे की, प्राचीन पिढ्यांना हे
सांगितलं होतं, 'खून करू नको; आणि जो कोणी खून
करील तो न्यायाच्या शिक्षेस पात्र होईल'. २२पण मी
तुम्हाला सांगतो की, जो कोणी आपल्या भावावर रागवेल
तो न्यायाच्या शिक्षेस पात्र होईल, जो आपल्या भावाला
'राका' म्हणेल तो न्यायसभेच्या शिक्षेस पात्र होईल. पण
जो 'अरे मूर्खा' म्हणेल तो नरकाग्नीच्या शिक्षेस पात्र होईल.
२३म्हणून जर तू वेदीपुढं आपलं अर्पण घेऊन आलास
आणि तुला तिथं आठवलं की, तुझ्या भावाच्या मनात
तुझ्याविरुद्ध काही आहे २४तर तुझं अर्पण तिथंच
वेदीसमोर सोडून जा, आपल्या भावाशी आधी समेट कर,
आणि मग ये आणि आपलं अर्पण सादर कर. २५तुझा वादी
तुझ्याबरोबर वाटेवर असतेवेळीच लवकर त्याच्याशी
सलोखा कर; नाहीतर वादी तुला कदाचित्
न्यायाधिशाच्या हाती देईल, न्यायाधीश कामदारांच्या
हाती देईल आणि तू तुरुंगात टाकला जाशील. २६मी तुला
सत्य सांगतो, तू शेवटची दमडी फेडल्याशिवाय तिथून
बाहेर येणार नाहीस.

२७"तुम्ही ऐकलं आहे की, हे सांगितलं होतं,
'व्यभिचार करू नको'. २८पण मी तुम्हाला सांगतो की, जो
एखाद्या स्त्रीकडे तिची वासना धरून पाहील त्यानं
आपल्या अंतःकरणात तिच्याशी व्यभिचार केलेलाच
आहे. २९आणि तुझा उजवा डोळा जर तुला अडथळा
करीत असेल तर तो उपटून काढ आणि आपल्याजवळून
फेकून दे. कारण तुझा एक अवयव नष्ट व्हावा, आणि तुझं
संपूर्ण शरीर नरकात टाकलं जाऊ नये हे तुझ्या हिताचं
आहे. ३०आणि तुझा उजवा हात जर तुला अडथळा करीत
असेल तर तो कापून टाक आणि आपल्याजवळून फेकून
दे, कारण तुझा एक अवयव नष्ट व्हावा, आणि तुझं संपूर्ण
शरीर नरकात टाकलं जाऊ नये हे तुझ्या हिताचं आहे.

३१"आणि हेही सांगितलं होतं, 'जो आपल्या
बायकोला सोडील त्यानं तिला सोडचिठ्ठी द्यावी.' ३२पण
मी तुम्हाला सांगतो की, जो कोणी आपल्या बायकोला
जारकर्माच्या कारणाशिवाय सोडतो तो तिला व्यभिचारिणी
करतो, आणि तिला सोडल्यावर जो तिच्याशी लग्न करतो
तो व्यभिचार करतो.

३३"पुन्हा, तुम्ही ऐकलं आहे की, प्राचीन पिढ्यांना हे
सांगितलं होतं, 'खोटी साक्ष देऊ नको, पण तू आपल्या
शपथांची परमेश्वराला फेड कर.' ३४पण मी तुम्हाला
सांगतो की, शपथ मुळीच घेऊ नको; आकाशाची नको
कारण ते देवाचं आसन आहे, ३५पृथ्वीची नको, कारण ते
त्याचं पदासन आहे, यरुशलेमची नको, कारण ते त्या
महान राजाचं नगर आहे. ३६किंवा आपल्या मस्तकाचीही
शपथ घेऊ नको, कारण तू एक केसदेखील पांढरा किंवा
काळा करू शकत नाहीस. ३७पण तुमचं बोलणं हो तर हो,
आणि नाही तर नाही, असं असावं; ह्याशिवाय जे अधिक
आहे ते वाइटापासून येणार आहे.

३८"तुम्ही ऐकलं आहे की, हे सांगितलं होतं,
'डोळ्याबद्दल डोळा आणि दाताबद्दल दात'. ३९पण मी
तुम्हाला सांगतो, वाइटाविरुद्ध उलटू नका, पण जो कोणी
तुझ्या उजव्या गालावर मारील त्याच्याकडे तू दुसराही
वळव. ४०आणि कोणी तुझ्यावर फिर्याद करून जर तुझी
बंडी घेईल तर त्याला अंगरखापण घेऊ दे. ४१आणि जो
तुला मैलभर जायला वेठीस धरील त्याच्याबरोबर तू दोन
मैल जा. ४२जो तुझ्याजवळ मागतो त्याला दे; आणि

ज्याला उसनं घ्यायला पाहिजे त्याच्यापुढून मागं फिरू
नको.
[४३]"तुम्ही ऐकलं आहे की, हे सांगितलं होतं, 'तू
आपल्या शेजाऱ्यावर प्रीती कर आणि आपल्या वैऱ्याचा
द्वेष कर'. [४४]पण मी तुम्हाला सांगतो, तुम्ही आपल्या
वैऱ्यांवर प्रीती करा, आणि जे तुमचा छळ करतात
त्यांच्यासाठी प्रार्थना करा; [४५]ह्यासाठी की, तुम्ही आपल्या
पित्याचे पुत्र व्हावं, कारण तो वाइटांवर आणि
चांगल्यांवरही आपला सूर्य उदयास आणतो, तसाच तो
नीतिमानांवर आणि अनीतिमानांवरही पाऊस पाडतो.
[४६]कारण जे तुमच्यावर प्रीती करतात त्यांच्यावर तुम्ही
प्रीती केलीत तर तुमचं प्रतिफळ काय? जकातदार तेच
करतात ना? [४७]आणि तुम्ही केवळ आपल्या बांधवांना
सलाम करता तर इतरांपेक्षा अधिक काय करता?
जकातदार तेच करतात ना? [४८]म्हणून जसा तुमचा स्वर्गीय
पिता पूर्ण आहे तसे तुम्ही पूर्ण व्हा.

६ "तुम्ही आपलं धर्माचरण मनुष्यांना दिसावं
म्हणून त्यांच्यापुढं न करण्याची काळजी घ्या.
नाहीतर, तुमच्या स्वर्गातील पित्याकडून तुम्हाला काही
प्रतिफळ मिळणार नाही. [२]म्हणून तू जेव्हा दान करतोस
तेव्हा ढोंगी जसे सभास्थानांत आणि रस्त्यांत, त्यांना
मनुष्यांकडून गौरव मिळावं म्हणून आपल्यापुढं शिंग
वाजवतात तसं तू करू नको. मी तुम्हाला सत्य सांगतो, ते
आपलं प्रतिफळ भरून पावले आहेत. [३]पण तू जेव्हा दान
करतोस तेव्हा तुझा उजवा हात करतो ते डाव्या हाताला
कळू देऊ नको. [४]म्हणजे तुझं दान गुप्तात व्हावं, आणि
गुप्तात पाहणारा तुझा पिता तुला प्रतिफळ देईल.
[५]"आणि तू जेव्हा प्रार्थना करतोस तेव्हा ढोंग्यांसारखा
होऊ नको. कारण त्यांना आपण मनुष्यांना दिसावं म्हणून
सभास्थानांत आणि रस्त्यांच्या चौकांत उभं राहून प्रार्थना
करायला आवडतं; मी तुम्हाला सत्य सांगतो, ते आपलं
प्रतिफळ भरून पावले आहेत. [६]पण तू प्रार्थना करतोस
तेव्हा तुझ्या खोलीत जा, आणि गुप्तात राहणाऱ्या तुझ्या
पित्याची प्रार्थना कर, आणि गुप्तात पाहणारा तुझा पिता
तुला प्रतिफळ देईल. [७]पण तुम्ही प्रार्थना करता तेव्हा
परजनांसारखे निरर्थक बोलू नका, कारण त्यांना वाटतं की,
त्यांच्या पुष्कळ बोलण्यामुळं त्यांचं ऐकलं जाईल. [८]पण
तुम्ही त्यांच्यासारखे होऊ नका; कारण तुमचा पिता
तुम्हाला कोणत्या गोष्टींची गरज आहे हे तुम्ही
त्याच्याजवळ मागण्याअगोदर जाणतो.
[९]"म्हणून तुम्ही अशी प्रार्थना करा,

'हे आमच्या स्वर्गातील पित्या,
तुझे नाव पवित्र मानिले जावो.
[१०]तुझे राज्य येवो;
जसे स्वर्गात तसेच पृथ्वीवर
तुझ्या इच्छेप्रमाणे होवो.
[११]आमची रोजची भाकर आज आम्हाला दे
[१२]आणि आम्ही आमच्या ऋण्यांना सोडले आहे
तशीच तू आमची ऋणे आम्हाला सोड
[१३]आणि आम्हाला परीक्षेत आणू नकोस,
पण आम्हाला वाइटापासून सोडीव.'

[१४]"कारण तुम्ही लोकांना त्यांच्या अपराधांची क्षमा
केलीत तर तुमचा स्वर्गीय पिता तुम्हाला क्षमा करील
[१५]पण तुम्ही लोकांना त्यांच्या अपराधांची क्षमा केली
नाही, तर तुमचा स्वर्गीय पिताही तुमच्या अपराधांची क्षमा
करणार नाही.
[१६]"शिवाय तुम्ही उपास करता तेव्हा ढोंग्यांसारखे
म्लानमुख होऊ नका. कारण ते आपण उपास करीत
आहोत हे लोकांना दिसावं म्हणून आपली तोंडं विद्रूप
करतात. मी तुम्हाला सांगतो, ते आपलं प्रतिफळ भरून
पावले आहेत. [१७]पण तू उपास करतोस तेव्हा तू आपल्या
डोक्याला तेल लाव आणि तोंड धू; [१८]म्हणजे तू उपास
करीत आहेस हे मनुष्यांना नाही पण गुप्तात राहणाऱ्या
तुझ्या पित्याला दिसावं; आणि गुप्तात पाहणारा तुझा पिता
तुला प्रतिफळ देईल.
[१९]"तुम्ही पृथ्वीवर आपल्यासाठी ठेवी साठवू नका;
तिथं कसर आणि जंग नाश करतात आणि चोर घर फोडून
चोरतात. [२०]पण स्वर्गात आपल्यासाठी ठेवी साठवा; तिथं
कसर आणि जंग नाश करीत नाहीत आणि चोर घर फोडून
चोरीत नाहीत. [२१]कारण जिथं तुमचं धन तिथं तुमचं मनही
राहील.
[२२]"डोळा शरिराचा दिवा आहे; म्हणून तुझा डोळा
नीट असेल तर तुझं संपूर्ण शरीर प्रकाशमय होईल. [२३]पण
तुझा डोळा वाईट असेल तर तुझं संपूर्ण शरीर अंधकारमय
होईल; म्हणून तुझ्यातला प्रकाश जर अंधार असेल तर तो
अंधार किती मोठा!
[२४]"कोणीही मनुष्य दोन धन्यांची सेवा करू शकत
नाही, कारण तो एकाचा द्वेष करील आणि दुसऱ्यावर प्रीती

करील; किंवा एकाला बिलगून राहील आणि दुसऱ्याला तुच्छ मानील. तुम्ही देवाची आणि धनाची सेवा करू शकत नाही.

२५"म्हणून मी तुम्हाला सांगतो, तुम्ही आपल्या जिवाविषयी, आपण काय खावं किंवा काय प्यावं अशी, किंवा आपल्या शरिराविषयी, आपण काय पेहरावं अशी, काळजी करू नका. अन्नापेक्षा जीव अधिक, आणि वस्त्रांपेक्षा शरीर अधिक नाही काय? २६आकाशातल्या पक्ष्यांकडे न्याहाळून पहा की, ते पेरीत नाहीत, किंवा कापणीही करीत नाहीत, किंवा कोठारांत साठवीत नाहीत; तरी तुमचा स्वर्गीय पिता त्यांचं पोषण करतो. त्यांच्यापेक्षा तुम्ही अधिक मोलाचे आहात. २७आणि तुमच्यातला कोण काळजी करून आपलं आयुष्य हातभर वाढवू शकेल? २८आणि वस्त्रांची काळजी का करता? तुम्ही रानातल्या तेरड्यांकडे पहा, ते कसे वाढतात? ते कष्ट करीत नाहीत किंवा कातीत नाहीत; २९तरी मी तुम्हाला सांगतो की, शलमोनदेखील आपल्या सर्व वैभवात ह्यांतल्या एकासारखा सजला नव्हता. ३०तर रानातलं जे गवत आज आहे आणि उद्या भट्टीत टाकलं जाईल त्याला देव असा पेहराव घालतो तर अहो, तुम्ही अल्पविश्वासी, तो तुम्हाला विशेषेकरून घालणार नाही काय? ३१म्हणून 'आपण काय खावं?', 'आपण काय प्यावं?' किंवा 'आपण काय पेहरावं?' असं म्हणून काळजी करू नका. ३२कारण परजन ह्या सर्व गोष्टींच्या मागं लागतात. कारण तुम्हाला ह्या सर्व गोष्टींची गरज आहे हे तुमचा स्वर्गीय पिता जाणतो. ३३पण प्रथम तुम्ही त्याचं राज्य आणि त्याचं नीतिमत्व मिळवू पहा; आणि तुम्हाला ह्या सर्व गोष्टी पुरवल्या जातील.

३४"म्हणून उद्याची काळजी करू नका; कारण उद्या स्वतः आपली काळजी करील. प्रत्येक दिवसाला त्याचं वाईट पुरेसं आहे.

७ "तुमचा न्याय केला जाऊ नये म्हणून तुम्ही न्याय करू नका. २कारण तुम्ही ज्या न्यायानं न्याय कराल त्यानंच तुमचा न्याय केला जाईल; आणि तुम्ही ज्या मापानं मोजून द्याल त्यानंच तुम्हाला मोजून दिलं जाईल. ३तुझ्या भावाच्या डोळ्यात कुसळ आहे ते तू का पाहतोस? पण तुझ्या स्वतःच्या डोळ्यात मुसळ आहे तिकडे तू लक्ष देत नाहीस? ४किंवा तू आपल्या भावाला कसं म्हणशील की, मला तुझ्या डोळ्यातलं कुसळ काढू दे; आणि बघ, तुझ्या स्वतःच्या डोळ्यात मुसळ आहे. ५अरे ढोंग्या, तू आधी आपल्या स्वतःच्या डोळ्यातलं मुसळ काढ; आणि मग तुला आपल्या भावाच्या डोळ्यातलं कुसळ काढायला नीट दिसेल.

६"जे काही पवित्र आहे ते कुत्र्यांना देऊ नका, आणि आपले मोती डुकरांपुढं टाकू नका. नाहीतर, कदाचित् ती ते पायांखाली तुडवतील आणि उलटून तुम्हाला फाडतील.

७"मागा, आणि ते तुम्हाला दिलं जाईल; शोधा, आणि तुम्हाला सापडेल; ठोका, आणि तुमच्यासाठी उघडलं जाईल. ८कारण जो कोणी मागतो त्याला मिळतं, जो शोधतो त्याला सापडतं, आणि जो ठोकतो त्याच्यासाठी उघडलं जाईल. ९किंवा तुमच्यात कोण मनुष्य असा आहे की, त्याचा मुलगा त्याच्याजवळ भाकर मागेल तर तो त्याला दगड देईल? १०किंवा मासा मागेल तर तो त्याला साप देईल? ११मग, तुम्ही वाईट असून, जर आपल्या मुलांना चांगल्या देणग्या कशा द्याव्यात हे तुम्ही जाणता, तर तुमचा स्वर्गातील पिता त्याच्याजवळ जे मागतात त्यांना किती विशेषेकरून चांगल्या गोष्टी देईल. १२म्हणून, लोकांनी तुमच्याशी सर्व गोष्टींत कसं वागावं अशी तुमची इच्छा असेल तसं तुम्ही त्यांच्याशी वागा. कारण नियमशास्त्र आणि संदेष्टे हेच शिकवतात.

१३"अरुंद दरवाजाने आत जा; कारण नाशाकडे नेणारा दरवाजा रुंद, आणि मार्ग पसरट आहे, आणि त्यानं आत जाणारे पुष्कळ आहेत. १४कारण जीवनाकडे नेणारा दरवाजा अरुंद आणि मार्ग संकुचित आहे, आणि तो ज्यांना सापडतो ते थोडे आहेत.

१५"खोट्या संदेष्ट्यांविषयी जपा; ते मेंढरांच्या वेशात तुमच्याकडे येतात, पण आतून ते धरणारे लांडगे आहेत. १६तुम्ही त्यांच्या फळांवरून त्यांना ओळखाल. काटेऱ्यांवरून द्राक्ष किंवा केंकरीवरून अंजीर गोळा करतात काय? १७तसंच प्रत्येक चांगलं झाड चांगलं फळ देतं, पण कुजकं झाड वाईट फळ देतं. १८चांगलं झाड वाईट फळ देऊ शकत नाही; आणि कुजकं झाड चांगलं फळ देऊ शकत नाही. १९जे चांगलं फळ देत नाही असं प्रत्येक झाड तोडून अग्नीत टाकलं जातं. २०म्हणून तुम्ही त्यांच्या फळांवरून त्यांना ओळखाल.

२१"जो कोणीही मला 'प्रभू, प्रभू,' म्हणतो तो स्वर्गाच्या राज्यात येईल असं नाही. पण जो माझ्या स्वर्गातील पित्याच्या इच्छेप्रमाणे करतो तो येईल. २२त्या

दिवशी पुष्कळ जण मला म्हणतील, 'प्रभू, प्रभू, आम्ही
नाही का तुझ्या नावानं संदेश दिले? तुझ्या नावानं भुतं
काढली? आणि तुझ्या नावानं पुष्कळ चमत्कार केले?'
२३आणि मग मी त्यांना उघड सांगेन, 'मी तुम्हाला कधीच
ओळखीत नव्हतो; अहो, अनाचार करणारे तुम्ही,
माझ्यापुढून निघून जा.'

२४"म्हणून जो काणी माझी ही वचनं ऐकतो आणि
त्याप्रमाणं करतो त्याला एका विचारी माणसाची उपमा
देता येईल. २५त्यानं आपलं घर खडकावर बांधलं. मग
पाऊस पडला, पूर आले, वारे सुटले आणि त्या घरावर
आदळले आणि ते पडलं नाही, कारण त्याचा खडकावर
पाया घातला होता; २६आणि जो कोणी माझी ही वचनं
ऐकतो आणि त्याप्रमाणं करीत नाही त्याला एका मूर्ख
माणसाची उपमा देता येईल; त्यानं आपलं घर वाळूवर
बांधलं; २७मग पाऊस पडला, पूर आले, वारे सुटले आणि
त्या घरावर आदळले आणि ते पडलं. आणि त्याचं पडणं
मोठं होतं."

२८आणि असे झाले की, येशूने ही वचने समाप्त केली
तेव्हा लोक त्याच्या शिक्षणाने थक्क झाले. २९कारण त्याने
त्यांच्या शास्त्र्यांप्रमाणे नाही पण स्वतःला अधिकार
असल्याप्रमाणे त्यांना शिकवले.

८ आणि तो डोंगरावरून खाली आला तेव्हा
लोकांचे मोठाले घोळके त्याच्या मागोमाग जाऊ
लागले.

२आणि बघा, त्याच्याकडे एक कुष्ठरोगी आला व
त्याच्या पाया पडला, आणि म्हणाला,

"प्रभू, जर आपली इच्छा असेल तर आपण मला
शुद्ध करू शकाल."
३तेव्हा त्याने आपला हात पुढे करून त्याला धरले आणि
म्हटले,

"माझी इच्छा आहे, शुद्ध हो."
आणि, लगेच, त्याचे कुष्ठ शुद्ध केले गेले. ४आणि येशू
त्याला म्हणतो,

"पहा, कोणाला सांगू नकोस; पण जा, आणि
स्वतःला याजकाला दाखव. आणि त्यांना साक्ष म्हणून
मोशेनं सांगितलेलं दान अर्पण कर."

५आणि येशू कपर्णहूमला आला तेव्हा
त्याच्याकडे एक शतपती आला आणि त्याने त्याला
विनंती करून म्हटले,

६"प्रभू, माझा नोकर पक्षघाताने आजारी असून घरात
पडला आहे, आणि त्याला फार क्लेश होत आहेत."
७तेव्हा येशू त्याला म्हणतो,

"मी येऊन त्याला बरा करीन."
८पण शतपतीने उत्तर देऊन म्हटले,

"प्रभू, मी असा लायक नाही की, आपण माझ्या
छपराखाली यावं. पण आपण शब्द मात्र बोला, आणि
माझा नोकर बरा होईल. ९कारण मीपण अधिकाराखालचा
मनुष्य आहे आणि माझ्या हाताखाली शिपाई आहेत.
आणि, मी ह्याला म्हणतो, 'जा', आणि तो जातो आणि
दुसऱ्याला म्हणतो, 'ये', आणि तो येतो आणि माझ्या
दासाला म्हणतो, 'हे कर', आणि तो करतो."
१०आणि हे ऐकून येशूने आश्चर्य केले, आणि त्याच्या
मागोमाग जे आले होते त्यांना तो म्हणाला,

"मी तुम्हाला सत्य सांगतो, मला एवढा मोठा
विश्वास इस्राएलातही आढळला नाही. ११आणि मी
तुम्हाला सांगतो, पूर्वेकडून आणि पश्चिमेकडून पुष्कळ
येतील, आणि स्वर्गाच्या राज्यात अब्राहाम, इसहाक
आणि याकोब ह्यांच्याबरोबर बसतील. १२पण राज्याचे पुत्र
बाहेरच्या अंधारात टाकले जातील; तिथं रडणं आणि दात
खाणं होईल."
१३मग येशू त्या शतपतीला म्हणाला,

"जा, तू विश्वास ठेवल्याप्रमाणं तुला प्राप्त होईल."
आणि त्याच घटकेस त्याचा नोकर बरा झाला.

१४आणि येशू पेत्राच्या घरात आला तेव्हा त्याने
बघितले की, त्याची सासू ताप येऊन पडली होती.
१५आणि त्याने तिच्या हाताला धरले तेव्हा तिच्यातून ताप
निघाला आणि ती उठली व तिने त्यांची सेवा केली. १६पण
संध्याकाळ झाली त्यावेळी, त्यांनी ज्यांना भुते लागली
होती अशा पुष्कळ जणांना त्याच्याकडे आणले. आणि
त्याने आपल्या शब्दाने भुते काढली व जे आजारी होते
त्या सर्वांना बरे केले. १७म्हणजे यशया संदेष्ट्याच्या द्वारे
जे सांगितले होते ते पूर्ण व्हावे; त्याने असे म्हटले आहे
की,

'त्याने स्वतः आमचे व्याधी घेतले,
आणि आमचे रोग उचलले.'

[१८]आता येशूने आपल्या सभोवती लोकांचे मोठाले घोळके बघितले तेव्हा त्याने दुसऱ्या बाजूकडे जायची आज्ञा दिली.
[१९]तेव्हा एक शास्त्री येऊन त्याला म्हणाला,

"गुरू, आपण जाल तिकडे मी आपल्यामागं येईन."
[२०]आणि येशू त्याला म्हणतो,

"खोकडांना बिळं, आणि आकाशातल्या पक्ष्यांना घरटी आहेत पण मनुष्याच्या पुत्राला डोकं टेकायला कुठंच काही नाही."
[२१]तेव्हा शिष्यांतला दुसरा एक जण त्याला म्हणाला,

"प्रभू, मला प्रथम जाऊ द्या, आणि माझ्या बापाला पुरू द्या."
[२२]पण येशू त्याला म्हणाला,

"माझ्यामागं ये. मृतांना त्यांच्या मृतांना पुरू दे."

[२३]आणि ते मचव्यात गेल्यावर त्याचे शिष्य त्याच्या मागोमाग गेले.
[२४]आणि बघा, समुद्रात मोठे वादळ उद्भवले; त्यामुळे लाटांनी मचवा झाकला आणि तो झोपलेला होता. तेव्हा ते त्याच्याजवळ गेले आणि त्याला उठवून म्हणाले,
[२५]"प्रभू, वाचवा; आपण बुडतोत."
[२६]आणि तो त्यांना म्हणतो,

"अहो तुम्ही अल्पविश्वासी, तुम्ही असे भितरे कसे?"

आणि तो उठला व त्याने वाऱ्यांना आणि समुद्राला दटावले; तेव्हा मोठी स्तब्धता आली.
[२७]पण त्यांनी आश्चर्य केले व म्हटले,

"हा कसा मनुष्य आहे की, वारे आणि समुद्रदेखील ह्याचं ऐकतात."

[२८]आणि तो दुसऱ्या बाजूस गरसेकरांच्या प्रांतात आला तेव्हा ज्यांना भुते लागली होती असे दोघे जण थडग्यांतून येताना त्याला भेटले. ते इतके अतिभयंकर होते की, त्या वाटेने कोणी जाऊ शकत नसे.
[२९]आणि बघा, ते ओरडून म्हणाले,

"देवाच्या पुत्रा, तुला आमच्याशी काय करायचं आहे? तू आम्हाला वेळेपूर्वी पिडायला इथं आलास काय?"
[३०]आता एक, डुकरांचा कळप तेथे त्यांच्यापासून दूरवर चरत होता.
[३१]आणि भुतांनी त्याला विनंती करून म्हटले,

"तू आम्हाला बाहेर काढलंस तर आम्हाला त्या डुकरांच्या कळपात जाऊ दे."
[३२]आणि तो त्यांना म्हणाला,

"जा."

तेव्हा भुते निघून त्या डुकरांत शिरली, आणि बघा, तो सर्व कळप एका कड्यावरून जोरात पळत, खाली समुद्रात गेला आणि पाण्यात नष्ट झाला.
[३३]तेव्हा जे त्यांची राखण करीत होते ते तेथून पळाले व नगरात गेले; आणि त्यांनी सर्व काही व ज्यांना भुते लागली होती त्यांना काय झाले ते सांगितले.
[३४]आणि बघा, ते सर्व नगर येशूला भेटायला बाहेर आले; आणि त्याला बघितल्यावर त्यांनी त्याला आपल्या प्रांतातून निघून जायची विनंती केली.

९ तेव्हा तो मचव्यात गेला आणि दुसऱ्या बाजूला येऊन आपल्या स्वतःच्या नगरात आला.
[२]आणि बघा, ते एका खाटल्यावर पडलेल्या, पक्षघाती मनुष्याला त्याच्याकडे घेऊन आले. तेव्हा येशूने त्यांचा विश्वास बघून त्या पक्षघात झालेल्या मनुष्याला म्हटले,

"मुला, धीर धर, तुझ्या पापांची क्षमा केली आहे."
[३]आणि बघा, काही शास्त्री आपल्या मनात म्हणाले,

"हा दुर्भाषण करतो."
[४]आणि येशूने त्यांचे विचार जाणून म्हटले,

"तुम्ही आपल्या मनात वाईट विचार का करता?
[५]कारण 'तुझ्या पापांची क्षमा केली आहे' असं म्हणणं, किंवा 'ऊठ आणि चाल' असं म्हणणं अधिक सोपं आहे?
[६]पण मनुष्याच्या पुत्राला, पृथ्वीवर, पापांची क्षमा करायचा अधिकार आहे हे तुम्हाला समजावं म्हणून,"

(तो मग त्या पक्षघाती मनुष्याला म्हणतो,)

"ऊठ, तुझं बाजलं उचल आणि तुझ्या घरी जा."
[७]तेव्हा तो उठला आणि आपल्या घरी गेला.
[८]पण लोकांनी हे बघितले तेव्हा ते भ्याले, आणि ज्या देवाने मनुष्यांना एवढा अधिकार दिला त्याचे त्यांनी गौरव केले.

[९]आणि येशू तेथून पुढे जात असता त्याने जकातनाक्यावर बसलेल्या, मत्तय नावाच्या मनुष्याला बघितले. आणि तो त्याला म्हणतो,

"माझ्यामागं ये."

तेव्हा तो उठला आणि त्याच्यामागे गेला. १०आणि असे झाले की, येशू घरात भोजनास बसला असता, बघा, पुष्कळ जकातदार व पापी आले, आणि येशूच्या व त्याच्या शिष्यांच्या पंगतीला भोजनास बसले. ११आणि हे परोश्यांनी बघितले तेव्हा ते त्याच्या शिष्यांना म्हणाले,

"तुमचे गुरू जकातदारांच्या आणि पाप्यांच्या पंगतीला का जेवतात?"

१२पण हे येशूने ऐकले तेव्हा तो त्यांना म्हणाला,

"निरोग्यांना वैद्याची गरज नाही पण रोग्यांना आहे. १३तर जा, आणि, 'मला दया पाहिजे, बलिदान नको', म्हणजे काय आहे ते तुम्ही शिका. कारण मी नीतिमानांना बोलवायला आलो नाही पण पाप्यांना बोलवायला आलो."

१४तेव्हा योहानाचे शिष्य त्याच्याकडे येऊन म्हणाले,

"आम्ही आणि परोशी उपास करतो पण आपले शिष्य उपास का करीत नाहीत?"

१५आणि येशू त्यांना म्हणाला,

"वऱ्हाड्यांबरोबर वर असताना त्यांना शोक करवेल काय? पण वर त्यांच्यामधून काढला जाईल असे दिवस येतील. आणि मग ते उपास करतील.

१६"कोणी कोऱ्या कापडाचं ठिगळ जुन्या कपड्यावर लावीत नाहीत; कारण भरीचा तुकडा त्या कपड्यामधून उसकटतो आणि फाटकं अधिक वाईट होतं.

१७"किंवा कोणी नवा द्राक्षारस जुन्या बुधल्यांत भरीत नाहीत; नाहीतर बुधले फुटतात; द्राक्षारस सांडतो आणि बुधल्यांचा नाश होतो. म्हणून नवा द्राक्षारस नव्या बुधल्यांत भरतात आणि दोन्ही टिकतात."

१८तो हे त्यांच्याशी बोलत असता, बघा, तेथे एक अधिकारी आला व त्याच्या पाया पडून म्हणाला,

"माझी मुलगी आताच मेली आहे; पण या, आणि आपला हात तिच्यावर ठेवा, म्हणजे ती जिवंत होईल."

१९आणि येशू उठून त्याच्या मागोमाग गेला आणि त्याचे शिष्यही गेले.

२०आणि बघा, बारा वर्षे रक्तस्राव लागलेली एक स्त्री मागे आली व त्याच्या वस्त्राच्या काठाला शिवली. २१कारण ती आपल्या मनात म्हणाली,

"मी केवळ ह्याच्या वस्त्राला शिवले तरी मी बरी होईन."

२२पण येशू मागे वळला व त्याने तिला बघून म्हटले,

"मुली, धीर धर, तुझ्या विश्वासानं तुला बरं केलं आहे."

आणि ती स्त्री त्याच घटकेपासून बरी झाली.

२३आणि येशू त्या अधिकाऱ्याच्या घरात आला, आणि त्याने तेथे वाजंत्री व गलबला करणारे लोक बघितले; २४तेव्हा तो त्यांना म्हणाला,

"उठा, कारण मुलगी मेली नाही पण झोपली आहे."

आणि ते त्याला हसले. २५पण लोकांना बाहेर काढल्याबरोबर तो आत गेला व त्याने तिच्या हाताला धरले आणि मुलगी उठली. २६आणि त्या सर्व प्रांतात ह्या गोष्टींची कीर्ती पसरली.

२७आणि येशू तेथून जात असता दोन अंधळे त्याच्या मागोमाग गेले व ओरडत म्हणाले,

"अहो दावीदपुत्र, आमच्यावर दया करा."

२८आणि तो घरात आल्यावर ते अंधळे त्याच्याकडे आले; आणि येशू त्यांना म्हणाला,

"मी हे करू शकतो असा तुम्ही विश्वास ठेवता काय?"

ते त्याला म्हणतात,

"हो, प्रभू."

२९तेव्हा त्याने त्यांच्या डोळ्यांवर हात लावून म्हटले,

"तुम्हाला तुमच्या विश्वासाप्रमाणे प्राप्त होवो."

३०आणि त्यांचे डोळे उघडले. मग येशूने त्यांना निक्षून सूचना देऊन म्हटले,

"पहा, हे कोणाला कळू नये."

३१पण ते गेले आणि त्यांनी त्या सर्व प्रांतात त्याची कीर्ती पसरवली.

३२आणि ते बाहेर निघाले, तेव्हा, बघा, ते एका, भूत लागलेल्या मुक्या मनुष्याला त्याच्याकडे घेऊन आले; ३३आणि भूत बाहेर काढले गेले तेव्हा तो मुका मनुष्य बोलला. आणि लोकांनी आश्चर्य केले व म्हटले,

"असं इस्राएलात कधीच दिसलं नव्हतं."

३४पण परोशी म्हणाले,

"हा मृतांच्या अधिपतीच्या साह्यानं भुतं काढतो."

३५ **आणि येशू त्यांच्या सभास्थानात** शिकवीत व
राज्याची सुवार्ता गाजवीत आणि प्रत्येक प्रकारचे आजार
व प्रत्येक प्रकारचे रोग बरे करीत सर्व नगरांत व खेड्यांत
फिरला.

३६पण त्याने लोकांचे घोळके बघितले तेव्हा त्याला
त्यांचा कळवळा आला, कारण ते कासावीस होत होते व
ते मेंढपाळ नसलेल्या मेंढरांसारखे विखरले होते. ३७तेव्हा
तो आपल्या शिष्यांना म्हणतो,

"खरोखर, पीक फार आहे पण कामकरी थोडे आहेत.
३८तर पिकाच्या धन्यानं आपल्या पिकात कामकरी
पाठवावेत म्हणून तुम्ही त्याला विनवणी करा."

# १०

**आणि त्याने आपल्या** बारा शिष्यांना
आपल्याकडे बोलावले; आणि त्याने त्यांना
अशुद्ध आत्म्यांवर म्हणजे त्यांना बाहेर काढायचा, आणि
सर्व प्रकारचे आजार व सर्व प्रकारचे रोग बरे करायचा
अधिकार दिला.

२**आणि त्याच्या बारा प्रेषितांची नावे** अशी:
पहिला पेत्र म्हटलेला शिमोन व त्याचा भाऊ अंद्रिया;
जब्दीचा पुत्र याकोब व त्याचा भाऊ योहान, ३फिलिप,
बर्थलमय, थोमा व मत्तय जकातदार; अल्फीचा याकोब
आणि तद्दय; ४शिमोन कनानी, आणि ज्याने त्याला धरून
दिले तो यहुदा इस्कार्योत.

५येशूने ह्या बारा शिष्यांना पाठवले आणि त्यांना
आज्ञा देऊन म्हटले,

"परजनांच्या रस्त्यांवर जाऊ नका; आणि
शोमरोन्यांच्या कोणत्याही नगरात शिरू नका; ६तर
इस्राएलाच्या घराण्यातल्या हरवलेल्या मेंढरांकडे जा.
७आणि जात असताना तुम्ही घोषणा करून म्हणा,
'स्वर्गाचं राज्य जवळ आलं आहे.' ८आजाऱ्यांना बरं करा,
मेलेल्यांना उठवा, कुष्ठरोग्यांना शुद्ध करा; तुम्हाला फुकट
मिळालं आहे, फुकट द्या. ९तुमच्या कंबरकशात सोनं, रुपं
किंवा तांबं घेऊ नका. १०वाटेसाठी झोळी किंवा दोन झगे,
वहाणा किंवा काहीही घेऊ नका, कारण कामकरी
पोषणास पात्र आहे. ११आणि, ज्या कोणत्या नगरात किंवा
गावात जाल तिथं कोण योग्य आहे हे शोधून काढा; आणि
तुम्ही पुढं जाईपर्यंत तिथं रहा. १२आणि तुम्ही कोणत्याही
घरात जाल तेव्हा त्याला अभिवादन करा. १३जर ते घर
लायक असेल तर तुमची शांती त्यावर येईल पण जर ते
लायक नसेल तर तुमची शांती तुमच्याकडे परत येईल.
१४आणि जो कोणी तुमचा स्वीकार करणार नाही किंवा
तुमची वचनं ऐकणार नाही त्या घरातून किंवा त्या नगरातून
बाहेर निघताना तुम्ही आपल्या पायांची धूळ झटकून
टाका. १५मी तुम्हाला सत्य सांगतो, न्यायाच्या दिवशी त्या
नगरापेक्षा सदोम आणि गमोरा ह्या नगरांना अधिक सोपं
होईल.

१६"बघा, मी तुम्हाला लांडग्यांत मेंढरांसारखे पाठवीत
आहे. म्हणून तुम्ही सापांसारखे दूरदर्शी आणि
कबुतरांसारखे निरुपद्रवी व्हा. १७पण लोकांपासून सावध
रहा; कारण ते तुम्हाला न्यायसभांच्या स्वाधीन करतील,
आणि ते तुम्हाला त्यांच्या सभास्थानांत फटके मारतील;
१८आणि तुम्ही माझ्याकरता अधिकाऱ्यांपुढं आणि
राजांपुढं, त्यांना आणि परजनांना साक्ष व्हायला आणले
जाल. १९पण ते तुम्हाला धरून देतील तेव्हा आपण कसं
किंवा काय बोलावं ह्याची काळजी करू नका, कारण
तुम्ही काय बोलावं हे तुम्हाला त्याच घटकेस दिलं जाईल.
२०कारण बोलणारे तुम्ही नाही, पण तुमच्या पित्याचा
आत्मा तुमच्या द्वारे बोलणारा आहे. २१आणि भाऊ
भावाला आणि बाप लेकराला ठार मारायला धरून देईल;
आणि लेकरं आईबापांवर उठतील आणि त्यांचा वध
करवतील २२आणि सगळे माझ्या नावाकरता तुमचा द्वेष
करतील, पण जो शेवटपर्यंत टिकून राहील तो तारला
जाईल. २३पण ते तुमचा ह्या नगरात पाठलाग करतील
तेव्हा दुसऱ्या नगरात पळून जा. कारण मी तुम्हाला सत्य
सांगतो, मनुष्याचा पुत्र येईल तोपर्यंत इस्राएलाच्या सर्व
नगरांतून तुमचं जाणं झालेलं नसेल.

२४"शिष्य आपल्या गुरूहून मोठा नाही आणि दास
आपल्या धन्याहून मोठा नाही. २५शिष्याला त्याच्या
गुरूसारखं आणि दासाला त्याच्या धन्यासारखं होता यावं
एवढं पुरे. जर त्यांनी घरधन्याला बालजबूल म्हटलं तर जे
त्याच्या घरातले आहेत त्यांना किती अधिक म्हणतील.

२६"म्हणून त्यांना भिऊ नका, कारण प्रकट होणार
नाही असं काहीही झाकलेलं नाही, आणि कळणार नाही
असं गुप्त ठेवलेलं नाही. २७मी तुम्हाला अंधारात सांगतो ते
तुम्ही उजेडात बोला, आणि तुम्ही जे कानांत ऐकाल ते
धाब्यांवर गाजवा. २८जे काणी शरीर नष्ट करतात पण
आत्मा नष्ट करू शकत नाहीत त्यांना भिऊ नका; पण जो
दोन्ही, आत्मा आणि शरीर नरकात नष्ट करू शकतो

त्याला विशेषेकरून भ्या. [२९]दमडीला दोन चिमण्या विकतात की नाही? पण तुमच्या पित्याशिवाय त्यातली एकपण जमिनीवर पडणार नाही. [३०]पण तुमच्या डोक्याचे सगळे केसही मोजलेले आहेत. [३१]म्हणून भिऊ नका; तुम्ही पुष्कळ चिमण्यांपेक्षा अघिक मोलाचे आहा. [३२]म्हणून जो कोणी मला मनुष्यांसमोर पतकरील त्याला मीपण माझ्या स्वर्गातील पित्यासमोर पतकरीन, [३३]पण जो कोणी मला मनुष्यांसमोर नाकारील त्याला मीपण माझ्या स्वर्गातील पित्यासमोर नाकारीन.

[३४]"मी पृथ्वीवर शांती ठेवायला आलो असं समजू नका; मी शांती ठेवायला आलो नाही, पण तरवार. [३५]कारण मी मनुष्याला त्याच्या बापाविरुद्ध, मुलीला तिच्या आईविरुद्ध, आणि सुनेला तिच्या सासूविरुद्ध उठवायला आलो आहे. [३६]आणि मनुष्याच्या घरचेच त्याचे वैरी होतील. [३७]जो माझ्यापेक्षा बापावर किंवा आईवर अधिक प्रीती करील तो मला योग्य नाही. जो माझ्यापेक्षा मुलावर किंवा मुलीवर अधिक प्रीती करील तो मला योग्य नाही. [३८]आणि जो आपला वधस्तंभ घेऊन माझ्यामागं येत नाही तो मला योग्य नाही. [३९]जो आपला जीव मिळवील तो त्याला मुकेल आणि जो माझ्याकरता आपल्या जिवाला मुकेल त्याला तो मिळेल.

[४०]"जो तुमचा स्वीकार करतो तो माझा स्वीकार करतो आणि जो माझा स्वीकार करतो तो ज्यानं मला पाठवलं त्याचा स्वीकार करतो. [४१]जो संदेष्ट्याचा संदेष्टा म्हणून स्वीकार करतो त्याला संदेष्ट्याचं प्रतिफळ मिळेल, आणि नीतिमानाचा नीतिमान म्हणून स्वीकार करतो त्याला नीतिमानाचं प्रतिफळ मिळेल. [४२]आणि मी तुम्हाला सत्य सांगतो, जो कोणी ह्या लहानांतील एकाला, शिष्य म्हणून, केवळ गार पाण्याचा प्याला प्यायला देईल तो आपलं प्रतिफळ गमावणार नाही."

## ११

आणि असे झाले की, येशूने आपल्या बारा शिष्यांना आज्ञा देणे समाप्त केले, तेव्हा तो त्यांच्या नगरात शिकवायला व घोषणा करायला तेथून निघाला.

[२]आता योहानाने तुरुंगात, ख्रिस्ताच्या कामाविषयी ऐकले, तेव्हा त्याने आपल्या शिष्यांतील दोघांना धाडले; [३]आणि त्याला विचारले,

"आपण जो येणार आहे तो आहात की, आम्ही दुसऱ्याची वाट पहावी?"

[४]येशूने त्यांना उत्तर देऊन म्हटले,

"जा, आणि तुम्ही ज्या गोष्टी ऐकत आहा आणि पहात आहा त्या योहानाला सांगा, [५]अंधळे पाहतात आणि पांगळे चालतात, मेलेले उठवले जातात आणि दीनांना सुवार्ता सांगण्यात येते. [६]आणि ज्या कोणाला माझ्यात अडथळा होणार नाही तो धन्य."

[७]आणि ते गेल्यावर येशू लोकांना योहानाविषयी सांगू लागला,

"तुम्ही काय बघायला रानात गेलात? वाऱ्यानं हलणारा बोरू काय? [८]तर काय बघायला बाहेर गेलात? तलम पेहराव घालणाऱ्या मनुष्याला काय? बघा, जे तलम पेहराव घालतात ते राजवाड्यात असतात. [९]तर कशाला बाहेर गेलात? संदेष्ट्याला बघायला काय? मी तुम्हाला सांगतो, हो, आणि संदेष्ट्याहून जो श्रेष्ठ त्याला; [१०]ज्याच्याविषयी हे लिहिलं आहे तो हा आहे,

'पहा, मी माझ्या निरोप्याला
तुझ्या तोंडापुढे पाठवीन
आणि तो तुझ्यापुढे
तुझा मार्ग तयार करील.'

[११]मी तुम्हाला सत्य सांगतो, स्त्रियांपासून जन्मलेल्यांत बाप्तिस्मा करणाऱ्या योहानापेक्षा कोणी मोठा उद्भवला नाही, तरी स्वर्गाच्या राज्यात जो सर्वांत लहान आहे तो त्याच्यापेक्षा मोठा आहे. [१२]बाप्तिस्मा करणाऱ्या योहानाच्या दिवसांपासून आतापर्यंत, स्वर्गाच्या राज्यावर लगट लागली आहे आणि लगट लावणारे ते बळानं घेत आहेत. [१३]कारण सर्व संदेष्ट्यांनी आणि नियमशास्त्रानं योहानापर्यंत संदेश दिले. [१४]आणि तुमची हे स्वीकारायची इच्छा असेल तर येणारा एलिया हाच आहे. [१५]ज्याला ऐकायला कान आहेत तो ऐको.

[१६]"पण मी ह्या पिढीला कोणाची उपमा देऊ? ती बाजारांत बसणाऱ्या मुलांसारखी आहे. ते आपल्या सोबत्यांना हाक मारून [१७]म्हणतात, 'आम्ही तुमच्यासाठी सनई वाजवली, आणि तुम्ही नाचला नाही, आम्ही तुमच्यासाठी आक्रोश केला, आणि तुम्ही ऊर बडवून घेतले नाहीत', [१८]कारण योहान खात पीत आला नाही, आणि ते म्हणतात, 'त्याच्यात भूत आहे'. [१९]मनुष्याचा पुत्र खात पीत आला आणि ते म्हणतात, 'बघा, हा खादाड

आणि दारुबाज मनुष्य! जकातदारांचा आणि पाप्यांचा
मित्र!' पण सुज्ञता तिच्या कृतींकडून न्यायी ठरते."
[२०]मग जेथे त्याचे बहुतेक चमत्कार झाले होते त्या
नगरांना तो दोष देऊ लागला; कारण त्यांनी पश्चात्ताप
केला नव्हता.
[२१]"हे खोराजिना, तुला हळहळ! हे बेथसैदा, तुला
हळहळ! कारण तुमच्यात जे चमत्कार झाले ते सोर आणि
सिदोन इथं घडले असते तर त्यांनी, मागील काळात, तरट
आणि राख अंगावर घालून पश्चात्ताप केला असता.
[२२]पण मी तुम्हाला सांगतो, न्यायाच्या दिवशी तुमच्यापेक्षा
सोर आणि सिदोन ह्यांना अधिक सोपं होईल.
[२३]"आणि हे कपर्णहुमा, तुला स्वर्गापर्यंत चढवण्यात
येईल काय? तुला अधोलोकापर्यंत खाली आणण्यात
येईल! कारण तुझ्यात जे चमत्कार झाले ते सदोमात घडले
असते तर ते ह्या दिवसापर्यंत राहिलं असतं. [२४]पण मी
तुम्हाला सांगतो, न्यायाच्या दिवशी तुझ्यापेक्षा सदोम
नगराला अघिक सोपं होईल."
[२५]त्यावेळी येशूने उत्तर देऊन म्हटले, "हे पित्या,
स्वर्गाच्या आणि पृथ्वीच्या प्रभू, मी तुझी स्तुती करतो,
कारण तू ह्या गोष्टी ज्ञान्यांपासून आणि बुद्धिवानांपासून
गुप्त ठेवल्यास आणि बालकांना त्या प्रकट केल्यास.
[२६]हो, पित्या, कारण ते तुझ्या दृष्टीला बरं दिसलं.
[२७]माझ्या पित्यानं सर्व गोष्टी माझ्या हाती दिल्या आहेत,
आणि पुत्राला पित्याशिवाय कोणी जाणत नाही, आणि
पित्याला पुत्राशिवाय, आणि पुत्र ज्या कोणाला प्रकट करू
इच्छील त्याच्याशिवाय कोणी जाणत नाही. [२८]अहो तुम्ही
कष्ट करणारे आणि ओझ्याखाली दडपलेले, तुम्ही सर्व
माझ्याकडे या आणि मी तुम्हाला विसावा देईन. [२९]माझं जू
आपल्यावर घ्या आणि माझ्याकडून शिका. कारण मी
मनाचा सौम्य आणि लीन आहे; आणि तुम्ही आपल्या
जिवासाठी विसावा मिळवाल. [३०]कारण माझं जू सोयीचं
आहे आणि माझं ओझं हलकं आहे."

१२ त्यावेळी येशू शब्बाथ दिवशी शेतांमधून
जात होता. आणि त्याचे शिष्य भुकेले होते;
आणि ते कणसे तोडून घेऊन खाऊ लागले. [२]पण हे जेव्हा
परोश्यांनी बघितले तेव्हा ते त्याला म्हणाले,
"बघा, आपले शिष्य शब्बाथ दिवशी जे करणं योग्य
नाही ते करीत आहेत."
[३]पण तो त्यांना म्हणाला,
"जेव्हा दाविदाला आणि त्याच्याबरोबर होते त्यांना
भूक लागली होती तेव्हा त्यानं काय केलं हे तुम्ही वाचलं
नाही काय? [४]तो देवाच्या मंडपात कसा गेला आणि ज्या
समर्पित भाकरी, केवळ याजकाशिवाय, त्यानं किंवा
त्याच्याबरोबर जे होते त्यांनी खाणं योग्य नव्हतं त्या त्यानं
कशा खाल्ल्या? [५]किंवा शब्बाथ दिवशी याजक मंदिरात
शब्बाथ मोडून निर्दोष राहतात हे तुम्ही नियमशास्त्रात
वाचलं नाही काय? [६]पण मी तुम्हाला सांगतो, मंदिरापेक्षा
इथं काही अधिक आहे.
[७]"पण मला 'दया पाहिजे, बलिदान नको' ह्याचा अर्थ
काय आहे हे तुम्हाला कळलं असतं तर तुम्ही निर्दोष्यांना
दोषी ठरवलं नसतं. [८]कारण मनुष्याचा पुत्र शब्बाथाचा
धनी आहे."

[९]**आणि तो तेथून निघाला** व त्यांच्या सभास्थानात
गेला. [१०]आणि बघा, तेथे एक, वाळलेल्या हाताचा मनुष्य
होता. आणि त्याच्यावर आरोप करता यावा म्हणून त्यांनी
त्याला प्रश्न करून म्हटले,
"शब्बाथ दिवशी कोणाला बरं करणं योग्य आहे
काय?"
[११]आणि तो त्यांना म्हणाला,
"तुमच्यात कोण असा मनुष्य असेल की,
त्याच्याजवळ एक मेंढरू आहे, आणि शब्बाथ दिवशी ते
खाचेत पडलं तर तो त्याला धरून वर उचलणार नाही?
[१२]मग मेंढरापेक्षा मनुष्य किती अधिक आहे? म्हणून
शब्बाथ दिवशी चांगलं करणं योग्य आहे."
[१३]मग तो त्या मनुष्याला म्हणतो,
"तुझा हात पुढं कर."
त्याने तो पुढे केला, आणि तो हात दुसऱ्या हातासारखा
नीट बरा झाला.

[१४]**तेव्हा परोशी बाहेर गेले**, आणि त्यांनी, आपण
त्याला कसे नष्ट करावे म्हणून त्याच्याविरुद्ध मसलत
घेतली. [१५]पण हे येशूला कळले तेव्हा तो तेथून गेला;
आणि पुष्कळ त्याच्या मागोमाग गेले व त्याने त्या सर्वांना
बरे केले; [१६]आणि त्यांनी त्याला प्रगट करू नये म्हणून
त्याने त्यांना आज्ञा दिली. [१७]म्हणजे यशया संदेष्ट्याच्या
द्वारे जे सांगितले होते ते पूर्ण व्हावे; त्याने असे म्हटले
आहे की,

[१८]'बघा, माझा सेवक,
मी ह्याला निवडले आहे,
मला हा प्रिय आहे,
माझा जीव ह्याच्यावर संतुष्ट आहे;
मी त्याच्यावर माझा आत्मा घालीन,
तो परजनांत न्यायाची घोषणा करील.
[१९]तो वाद घालणार नाही
किंवा ओरडणार नाही
किंवा रस्त्यांत कोणी त्याचा
आवाज ऐकणार नाही.
[२०]तो न्यायाला विजयात नेईपर्यंत,
तो पिचलेला बोरू तोडणार नाही,
आणि मिणमिणती वात विझवणार नाही.
[२१]आणि परजन त्याच्या नावावर भाव ठेवतील.'

[२२]मग त्यांनी त्याच्याकडे एका अंधळ्या व मुक्या भूतग्रस्ताला आणले; आणि त्याने त्याला बरे केले, तेव्हा तो मुका बोलू लागला आणि पाहू लागला. [२३]तेव्हा सर्व लोक आश्चर्यचकित होऊन म्हणाले,

"हा दाविदाचा पुत्र असेल काय?"

[२४]पण परोश्यांनी हे ऐकून म्हटले,

"हा मनुष्य भुतांचा अधिपती जो बालजबूल त्याच्या साह्याशिवाय भुतं काढीत नाही."

[२५]पण त्याने त्यांचे विचार जाणून त्यांना म्हटले,

"स्वतःविरुद्ध फुटलेलं कोणतंही राज्य ओसाड पडतं.

"आणि स्वतःविरुद्ध फुटलेलं नगर किंवा घर टिकणार नाही.

[२६]"आणि सैतान जर सैतानाला बाहेर काढतो तर तो स्वतःविरुद्ध फुटला आहे. मग त्याचं राज्य कसं टिकेल? [२७]आणि मी जर बालजबूलच्या साह्यानं भुतं काढतो तर तुमचे पुत्र कुणाच्या साह्यानं काढतात? म्हणून ते तुमचे न्यायाधीश होतील. [२८]पण मी देवाच्या आत्म्याच्या साह्यानं भुतं काढीत असेन तर देवाचं राज्य तुमच्यावर आलंच आहे.

[२९]"किंवा कोणी बलवान मनुष्याला आधी बांधल्याशिवाय त्या बलवान मनुष्याच्या घरात जाऊन त्याची सामग्री लुटू शकेल काय? आणि नंतर त्याचं घर लुटील.

[३०]"जो माझ्या बाजूचा नाही तो माझ्या विरुद्ध आहे; जो माझ्याबरोबर गोळा करीत नाही तो विखरतो. [३१]म्हणून मी तुम्हाला सांगतो, मनुष्यांना प्रत्येक प्रकारच्या पापाची आणि दुर्भाषणाची क्षमा केली जाईल, पण आत्म्याविरुद्धच्या दुर्भाषणाची क्षमा केली जाणार नाही. [३२]आणि जो कोणी मनुष्याच्या पुत्राविरुद्ध काही एखादा शब्द बोलेल त्याची त्याला क्षमा केली जाईल, पण जो कोणी पवित्र आत्म्याविरुद्ध बोलेल त्याची त्याला क्षमा केली जाणार नाही; ह्या युगात नाही, आणि येणाऱ्या युगातही नाही.

[३३]"एकतर झाड चांगलं ठरवा आणि त्याचं फळ चांगलं; नाहीतर झाड कुजकं ठरवा आणि त्याचं फळ कुजकं; कारण झाड त्याच्या फळावरून ओळखलं जातं. [३४]अहो सर्पिणीच्या पिलांनो, तुम्ही वाईट असताना चांगल्या गोष्टी कशा बोलू शकाल? कारण मनात भरलेल्या गोष्टींतून तोंड बोलतं. [३५]चांगला मनुष्य चांगल्या भांडारातून चांगल्या गोष्टी बाहेर काढतो आणि वाईट मनुष्य वाईट भांडारातून वाईट गोष्टी बाहेर काढतो. [३६]पण मी तुम्हाला हे सांगतो की, जो कोणताही निकामी शब्द माणसं बोलतील त्याचा ते न्यायाच्या दिवशी हिशोब देतील. [३७]कारण तू आपल्या शब्दांवरून निर्दोषी ठरशील, आणि आपल्या शब्दांवरून दोषी ठरशील."

[३८]तेव्हा शास्त्र्यांपैकी आणि परोश्यांपैकी काहींनी त्याला उत्तर देऊन म्हटले,

"गुरू, आपल्याकडून काही चिन्ह बघावं अशी आमची इच्छा आहे."

[३९]तेव्हा त्याने त्यांना उत्तर देऊन म्हटले,

"ही दुष्ट आणि व्यभिचारी पिढी चिन्ह मागते; पण योना संदेष्ट्याच्या चिन्हाशिवाय तिला कोणतंच चिन्ह दिलं जाणार नाही. [४०]कारण जसा योना तीन दिवस आणि तीन रात्री मोठ्या माशाच्या पोटात होता तसा मनुष्याचा पुत्र तीन दिवस आणि तीन रात्री पृथ्वीच्या पोटात असेल. [४१]निनवेचे लोक न्यायाच्या वेळी, ह्या पिढीबरोबर उठतील आणि हिला दोषी ठरवतील; कारण त्यांनी योनाच्या उपदेशावरून पश्चात्ताप केला; आणि बघा, योनापेक्षा इथं काही अधिक आहे. [४२]दक्षिणेची राणी न्यायाच्या वेळी, ह्या पिढीबरोबर उठेल आणि हिला दोषी ठरवील; कारण ती पृथ्वीच्या सीमेपासून शलमोनाचं ज्ञानीपण ऐकायला आली; आणि बघा, शलमोनापेक्षा इथं काही अधिक आहे.

[४३]"जेव्हा एखाद्या मनुष्यामधून अशुद्ध आत्मा बाहेर निघतो तेव्हा तो विसावा शोधीत निर्जल ठिकाणांमधून

फिरतो; पण तो त्याला मिळत नाही. ४४तेव्हा तो म्हणतो,
'मी जिथून बाहेर आलो त्या माझ्या घरात मी परत जाईन'.
आणि तो येतो तेव्हा ते त्याला रिकामं, झाडलेलं आणि
सजवलेलं आढळतं. ४५मग तो जातो आणि आपल्यापेक्षा
दुष्ट असलेले आणखी सात आत्मे आपल्याबरोबर घेतो,
आणि ते आत जाऊन तिथं राहतात. आणि त्या मनुष्याची
शेवटची स्थिती पहिल्या स्थितीहून अधिक वाईट होते.
तसं त्या दुष्ट पिढीचं होईल."

४६**आणि तो लोकांशी बोलत** असतानाच, त्याची
आई व त्याचे भाऊ बाहेर उभे होते आणि त्याच्याशी
बोलायची त्यांची इच्छा होती. ४७तेव्हा एक जण त्याला
म्हणाला,

"बघा, आपली आई आणि आपले भाऊ बाहेर उभे आहेत, आणि आपल्याशी बोलायची त्यांची इच्छा आहे."

४८पण ज्याने हे सांगितले त्याला त्याने उत्तर देऊन म्हटले,

"माझी आई कोण आहे? आणि माझे भाऊ कोण आहेत?"

४९आणि आपल्या शिष्यांकडे आपला हात पुढे करून
त्याने म्हटले,

"बघा, माझी आई आणि माझे भाऊ! ५०कारण, जो
कोणी माझ्या स्वर्गातील पित्याच्या इच्छेप्रमाणे करील
तोच माझा भाऊ, माझी बहीण आणि माझी आई."

**१३** **त्याच दिवशी** येशू घरातून बाहेर जाऊन
समुद्राजवळ बसला. २तेव्हा लोकांचे मोठाले
घोळके त्याच्याजवळ एकत्र जमले, म्हणून तो एका
मचव्यात जाऊन बसला; आणि सगळा जमाव
किनाऱ्यावर उभा राहिला.

३आणि त्याने त्यांना दाखल्यांद्वारे पुष्कळ गोष्टी
सांगितल्या आणि तो म्हणाला,

"बघा, एक पेरणारा पेरायला गेला, ४आणि तो पेरीत
असता काही दाणे वाटेच्या कडेला पडले. तेव्हा पक्षी
आले आणि त्यांनी ते खाऊन टाकले. ५काही खडकाळ
ठिकाणी पडले; तिथं त्यांना फार माती नव्हती. आणि ते
लगेच उगवले, कारण त्यांना जमिनीची खोली नव्हती.
६पण सूर्य वर चढला तेव्हा ते करपले, आणि त्यांना मूळ
नव्हतं म्हणून ते वाळून गेले. ७आणि काही काटेऱ्यांत
पडले; आणि काटेरे वाढले, आणि त्यांनी त्यांची वाढ
खुंटवली. ८पण दुसरे चांगल्या जमिनीत पडले, आणि
त्यांनी कुठं शंभरपट, कुठं साठपट, कुठं तीसपट पीक
दिलं. ज्याला कान आहेत तो ऐको."

१०मग शिष्य आले आणि त्याला म्हणाले,

"आपण त्यांच्याशी दाखल्यांत का बोलता?"

११त्याने त्यांना उत्तर देऊन म्हटले,

"स्वर्गाच्या राज्याची रहस्यं जाणणं तुम्हाला दिलेलं
आहे, पण ते त्यांना दिलेलं नाही. १२कारण ज्या
कोणाजवळ आहे त्याला दिलं जाईल आणि त्याच्याजवळ
विपुल होईल. पण ज्या कोणाजवळ नाही, त्याच्याजवळ
जे आहे तेपण त्याच्याकडून काढून घेतलं जाईल.

१३"म्हणून मी त्यांच्याशी दाखल्यांत बोलतो; कारण
ते पाहताना पहात नाहीत, ऐकताना ऐकत नाहीत आणि
विचारही करीत नाहीत. १४आणि यशयाचा संदेश त्यांच्या
बाबतीत पूर्ण होत आहे; तो म्हणतो,

'तुम्ही ऐकून ऐकाल आणि विचार करणार नाही,
तुम्ही पाहून पहाल आणि ओळखणार नाही.
१५कारण ह्या लोकांची मनं जड झाली आहेत,
कान ऐकण्यात मंद आहेत,
आणि त्यांनी आपले डोळे मिटले आहेत;
म्हणजे त्यांनी डोळ्यांनी बघू नये,
कानांनी ऐकू नये,
मनाने विचार करू नये आणि वळू नये,
आणि मी त्यांना बरे करू नये.'

१६पण धन्य तुमचे डोळे कारण ते पहात आहेत आणि
तुमचे कान कारण ते ऐकत आहेत.

१७"कारण मी तुम्हाला सत्य सांगतो, कितीतरी
संदेष्ट्यांनी आणि नीतिमान माणसांनी तुम्ही ज्या गोष्टी
पहात आहा त्या बघायची इच्छा धरली आणि त्यांनी त्या
बघितल्या नाहीत, आणि तुम्ही ज्या गोष्टी ऐकत आहा
त्या ऐकायची इच्छा धरली आणि त्यांनी त्या ऐकल्या
नाहीत.

१८"आता तुम्ही पेरणाऱ्याचा दाखला ऐका; १९जेव्हा
कोणीही राज्याविषयीचं वचन ऐकतो, आणि ते त्याला
समजत नाही तेव्हा तो दुष्ट येतो, आणि त्याच्या मनात
पेरलेलं उचलून नेतो; जो वाटेच्या कडेला पेरला गेला तो
हा आहे. २०आणि खडकाळ ठिकाणी पेरला गेला तो हा
आहे; तो वचन ऐकतो, आणि, लगेच, ते आनंदानं
स्वीकारतो. २१तरी त्याच्यात मूळ नसतं; पण तो

अल्पकाळ टिकतो आणि वचनामुळं संकट किंवा छळ उद्भवताच त्याला अडथळा होतो. [२२]तसाच काटेऱ्यांत पेरला गेला तो हा आहे; तो वचन ऐकतो; आणि ह्या युगाची काळजी आणि धनाची भूल वचनाची वाढ खुंटवतात, आणि तो निष्फळ होतो [२३]आणि चांगल्या जमिनीत पेरला गेला तो हा आहे; तो वचन ऐकतो आणि त्याला ते समजतं, तो फळ देतो, आणि कोणी शंभरपट, कोणी साठपट आणि कोणी तीसपट देतो."

[२४]त्याने दुसरा एक दाखला त्यांच्यापुढे मांडला. तो म्हणाला,

"स्वर्गाचं राज्य असं एका मनुष्यासारखं आहे; त्यानं आपल्या शेतात चांगलं बी पेरलं; [२५]पण लोक झोपले असता त्याचा वैरी आला, त्यानं गव्हात निदणही पेरलं, आणि तो निघून गेला. [२६]पण जेव्हा पाला फुटला आणि बोंड आलं तेव्हा निदणही दिसलं. [२७]तेव्हा घरधन्याचे दास येऊन त्याला म्हणाले, 'धनी, आपण आपल्या शेतात चांगलं बी पेरलं ना? मग निदण कुठून आलं?' [२८]तो त्यांना म्हणाला, 'हे कोणी वैऱ्यानं केलं.' तेव्हा दास त्याला म्हणतात, 'आम्ही जाऊन ते गोळा करावं अशी आपली इच्छा आहे काय?' [२९]पण तो म्हणतो, 'नाही; कदाचित् निदण गोळा करताना तुम्ही त्याबरोबर गहू पण उपटाल. [३०]दोन्हीही कापणीपर्यंत बरोबर वाढू द्या; आणि मी, कापणीच्या वेळी, कापणी करणाऱ्यांना म्हणेन, तुम्ही आधी निदण गोळा करा, आणि ते जाळायला त्याचे भारे बांधा; पण गहू माझ्या कोठारात साठवा.' "

[३१]त्याने दुसरा एक दाखला त्यांच्यापुढे मांडला. तो म्हणाला,

"स्वर्गाचं राज्य हे एका मोहरीच्या बीप्रमाणं आहे; ते एका मनुष्यानं घेतलं आणि आपल्या शेतात पेरलं. [३२]ते, खरोखर, सर्व बियाण्यांहून लहान असतं; पण ते वाढतं तेव्हा सर्व भाज्यांहून मोठं होतं; आणि त्याचं झाड होतं तेव्हा आकाशातले पक्षी येऊन त्याच्या फांद्यांत राहतात."

[३३]त्याने त्यांना आणखी एक दाखला सांगितला,

"स्वर्गाचं राज्य हे खमिराप्रमाणं आहे; ते एका स्त्रीनं घेऊन तीन मापं पिठात दडपलं, तेव्हा ते सगळं फुगलं."

[३४]येशूने लोकांना ह्या सर्व गोष्टी दाखल्यांत सांगितल्या; आणि दाखल्याशिवाय तो त्यांच्याशी काही बोलला नाही. [३५]म्हणजे संदेष्ट्याकडून जे सांगितले होते ते पूर्ण व्हावे. त्याने असे म्हटले आहे की,

'मी दाखल्यांद्वारे आपले तोंड उघडीन,
मी जगाच्या स्थापनेपासून गुप्त ठेवलेल्या
गोष्टी उच्चारीन.'

[३६]मग त्याने लोकांना सोडले आणि तो घरात गेला आणि शिष्य त्याच्याकडे येऊन म्हणाले.

"आम्हाला शेतातल्या निदणाचा दाखला शिकवा."

[३७]आणि त्याने उत्तर देऊन म्हटले,

"चांगलं बी पेरणारा हा मनुष्याचा पुत्र आहे; [३८]शेत हे जग आहे आणि चांगलं बी हे राज्याचे पुत्र आहेत; निदण हे त्या दुष्टाचे पुत्र होत. [३९]आणि ते पेरणारा वैरी सैतान आहे. कापणी युगाची समाप्ती आहे आणि कापणी करणारे देवदूत आहेत. [४०]निदण गोळा करून अग्नीत टाकतात तसं ह्या युगाच्या समाप्तीस होईल. [४१]मनुष्याचा पुत्र आपल्या दूतांना पाठवील आणि ते सर्व अडथळे, आणि अनाचार करणारे असतील त्यांना त्याच्या राज्यामधून गोळा करतील, [४२]आणि अग्नीच्या भट्टीत टाकतील. तिथं रडणं आणि दात खाणं होईल. [४३]मग नीतिमान आपल्या पित्याच्या राज्यात सूर्यासारखे प्रकाशतील. ज्याला ऐकायला कान आहेत तो ऐको.

[४४]"आणि स्वर्गाचं राज्य एका शेतात लपवलेल्या धनाप्रमाणं असं आहे; ते एका मनुष्याला सापडलं आणि त्यानं ते लपवलं; आणि तो आपल्या आनंदात जातो, आपल्याजवळचं सर्व विकतो आणि ते शेत विकत घेतो.

[४५]"पुन्हा स्वर्गाचं राज्य एका व्यापारी मनुष्यासारखं आहे; तो चांगल्या मोत्यांचा शोध करीत असतो. [४६]आणि त्याला एक बहुमोल मोती आढळला; तेव्हा तो गेला, आणि त्यानं आपल्याजवळचं सर्व विकलं आणि तो विकत घेतला.

[४७]"पुन्हा स्वर्गाचं राज्य एका जाळ्याप्रमाणं आहे. ते समुद्रात टाकलं जाऊन त्यात सर्व प्रकारचे मासे जमले [४८]आणि त्यांनी ते भरल्यावर किनाऱ्यावर ओढून आणलं आणि ते बसले. आणि त्यांनी चांगले भांड्यात गोळा केले, पण वाईट दूर फेकून दिले. [४९]तसं ह्या युगाच्या समाप्तीस होईल. देवदूत येतील आणि दुष्टांना नीतिमानांतून वेगळे करतील. [५०]आणि त्यांना अग्नीच्या भट्टीत टाकतील. तिथं रडणं आणि दात खाणं होईल.

[५१]"तुम्हाला ह्या सर्व गोष्टी समजल्या का?"

ते त्याला म्हणतात,

"हो."

[५२]तेव्हा तो त्यांना म्हणाला,

"म्हणून स्वर्गाच्या राज्याचं शिक्षण मिळालेला प्रत्येक
शास्त्री हा आपल्या भांडारातून नवं आणि जुनं काढणाऱ्या
घरधनी मनुष्यासारखा आहे."
५३आणि असे झाले की, येशूने हे दाखले समाप्त केले
तेव्हा तो तेथून निघाला.

५४**आणि तो आपल्या स्वतःच्या** देशात जाऊन
त्यांना त्यांच्या सभास्थानात शिकवू लागला; आणि ते
थक्क होऊन म्हणू लागले,

"ह्याच्यात हे ज्ञानीपण कुठून? आणि हे चमत्कार?
५५हा सुताराचा मुलगा ना? ह्याच्या आईला मरिया
म्हणतात ना? आणि याकोब, योसे, शिमोन आणि यहुदा
ह्याचे भाऊ आहेत ना? ५६आणि ह्याच्या बहिणी सगळ्या
आपल्यात आहेत ना? मग ह्याच्यात ह्या सगळ्या गोष्टी
कुठून?"
५७आणि त्यांना त्याच्याविषयी अडथळा आला. पण येशू
त्यांना म्हणाला,

"कोणीही संदेष्टा आपल्या स्वतःच्या देशात आणि
आपल्या घरी असल्याशिवाय त्याचा अवमान होत
नाही."
५८आणि त्याने तेथे, त्यांच्या अविश्वासामुळे पुष्कळ
चमत्कार केले नाहीत.

१४ **त्या सुमारास मांडलिक** हेरोदाने येशूची
कीर्ती ऐकली, २आणि तो आपल्या सेवकांना
म्हणाला,

"हा बाप्तिस्मा करणारा योहान आहे; हा मेलेल्यांमधून
उठला आहे; आणि म्हणून ह्या शक्ती त्याच्यात कार्य
करीत आहेत."
३कारण हेरोदाने आपला भाऊ फिलिप ह्याची बायको
हेरोदिया हिच्यासाठी योहानाला धरले होते व बेड्या
घालून तुरुंगात टाकले होते. ४कारण योहान त्याला बोलला
होता की, 'आपण ती घ्यावी हे आपल्याला योग्य नाही'.
५आणि त्याची त्याला ठार मारायची इच्छा असताना तो
लोकांना भीत होता. कारण ते त्याला संदेष्टा मानीत. ६पण
हेरोदाचा वाढदिवस आला तेव्हा हेरोदियेच्या मुलीने समोर
नाच करून हेरोदाला संतुष्ट केले ७तेव्हा त्याने शपथ
घेऊन, ती जे मागेल ते तिला द्यायचे वचन दिले. ८तेव्हा
तिला तिच्या आईने पढविले असल्यामुळे ती म्हणते,

"मला, इथं, एका तबकात बाप्तिस्मा करणाऱ्या
योहानाचं शिर द्या."
९तेव्हा राजा दुःखी झाला; पण त्याच्या शपथांमुळे व
त्याच्याबरोबर भोजनास बसलेल्या लोकांमुळे त्याने ते
द्यायची आज्ञा दिली; १०आणि त्याने एकाला तुरुंगात
पाठवून योहानाचा शिरच्छेद करविला. ११आणि त्याचे
शिर एका तबकात घालून त्या मुलीला देण्यात आले;
आणि तिने ते आपल्या आईकडे नेले. १२तेव्हा त्याचे
शिष्य आले, त्यांनी त्याचे शव घेतले आणि त्याला पुरले.
मग ते गेले आणि त्यांनी येशूला सांगितले.

१३**आणि येशूने हे ऐकले** तेव्हा तो तेथून मचव्याने,
एकीकडे, एका रानातल्या जागी गेला. आणि लोकांनी
त्याविषयी ऐकले तेव्हा ते त्या नगरांतून त्याच्या मागोमाग
पायी गेले. १४आणि तो बाहेर आला व त्याने लोकांचा एक
मोठा घोळका बघितला. तेव्हा त्याला त्यांचा कळवळा
आला व त्याने त्यांच्या आजाऱ्यांना बरे केले. १५आणि
संध्याकाळ झाली तेव्हा त्याचे शिष्य त्याच्याकडे येऊन
म्हणाले,

"ही रानातली जागा आहे, आणि घटका निघून गेली
आहे; लोकांना लावून द्या, म्हणजे ते खेड्यांत जाऊन
आपल्या स्वतःसाठी अन्न विकत घेतील."
१६पण येशू त्यांना म्हणाला,

"त्यांना जायची गरज नाही; तुम्ही त्यांना खायला
द्या."
१७तेव्हा ते त्याला म्हणतात,

"इथं आमच्याजवळ पाच भाकरी आणि दोन मासे
आहेत."
१८तेव्हा तो म्हणाला,

"इकडे माझ्याकडे आणा."
१९आणि त्याने लोकांना खाली गवतावर बसवायची आज्ञा
केली; मग त्याने पाच भाकरी व दोन मासे घेऊन
आकाशाकडे वर पाहिले, आणि आशीर्वाद मागून त्यांचे
तुकडे केले; आणि भाकरी शिष्यांजवळ दिल्या व
शिष्यांनी लोकांना दिल्या. २०आणि ते सर्व जण जेवले व
तृप्त झाले. मग त्यांनी बारा करंड्या भरून त्यांतले
राहिलेले तुकडे उचलेले. २१आणि ते सुमारे पाच हजार
पुरुष होते, शिवाय स्त्रिया व मुले होती.
२२आणि, लगेच, येशूने आपल्या शिष्यांना मचव्यात
जाऊन आपल्यापुढे दुसऱ्या बाजूस जायला लावले; आणि

तितक्यात तो लोकांना लावून देणार होता. २३आणि त्याने
लोकांना लावून दिल्यावर तो प्रार्थना करायला, एकीकडे,
डोंगरावर गेला; आणि संध्याकाळ झाली त्यावेळी तो तेथे
एकटा होता.

२४पण मचवा आता समुद्राच्या मध्यभागी होता व
लाटांवर हेलकावत होता; कारण वारा उलट होता.
२५आणि रात्रीच्या चौथ्या प्रहरी, तो त्यांच्याकडे
समुद्रावरून चालत आला. २६आणि शिष्यांनी त्याला
समुद्रावर चालताना बघितले तेव्हा ते अस्वस्थ झाले,
आणि म्हणाले,

"हे भूत आहे!"

आणि ते भीतीने ओरडले. २७पण लगेच येशू त्यांच्याशी
बोलला आणि म्हणाला,

"धीर धरा; मी आहे, भिऊ नका."

२८आणि पेत्राने त्याला उत्तर देऊन म्हटले,

"प्रभू, तो तू असलास तर मला तुझ्याकडे
पाण्यावरून यायची आज्ञा दे."

२९तो म्हणाला,

"ये."

तेव्हा पेत्र मचव्यातून उतरला आणि येशूकडे जायला तो
पाण्यावर चालला. ३०पण त्याने वारा पाहिला तेव्हा तो
भ्याला; आणि बुडू लागला तेव्हा ओरडून म्हणाला,

"प्रभू, मला वाचव."

३१तेव्हा, लगेच येशूने आपला हात पुढे करून त्याला
धरले; आणि तो त्याला म्हणतो,

"अरे तू अल्पविश्वासी, तुला संशय का वाटला?"

३२आणि ते मचव्यात वर आले तेव्हा वारा थांबला. ३३मग
जे मचव्यात होते ते त्याच्या पाया पडून म्हणाले,

"तू खरोखर देवाचा पुत्र आहेस."

३४आणि ते दुसऱ्या बाजूस आले तेव्हा ते
गनेसरेतच्या किनाऱ्यावर आले ३५आणि त्या ठिकाणच्या
लोकांनी त्याला ओळखले तेव्हा त्यांनी आसपासच्या सर्व
प्रांतांत माणसे पाठवली आणि जे आजारी होते अशा
सर्वांना त्याच्याकडे आणले. ३६आणि त्याने त्यांना
आपल्या वस्त्राच्या काठाला केवळ शिवू द्यावे अशी त्यांनी
त्याला विनंती केली, आणि जितके शिवले तितके जण
पूर्ण बरे झाले.

१५ तेव्हा यरुशलेमचे परोशी व शास्त्री
येशूकडे येऊन म्हणाले,

२"आपले शिष्य पूर्वजांची प्रथा का मोडतात? कारण
ते भाकरी खातात तेव्हा ते हात धूत नाहीत."

३आणि त्याने त्यांना उत्तर देऊन म्हटले,

"तुम्हीसुद्धा तुमच्या प्रथेनं देवाची आज्ञा का मोडता?
४कारण देवानं म्हटलं आहे की, 'तू आपल्या बापाला
आणि आईला मान दे'. पण 'जो बापाची किंवा आईची
निंदा करतो त्याने मरणाच्या शिक्षेने मरावे'. ५पण तुम्ही
म्हणता, जो कोणी आपल्या बापाला किंवा आईला
म्हणेल की, 'तुम्हाला माझ्याकडून जे लाभले असते ते
दान झाले आहे', ६तर त्याने आपल्या बापाला किंवा
आईला मान देऊ नये. आणि तुम्ही तुमच्या प्रथेनं देवाचं
वचन रद्द केलंत.

७"अहो ढोंगी, यशयानं तुमच्याविषयी बरोबर संदेश
दिला आहे. त्यानं असं म्हटलं आहे की,

८'हे लोक मला ओठांनी मान देतील,
पण त्यांचे अंतःकरण माझ्यापासून दूर आहे.
९पण ते व्यर्थ मला भजतात,
आणि ते शिकवण म्हणून
मनुष्यांच्या आज्ञा शिकवतात.' "

१०मग त्याने लोकांना आपल्याकडे बोलावले आणि
तो त्यांना म्हणाला,

"ऐका आणि विचार करा. ११जे तोंडात जातं ते
माणसाला विटाळवीत नाही, पण जे तोंडातून बाहेर येतं ते
माणसाला विटाळवितं."

१२तेव्हा शिष्य येऊन त्याला म्हणाले,

"परोश्यांनी हे बोलणं ऐकलं तेव्हा त्यांना अडथळा
झाला हे आपण जाणता काय?"

१३पण त्याने उत्तर देऊन म्हटले,

"माझ्या स्वर्गीय पित्यानं न लावलेलं प्रत्येक रोप
उपटून टाकलं जाईल. १४त्यांना राहू द्या; ते अंधळे
वाटाड्ये आहेत आणि अंधळा अंधळ्याला नेऊ लागला
तर दोघेही खाड्यात पडतील."

१५पण पेत्राने त्याला उत्तर देऊन म्हटले,

"हा दाखला आम्हाला समजावून सांग."

१६आणि तो म्हणाला,

"तुम्हीही अजून अज्ञानी आहा काय? १७जे काही
तोंडातून आत जातं ते पोटात जातं आणि शौचकूपात बाहेर
टाकलं जातं, हे अजून तुम्हाला समजत नाही काय?

[१८]पण तोंडातून निघणाऱ्या गोष्टी अंतःकरणातून बाहेर
येतात, आणि त्या माणसाला विटाळवतात. [१९]कारण
अंतःकरणातून दुष्ट विचार, खून, व्यभिचार, जारकर्म,
चोऱ्या, खोट्या साक्षी आणि दुर्भाषणं निघतात. [२०]ह्या
गोष्टी माणसाला विटाळवतात, पण न धुतलेल्या हातांनी
खाणं माणसाला विटाळवीत नाही."

[२१]**मग येशू तिकडून निघाला** आणि सोर-
सिदोनच्या भागात गेला. [२२]आणि बघा, त्याच प्रांतातून
एक कनानी बाई येऊन ओरडत म्हणाली,

"अहो प्रभू, दावीदपुत्र, माझ्यावर दया करा. माझ्या
मुलीला एक भूत भयंकर त्रास देत आहे."

[२३]पण त्याने तिला एका शब्दानेही काही उत्तर दिले नाही.
तेव्हा त्याचे शिष्य आले आणि त्यांनी त्याला विनंती
करून म्हटले,

"तिला लावून द्या, कारण ती आमच्यामागं ओरडत
आहे."

[२४]पण त्याने उत्तर देऊन म्हटले,

"इस्राएलाच्या घराण्यातल्या हरवलेल्या मेंढरांशिवाय
मला कुणाकडेच पाठवलेलं नाही."

[२५]पण ती आली व त्याच्या पाया पडून म्हणाली,

"प्रभू, मला मदत करा."

[२६]आणि त्याने तिला उत्तर देऊन म्हटले,

"मुलांची भाकर घेऊन पिलांना टाकणं बरोबर नाही."

[२७]आणि ती म्हणते,

"हो, प्रभू, कारण पिलंसुद्धा आपल्या धन्याच्या
मेजावरून पडलेल्या तुकड्यांमधून खातात."

[२८]तेव्हा येशूने तिला उत्तर देऊन म्हटले,

"बाई, तुझा विश्वास मोठा आहे. तुला पाहिजे आहे
ते तुला प्राप्त होवो."

आणि त्याच घटकेपासून तिची मुलगी बरी झाली.

[२९]**मग येशू तिकडून निघाला** व गालील
समुद्राजवळ आला आणि तो एका डोंगरावर जाऊन तेथे
बसला. [३०]आणि लोकांचे मोठाले घोळके त्याच्याकडे
आले. त्यांच्याबरोबर पांगळे, अधू, अंधळे, मुके आणि
तसेच दुसरे पुष्कळ जण होते. त्यांनी त्यांना त्याच्या
पायांपाशी टाकले आणि त्याने त्यांना बरे केले. [३१]आणि
तेव्हा लोकांनी पाहिले की, मुके बोलतात, अधू बरे
होतात, पांगळे चालतात आणि अंधळे पाहतात, तेव्हा
त्यांनी आश्चर्य केले आणि इस्राएलाच्या देवाचे गौरव
केले.

[३२]**मग येशूने आपल्या शिष्यांना** आपल्याकडे
बोलवून म्हटले,

"मला लोकांचा कळवळा येतो, कारण ते आज तीन
दिवस माझ्या जवळ आहेत; आणि त्यांच्याजवळ खायला
काही नाही. त्यांना उपाशी पाठवू नये अशी माझी इच्छा
आहे; नाहीतर, ते वाटेत कासावीस होतील."

[३३]तेव्हा त्याचे शिष्य त्याला म्हणतात,

"एवढ्या मोठ्या जमावाला खाऊ घालायला, रानात
आम्हाला एवढ्या भाकरी कुठून मिळणार?"

[३४]तेव्हा येशू त्यांना म्हणाला,

"तुमच्याजवळ किती भाकरी आहेत?"

आणि ते म्हणाले,

"सात, आणि थोडे लहान मासे."

[३५]तेव्हा त्याने लोकांना खाली जमिनीवर बसायला
सांगितले. [३६]मग त्याने सात भाकरी आणि मासे घेऊन,
उपकार मानून, त्यांचे तुकडे केले आणि आपल्या
शिष्यांजवळ दिले, आणि शिष्यांनी लोकांना दिले.
[३७]तेव्हा ते सर्व जण जेवले व तृप्त झाले. मग त्यांनी
राहिलेल्या तुकड्यांचे सात करंडे भरून उचलले. [३८]आणि
जेवणारे चार हजार पुरुष होते; शिवाय स्त्रिया आणि मुले
होती.

[३९]मग त्याने लोकांना लावून दिले; मग तो मचव्यात
गेला व मगदान प्रांतात आला.

## १६

**आणि परोशी व सदोकी** आले आणि
त्यांनी त्याची परीक्षा करायला त्याला
आकाशातून चिन्ह दाखवायची विनंती केली. [२]पण त्याने
त्यांना उत्तर देऊन म्हटले,

"तुम्ही जेव्हा संध्याकाळ होते तेव्हा म्हणता, 'उघाड
होईल; कारण आकाश लाल आहे.' [३]आणि सकाळी
म्हणता, 'आज झड लागेल, कारण आकाश लाल आणि
गडद आहे.' आकाशाचं रूप कसं ओळखावं हे तुम्ही
जाणता पण काळाची चिन्हं तुम्ही ओळखू शकत नाही.
[४]ही दुष्ट आणि व्यभिचारी पिढी चिन्ह मागते, पण योना
संदेष्ट्याच्या चिन्हाशिवाय तिला कोणतंही चिन्ह दिलं
जाणार नाही."

मग त्याने त्यांना सोडले आणि तो गेला.

५आणि त्याचे शिष्य दुसऱ्या बाजूला आले तेव्हा ते भाकरी घ्यायला विसरले होते. ६तेव्हा येशू त्यांना म्हणाला,

"पहा, परोश्यांच्या आणि सदोक्यांच्या खमिराविषयी जपा."

७तेव्हा त्यांनी आपसात वाद करीत म्हटले,

"आपण भाकरी आणल्या नाहीत."

८पण येशूने हे ओळखले आणि तो त्यांना म्हणाला,

"अहो तुम्ही अल्पविश्वासी, तुमच्याजवळ भाकरी नाहीत, म्हणून तुम्ही आपसात वाद का करता? ९-१०तुम्हाला अजून समजत नाही काय? पाच हजारांच्या पाच भाकरी आणि किती करंड्या तुम्ही उचलल्यात, किंवा चार हजारांच्या सात भाकरी आणि किती करंडे तुम्ही उचललेत हे तुम्हाला आठवत नाही काय? ११मी तुम्हाला भाकरीविषयी बोललो नाही, हे तुम्हाला कसं समजलं नाही? पण परोश्यांच्या आणि सदोक्यांच्या खमिराविषयी जपा."

१२तेव्हा, त्याने त्यांना भाकरीच्या खमिराविषयी काही नाही, पण परोश्यांच्या व सदोक्यांच्या शिक्षणाविषयी जपायला सांगितले होते हे त्यांना समजले.

१३**मग येशू जेव्हा** कैसरिया फिलिपैच्या भागात आला तेव्हा त्याने आपल्या शिष्यांना प्रश्न करून म्हटले,

"मनुष्याचा पुत्र कोण आहे म्हणून लोक म्हणतात?"

१४आणि ते म्हणाले,

"कित्येक म्हणतात, बाप्तिस्मा करणारा योहान, कित्येक एलिया, आणि कित्येक यिर्मया किंवा संदेष्ट्यांतला कोणी आहे असं म्हणतात."

१५तो त्यांना म्हणतो,

"पण मी कोण आहे म्हणून तुम्ही म्हणता?"

१६आणि शिमोन पेत्राने उत्तर देऊन म्हटले,

"तू ख्रिस्त, जिवंत देवाचा पुत्र आहेस."

१७आणि येशूने त्याला उत्तर देऊन म्हटले,

"शिमोना, बर्योना, तू धन्य आहेस. कारण देहानं आणि रक्तानं तुला हे प्रकट केलं नाही पण माझ्या स्वर्गातील पित्यानं केलं आहे. १८आणि मी तुला आणखी सांगतो, तू पेत्र आहेस; मी ह्या खडकावर माझी मंडळी उभारीन, आणि अधोलोकाच्या वेशी तिच्यावर जय मिळवणार नाहीत. १९मी तुला स्वर्गाच्या राज्याच्या किल्ल्या देईन; तू जे पृथ्वीवर बंधनात बांधशील ते स्वर्गात बांधलं जाईल आणि तू जे पृथ्वीवर सोडशील ते स्वर्गात सोडलं जाईल."

२०मग तो ख्रिस्त आहे हे त्यांनी कोणाला सांगू नये म्हणून त्याने त्याच्या शिष्यांना निक्षून सांगितले.

२१**तेव्हापासून येशू आपल्या शिष्यांना** हे प्रगट करू लागला की, त्याने यरुशलेमला जावे आणि वडील, वरिष्ठ याजक आणि शास्त्री ह्यांच्याकडून पुष्कळ सोसावे, आणि मारले जावे, आणि तिसऱ्या दिवशी उठवले जावे हे अगत्य आहे. २२तेव्हा पेत्राने त्याला जवळ घेतले व तो त्याला दटावू लागला आणि म्हणाला,

"प्रभू, स्वतःवर दया कर, तुला असं व्हायचं नाही."

२३पण तो वळला आणि पेत्राला म्हणाला,

"अरे सैताना, माझ्या मागं हो; तू मला अडथळा आहेस. कारण, तू देवाच्या गोष्टींचा विचार करीत नाहीस, पण मनुष्यांच्या गोष्टींचा करतोस."

२४मग येशू आपल्या शिष्यांना म्हणाला,

"जर कोणी माझ्यामागं येऊ इच्छीत असेल तर त्यानं आपल्या स्वतःला नाकारावं आणि आपला वधस्तंभ घेऊन माझ्यामागं यावं. २५कारण जो आपला जीव वाचवू पाहील, तो आपल्या जिवाला मुकेल, पण जो कोणी माझ्याकरता आपल्या जिवाला मुकेल तो आपला जीव वाचवील. २६कारण मनुष्यानं सारं जग मिळवून जर आपला जीव गमावला तर त्याला काय लाभ झाला? किंवा मनुष्य आपल्या जिवाऐवजी काय देईल? २७कारण मनुष्याचा पुत्र आपल्या पित्याच्या गौरवात, आपल्या दूतांबरोबर येईल आणि तो तेव्हा प्रत्येकाला त्याच्या कामाप्रमाणं प्रतिफळ देईल. २८मी तुम्हाला सत्य सांगतो, इथं उभे राहिले आहेत त्यांच्यात कित्येक असे आहेत की, ते मनुष्याच्या पुत्राला त्याच्या राज्यात येताना बघतील तोपर्यंत मरणाचा अनुभव घेणार नाहीत."

# १७

**मग येशू सहा दिवसांनी** पेत्र, याकोब व त्याचा भाऊ योहान ह्यांना बरोबर घेऊन एका उंच डोंगरावर एकीकडे आणतो. २आणि त्यांच्यासमोर त्याचे रूपांतर झाले; त्याची मुद्रा सूर्यासारखी प्रकाशू लागली आणि त्याची वस्त्रे प्रकाशासारखी शुभ्र झाली. ३आणि बघा, त्यांना मोशे आणि एलिया हे त्याच्याशी

बोलताना दिसले. [४]तेव्हा पेत्र बोलला आणि येशूला
म्हणाला,

"प्रभू, आम्ही इथं आहोत हे चांगलं आहे. जर तुझी इच्छा असेल तर मी इथं तीन मंडप करतो, एक तुझ्यासाठी, एक मोशेसाठी आणि एक एलियासाठी."

[५]आणि बघा, तो हे बोलत होता तेवढ्यात, एका तेजस्वी ढगाने त्यांच्यावर छाया केली; आणि बघा, ढगातून एक वाणी म्हणाली,

'हा माझा प्रिय पुत्र आहे,
ह्याच्याविषयी मी संतुष्ट आहे.
ह्याचं ऐका.'

[६]आणि शिष्यांनी हे ऐकले, तेव्हा ते आपल्या
तोंडावर पडले, आणि ते फार भ्याले होते. [७]तेव्हा येशू
आला आणि त्याने त्यांना हात लावून म्हटले,

"उठा, आणि भिऊ नका."

[८]आणि त्यांनी डोळे वर केले तेव्हा त्यांनी एकट्या येशूशिवाय कोणालाही बघितले नाही.

[९]मग ते डोंगरावरून खाली येत असता येशूने त्यांना आज्ञा देऊन म्हटले,

"तुम्ही हा दृष्टान्त मनुष्याचा पुत्र मेलेल्यांतून उठेपर्यंत कोणाला सांगू नका."

[१०]तेव्हा त्याच्या शिष्यांनी त्याला प्रश्न करून म्हटले,

"मग शास्त्री असं का म्हणतात की, एलिया प्रथम आला पाहिजे?"

[११]आणि त्याने त्यांना उत्तर देऊन म्हटले,

"एलिया खरोखर येणार आणि सर्व गोष्टी नीट
करणार. [१२]पण मी तुम्हाला सांगतो, एलिया आधीच
आला असून त्यांनी त्याला ओळखलं नाही, पण त्यांना वाटलं तसं त्यांनी त्याला केलं. त्याचप्रमाणं मनुष्याचा पुत्रपण त्यांचं सोशील."

[१३]तेव्हा शिष्यांना समजले की, तो आपल्याशी बाप्तिस्मा करणाऱ्या योहानाविषयी बोलला होता.

[१४]**मग ते लोकांकडे आल्यावर** एक जण त्याच्याकडे आला व त्याच्यापुढे गुडघे टेकून त्याला म्हणाला,

[१५]"प्रभू, माझ्या मुलावर दया करा; कारण, तो फेफरेकरी आहे, आणि त्याला भयंकर त्रास होतो. तो पुष्कळदा विस्तवात पडतो आणि पुष्कळदा पाण्यात
पडतो. [१६]मी आपल्या शिष्यांकडे त्याला आणलं, आणि,
ते त्याला बरा करू शकले नाहीत."

[१७]तेव्हा येशूने उत्तर देऊन म्हटले,

"अहो, विश्वासहीन आणि विपरीत पिढी, मी कुठवर तुमच्याबरोबर राहू? कुठवर तुमचं सहन करू? त्याला माझ्याजवळ इकडे आण."

[१८]आणि येशूने त्याला दटावले तेव्हा ते भूत त्याच्यामधून निघाले आणि मुलगा त्याच घटकेपासून बरा झाला.

[१९]मग शिष्य येशूकडे एकान्ती येऊन म्हणाले,

"आम्ही का ते काढू शकलो नाही?"

[२०]आणि येशू त्यांना म्हणाला,

"तुमच्या अल्पविश्वासामुळं! मी तुम्हाला सत्य सांगतो, तुमच्यात जर मोहरीच्या दाण्याएवढा विश्वास असेल, तर तुम्ही ह्या डोंगराला म्हणाल, 'इथून पुढच्या जागेवर सरक' आणि तो सरकेल; तुम्हाला काही अशक्य होणार नाही."

[२१-२२]**मग ते गालिलात** एकत्र जमले तेव्हा येशू त्यांना म्हणाला,

"मनुष्याचा पुत्र लोकांच्या हाती धरून दिला जाईल.
[२३]ते त्याला मारतील आणि तिसऱ्या दिवशी तो उठवला
जाईल."

आणि ते सर्व दुःखित झाले.

[२४]**आणि ते कपर्णहूमला आले** तेव्हा मंदिराचा कर घेणारे पेत्राकडे येऊन म्हणाले,

"तुमचे गुरू मंदिराचा कर भरीत नाहीत काय?"

[२५]तो म्हणाला,

"हो."

मग ते घरी आल्यावर येशू प्रथम त्याच्याशी बोलला आणि म्हणाला,

"शिमोना, तुला काय वाटतं? पृथ्वीवरचे राजे कोणाकडून कर किंवा जकात घेतात? स्वतःच्या पुत्रांकडून किंवा परक्यांकडून?"

[२६]आणि तो म्हणाला,

"परक्यांकडून."

तेव्हा येशू त्याला म्हणतो,

"तर मग पुत्र मोकळे आहेत. [२७]पण आपण त्यांना
अडथळा करू नये म्हणून तू समुद्रावर जा, आणि गळ
टाक, आणि जो मासा प्रथम वर येईल तो घे; आणि तू

त्याचं तोंड उघडलंस की, तुला एक शेकेल मिळेल; तो घेऊन तू त्यांना तुझ्या आणि माझ्या वतीनं दे."

## १८

त्याच घटकेस शिष्य येशूकडे येऊन म्हणाले,

"स्वर्गाच्या राज्यात सर्वांत मोठा कोण?"

२आणि त्याने एका बालकाला आपल्याकडे बोलावले व त्याला त्यांच्या मध्यभागी बसवले, आणि म्हटले,

३"मी तुम्हाला सत्य सांगतो, तुमचा पालट होऊन तुम्ही बालकांसारखे झाल्याशिवाय स्वर्गाच्या राज्यात तुम्ही प्रवेश करणार नाही. ४कारण जो कोणी स्वतःला ह्या बालकांप्रमाणे लीन करील तो स्वर्गाच्या राज्यात सर्वांत मोठा आहे.

५"आणि जो कोणी अशा एका बालकाचा माझ्या नावानं स्वीकार करील तो माझा स्वीकार करतो. ६पण जो माझ्यावर विश्वास ठेवणाऱ्या ह्या लहानांतील एकाला अडथळा करील त्याच्या गळ्यात एक मोठ्या जात्याची तळी बांधून त्याला खोल समुद्रात बुडवलं तर त्याच्यासाठी ते हिताचं होईल.

७"अडथळ्यांमुळं जगाला हळहळ! कारण अडथळे येणं अगत्य आहे. पण ज्याच्यामुळं अडथळा येतो त्याला हळहळ! ८आणि जर तुझा हात किंवा पाय तुला अडथळा करीत असेल तर तो कापून टाक आणि आपल्याजवळून फेकून दे, कारण, थोटा किंवा लंगडा होऊन जीवनात जाणं हे दोन हात किंवा दोन पाय घेऊन सार्वकालिक अग्नीत पडण्यापेक्षा तुझ्यासाठी अधिक बरं आहे. ९आणि जर तुझा डोळा तुला अडथळा करीत असेल तर उपटून टाक आणि आपल्याजवळून फेकून दे. कारण, एकडोळ्या होऊन जीवनात जाणं हे दोन डोळे घेऊन नरकाग्नीत पडण्यापेक्षा तुझ्यासाठी अधिक बरं आहे.

१०"पहा, ह्या लहानांतल्या एखाद्याला तुच्छ मानू नका, कारण मी तुम्हाला सांगतो, स्वर्गात असलेले त्यांचे देवदूत माझ्या स्वर्गातील पित्याच्या तोंडाकडे सतत पहात असतात.

११-१२"तुम्हाला काय वाटतं? एखाद्या मनुष्याजवळ जर शंभर मेंढरं आहेत आणि त्यांच्यांतलं एक भटकलं, तर तो ती नव्याण्णव डोंगरावर ठेवून, जे भटकलं आहे त्याला शोधीत जात नाही काय? १३आणि जर असं झालं की, ते त्याला सापडलं, तर, मी तुम्हाला सांगतो, तो न भटकलेल्या नव्याण्णवांपेक्षा त्या एकामुळं अधिक आनंद करील. १४त्याचप्रमाणं, ह्या लहानांतील एखाद्याचा नाश व्हावा अशी तुमच्या स्वर्गातील पित्याची इच्छा नाही.

१५"आणि तुझ्या भावानं जर तुझा अपराध केला, तर जा, आणि तू त्याच्याबरोबर एकटा असताना त्याला त्याचा दोष दाखव. आणि त्यानं जर तुझं ऐकलं तर तू आपला भाऊ मिळवलास. १६पण त्यानं तुझं ऐकलं नाही, तर तू आणखी एकदोघांना आपल्याबरोबर घे; म्हणजे दोन किंवा तीन साक्षींच्या तोंडून प्रत्येक शब्द सिद्ध व्हावा. १७आणि त्यानं त्यांचं ऐकलं नाही, तर मंडळीला सांग; आणि त्यानं मंडळीचं ऐकलं नाही, तर तो तुला परका आणि जकातदार असा होवो. १८मी तुम्हाला सत्य सांगतो, तुम्ही पृथ्वीवर बंधनात बांधाल ते स्वर्गात बांधलं जाईल, आणि तुम्ही जे पृथ्वीवर सोडाल ते स्वर्गात सोडलं जाईल. १९मी तुम्हाला पुन्हा सांगतो की, जर पृथ्वीवर तुमच्यातील दोघे जे मागणार असतील त्याविषयी सहमत होतील, तर माझ्या स्वर्गातील पित्याकडून ते त्यांच्याकरता केलं जाईल. २०कारण दोघे किंवा तिघे जिथं माझ्या नावानं जमले आहेत तिथं त्यांच्यात मी आहे."

२१तेव्हा पेत्र येऊन त्याला म्हणाला,

"प्रभू, माझ्या भावानं किती वेळा माझ्याविरुद्ध पाप करावं, आणि मी त्याला क्षमा करावी? सात वेळा?"

२२आणि येशू त्याला म्हणतो,

"मी तुला म्हणत नाही की, सात वेळा; पण सातांच्या सत्तर वेळा.

२३"म्हणून स्वर्गाचं राज्य असं एका राजासारखं आहे. त्याची आपल्या दासांकडून हिशोब घ्यायची इच्छा होती. २४त्यानं हिशोब घ्यायला आरंभ केल्यावर त्याला दहा हजार तालान्त देणं लागणाऱ्या एकाला त्याच्यापुढं आणलं. २५पण त्याच्याजवळ द्यायला काही नव्हतं, म्हणून त्याच्या धन्यानं आज्ञा केली की, ह्याची तशीच, ह्याच्या बायकोची, ह्याच्या मुलांची, आणि ह्याचं जे काही आहे त्याची विक्री करून फेड करून घ्यावी. २६तेव्हा तो दास पालथा पडला आणि त्याला नमन करून म्हणाला, 'धनी, मला वागवून घ्या, आणि मी आपल्याला सर्व देईन.' २७तेव्हा त्या दासाच्या धन्याला कळवळा येऊन त्यानं त्याला मोकळं केलं, आणि त्याला ते देणं सोडलं. २८पण तो दास बाहेर गेल्यावर त्याला शंभर दिनार देणं लागणारा त्याचा एक जोडीदार-दास त्याला आढळला; तेव्हा त्यानं त्याला धरून त्याची नरडी आवळली आणि

त्याला म्हटलं, 'तू माझं देणं लागतोस ते परत कर.'
[२९]तेव्हा त्याचा जोडीदार-दास पालथा पडला आणि त्यानं
त्याला विनंती करून म्हटलं, 'मला वागवून घे, आणि मी
तुझं सर्व देईन.' [३०]आणि त्याची इच्छा नव्हती; पण तो
गेला आणि तो जे देणं लागत होता ते फेडीपर्यंत त्यानं
त्याला तुरुंगात टाकलं. [३१]म्हणून, हे जे झालं ते त्याच्या
जोडीदार-दासांनी बघितलं तेव्हा ते फार दुःखित होऊन
आले, आणि त्यांनी आपल्या धन्याला हे जे झालं ते
सगळं सांगितलं. [३२]तेव्हा त्याच्या धन्यानं त्याला
आपल्याकडे बोलावलं, आणि तो त्याला म्हणतो, 'अरे
दुष्ट दासा, तू मला विनंती केलीस म्हणून मी तुला ते देणं
सोडलं. [३३]मी तुझ्यावर दया केली तशीच तूपण आपल्या
जोडीदार-दासावर दया करायची नव्हती काय?' [३४]आणि
त्याचा धनी रागावला आणि ते जो देणं लागत होता ते
फेडीपर्यंत त्यानं त्याला जाचणाऱ्यांच्या हाती दिलं. [३५]तसे
तुम्ही, प्रत्येक जण, आपल्या भावाला, आपल्या
मनापासून क्षमा करणार नाही, तर माझा स्वर्गातील पिता
तुम्हालाही तसंच करील."

१९ आणि असे झाले की, येशूने ही वचने
समाप्त केल्यावर तो गालिलातून निघाला,
आणि यार्देनेच्या दुसऱ्या बाजूला यहुदियाच्या प्रांतात
आला. [२]तेव्हा लोकांचे मोठाले घोळके त्याच्या मागोमाग
गेले आणि त्याने त्यांना तेथे बरे केले.

[३]मग परोशी त्याच्याकडे आले, आणि त्यांनी
त्याची परीक्षा करायला त्याला म्हटले,
"कोणी कोणत्याही कारणावरून आपल्या बायकोला
सोडणं योग्य आहे काय?"
[४]आणि त्याने उत्तर देऊन म्हटले,
"तुम्ही हे वाचलं नाही काय की, ज्यानं प्रारंभापासून
त्यांना उत्पन्न केलं त्यानं त्यांना नर आणि नारी असं केलं.
[५]आणि म्हटलं की, 'ह्या कारणामुळे पुरुष आपल्या
बापाला आणि आईला सोडील आणि आपल्या बायकोशी
जडून राहील; आणि ती दोघे एकदेह होतील'? [६]तर मग
ती दोन नाहीत, पण एकदेह आहेत; म्हणून देवानं जे
जोडलं आहे ते मनुष्यानं तोडू नये."
[७]ते त्याला म्हणतात,
"मग सोडचिठ्ठी देऊन तिला सोडायला मोशेनं आज्ञा
का दिली?"
[८]तो त्यांना म्हणतो,
"तुमच्या मनाच्या कठिणपणामुळं, मोशेनं तुम्हाला
तुमच्या बायका सोडायला परवानगी दिली; पण
प्रारंभापासून तसं झालं नाही. [९]आणि मी तुम्हाला सांगतो,
जो कोणी आपल्या बायकोला जारकर्माच्या कारणाशिवाय
सोडील, आणि दुसरीशी लग्न करील तो व्यभिचार करतो."
[१०]तेव्हा शिष्य त्याला म्हणतात,
"पुरुषाचा बायकोशी असा संबंध असेल तर लग्न
करणं बरं नाही."
[११]पण तो त्यांना म्हणाला,
"हे ज्यांना दिलं असेल त्यांच्याशिवाय ते कोणीही
स्वीकारू शकणार नाहीत. [१२]कारण आईच्या उदरापासून
जे तसेच जन्मलेत असे काही षंढ आहेत; माणसांनी
ज्यांना षंढ केलं आहे, असे काही षंढ आहेत; आणि
ज्यांनी स्वतःला स्वर्गाच्या राज्यासाठी षंढ केलं आहे
असेही आहेत. हे ज्याला स्वीकारवेल तो स्वीकारो."

[१३]तेव्हा बालकांना त्याच्याकडे, त्याने त्यांच्यावर
आपले हात ठेवून प्रार्थना करावी म्हणून आणले होते
आणि शिष्यांनी त्यांना दटावले. [१४]पण येशू म्हणाला,
"बालकांना माझ्याकडे येऊ द्या; त्यांना मना करू
नका; कारण स्वर्गाचं राज्य अशांचं आहे."
[१५]आणि त्याने त्यांच्यावर हात ठेवले व तो तेथून गेला.

[१६]तेव्हा बघा, एक जण त्याच्याकडे आला आणि
म्हणाला,
"गुरू, मला सनातन जीवन मिळावं म्हणून मी उत्तम
काय करू?"
[१७]आणि तो त्याला म्हणाला,
"तू मला उत्तम काय त्याविषयी का विचारतोस?
उत्तम एक आहे. पण जीवनात जाऊ इच्छीत असशील तर
आज्ञा पाळ."
[१८]तो त्याला म्हणतो,
"कोणत्या?"
तेव्हा येशू म्हणाला,
" 'खून करू नको, व्यभिचार करू नको, चोरी करू
नको, खोटी साक्ष देऊ नको, [१९]तू आपल्या बापाला आणि

आईला मान दे', आणि 'तू जशी आपल्यावर तशीच
आपल्या शेजाऱ्यावर प्रीती कर.' "
२०तो तरुण मनुष्य त्याला म्हणतो,
"मी ह्या सगळ्या पाळल्या आहेत. अजून माझ्यात
काय कमी आहे?"
२१येशू त्याला म्हणाला,
"तू जर पूर्ण होऊ इच्छीत असशील तर जा,
तुझ्याजवळ जे असेल ते वीक, आणि गरिबांना दे; आणि
तुला स्वर्गात धन मिळेल; चल, माझ्यामागं ये."
२२आणि त्या तरुणाने ते बोलणे ऐकले तेव्हा तो फार
दुःखित होऊन गेला; कारण त्याची मालमत्ता पुष्कळ
होती.
२३तेव्हा येशू आपल्या शिष्यांना म्हणाला,
"मी तुम्हाला सत्य सांगतो, धनवान मनुष्याला
स्वर्गाच्या राज्यात प्रवेश करणं कठिण आहे. २४आणि, मी
तुम्हाला पुन्हा सांगतो, धनवान मनुष्याला देवाच्या
राज्यात प्रवेश करण्यापेक्षा उंटाला सुईच्या नाकातून जाणं
सोपं आहे."
२५आणि शिष्यांनी हे ऐकले तेव्हा ते फार
आश्चर्यचकित होऊन म्हणाले,
"मग कोण तारला जाऊ शकेल?"
२६पण येशूने त्यांच्याकडे न्याहाळून पहात त्यांना म्हटले,
"मनुष्यांना हे अशक्य आहे, पण देवाला सर्व गोष्टी
शक्य आहेत."
२७तेव्हा पेत्राने त्याला उत्तर देऊन म्हटले,
"मग, आम्ही सर्व सोडून तुझ्यामागं आलो आहोत
त्या आम्हाला काय मिळेल?"
२८तेव्हा येशू त्याला म्हणाला,
"मी तुम्हाला सत्य सांगतो, नव्या उत्पत्तीत मनुष्याचा
पुत्र आपल्या गौरवी राजासनावर बसेल, तेव्हा,
माझ्यामागं आलेले तुम्हीसुद्धा बारा राजासनांवर बसाल
आणि इस्राएलाच्या बारा कुळांचा न्याय कराल. २९आणि
माझ्या नावाकरता, घरं किंवा भाऊ किंवा बहिणी, किंवा
बाप किंवा आई किंवा मुलं, किंवा शेतं सोडणाऱ्या प्रत्येक
मनुष्याला अनेकपट अधिक मिळेल आणि सनातन जीवन
हे वतन मिळेल. ३०पण पुष्कळ पहिले शेवटले होतील
आणि शेवटले पहिले होतील.

२० **"कारण स्वर्गाचं राज्य** असं एका घरधनी
मनुष्यासारखं आहे; तो आपल्या द्राक्षमळ्यात
कामकरी लावावेत म्हणून अगदी सकाळीच बाहेर गेला.
२आणि त्याने कामकऱ्यांना दिवसाला एक दिनार
ठरवल्यावर त्यांना आपल्या द्राक्षमळ्यात पाठवलं.
३आणि तो सुमारे तिसऱ्या ताशी बाहेर गेला, तेव्हा त्याला
बाजारपेठेत दुसरे रिकामे उभे राहिलेले दिसले. ४आणि तो
त्यांना म्हणाला, 'तुम्हीपण द्राक्षमळ्यात जा, आणि मी
तुम्हाला योग्य ते देईन.' आणि ते गेले. ५तो पुन्हा सहाव्या
ताशी आणि नवव्या ताशी बाहेर गेला आणि त्यानं तसंच
केलं. ६आणि सुमारे अकराव्या ताशी तो बाहेर गेला आणि
त्याला दुसरे काही रिकामे उभे राहिलेले आढळले, तेव्हा
तो त्यांना म्हणतो, 'तुम्ही दिवसभर रिकामे उभे का
राहिलात?' ७ते त्याला म्हणतात, 'कारण कोणी आम्हाला
कामावर घेतलं नाही.' तो त्यांना म्हणाला, 'तुम्हीपण
द्राक्षमळ्यात जा.' ८मग संध्याकाळ झाली तेव्हा
द्राक्षमळ्याचा धनी आपल्या कारभाऱ्याला म्हणतो,
'कामकऱ्यांना बोलाव आणि शेवटल्यापासून सुरुवात
करून पहिल्यापर्यंत त्यांना मजुरी दे.' ९आणि अकराव्या
ताशी ज्यांना लावलं होतं ते आले, तेव्हा त्यांना प्रत्येकी
एक दिनार मिळाला. १०आणि जेव्हा पहिले आले, तेव्हा
त्यांना वाटलं की, आपल्याला अधिक मिळेल; पण त्यांना
तसाच प्रत्येकी एक दिनार मिळाला. ११आणि त्यांना तो
मिळाला तेव्हा त्यांनी घरधन्याविरुद्ध कुरकुर केली;
१२आणि म्हटलं, 'ह्या शेवटल्यांनी केवळ एक तास काम
केलं आणि आपण त्यांना, ज्या आम्ही दिवसभर ओझं
आणि ऊन सहन केलं त्या आमच्या बरोबरीचं केलं आहे.'
१३पण त्यानं त्यांच्यातल्या एकाला उत्तर देऊन म्हटलं,
'मित्रा, मी तुझा काही अपराध करीत नाही; तू माझ्याशी
एक दिनार ठरवलास ना? १४तुझं तू घे आणि जा. तुला
तसंच ह्या शेवटल्यांना द्यावं अशी माझी इच्छा आहे.
१५मला माझ्या स्वतःच्या गोष्टींत बरं वाटेल ते करायची
मला मोकळीक नाही काय? किंवा मी दयाळू आहे,
म्हणून तुझी दृष्टी दूषित का?' १६म्हणून शेवटले पहिले
होतील आणि पहिले शेवटले होतील."

१७**आणि येशू यरुशलेमला** वर जात असता त्याने
बारा शिष्यांना एकीकडे घेतले आणि तो वाटेत त्यांना
म्हणाला,

[१८]"बघा, आपण यरुशलेमला वर जात आहो, आणि मनुष्याचा पुत्र वरिष्ठ याजकांच्या आणि शास्त्र्यांच्या हाती दिला जाईल. ते त्याला मरणाच्या शिक्षेसाठी दोषी ठरवतील; [१९]आणि त्याला चिडवायला, फटके मारायला आणि वधस्तंभावर खिळायला परजनांच्या हाती देतील; आणि तिसऱ्या दिवशी तो उठवला जाईल."

[२०]**त्यानंतर जब्दीच्या मुलांची आई** आपल्या मुलांबरोबर आली, आणि तिने त्याला नमन करून त्याच्याजवळ काही याचना केली. [२१]तेव्हा तो तिला म्हणाला,

"तुला काय पाहिजे?"

आणि ती त्याला म्हणते,

"तुझ्या राज्यात माझ्या ह्या दोन मुलांनी, एकानं तुझ्या उजवीकडे आणि एकानं डावीकडे बसावं अशी आज्ञा दे."

[२२]पण येशूने उत्तर देऊन म्हटले,

"तुम्ही काय मागता हे तुम्ही जाणत नाही. मी जो प्याला पिणार आहे तो तुम्हाला पिता येईल?"

ते त्याला म्हणतात,

"हो, येईल."

[२३]तो त्यांना म्हणतो,

"तुम्ही खरोखर माझा प्याला प्याल, पण माझ्या उजवीकडे आणि डावीकडे बसायला द्यायचं माझ्या हाती नाही. पण पित्यानं ज्यांच्यासाठी हे सिद्ध केलं आहे, त्यांच्यासाठी ते आहे."

[२४]आणि दहांनी हे ऐकले तेव्हा त्यांना त्या दोन भावांचा राग आला. [२५]पण येशूने त्यांना आपल्याकडे बोलवून म्हटले,

"तुम्ही जाणता की, परजनांचे अधिकारी त्यांच्यावर धनीपण चालवतात, आणि त्यांचे मोठे त्यांच्यावर सत्ता चालवतात; [२६]तरी तुमच्यात तसं होणार नाही; पण तुमच्यात जो कोणी मोठा होऊ इच्छील, त्यानं तुमचा सेवक व्हावं [२७]आणि तुमच्यात जो काणी पहिला होऊ इच्छील त्यानं सर्वांचा दास व्हावं. [२८]तसाच मनुष्याचा पुत्रदेखील सेवा करून घ्यायला नाही, पण सेवा करायला, आणि पुष्कळांसाठी खंडणी म्हणून आपला जीव द्यायला आला."

[२९]**आणि ते यरिहोतून बाहेर** जात असता लोकांचा एक मोठा घोळका त्यांच्या मागोमाग जात होता. [३०]आणि बघा, दोन अंधळे बाहेरच्या रस्त्याच्या कडेला बसले होते; आणि जेव्हा त्यांनी ऐकले की, येशू जवळून जात आहे, तेव्हा ते ओरडून म्हणाले,

"अहो दावीदपुत्र, प्रभू, आमच्यावर दया करा."

[३१]तेव्हा त्यांनी गप्प रहावे म्हणून लोकांनी त्यांना दटावले. पण ते अधिक ओरडून म्हणाले,

"अहो दावीदपुत्र, प्रभू, आमच्यावर दया करा."

[३२]तेव्हा येशू उभा राहिला आणि त्याने त्यांना बोलवून म्हटले,

"तुमच्यासाठी मी काय करावं अशी तुमची इच्छा आहे?"

[३३]ते त्याला म्हणतात,

"प्रभू, आमचे डोळे उघडावेत."

[३४]तेव्हा येशूला कळवळा आला आणि त्याने त्यांच्या डोळ्यांना हात लावला. आणि, लगेच, त्यांना दृष्टी आली व ते त्याच्या मागोमाग गेले.

## २१

आणि जेव्हा ते यरुशलेमकडे, जैतुनांच्या डोंगराजवळील बेथफगेच्या जवळ आले तेव्हा येशूने दोघा शिष्यांना पाठवले, [२]आणि त्यांना म्हटले,

"तुमच्या समोरच्या खेड्यात जा, आणि, लगेच, तुम्हाला एक बांधलेली गाढवी आणि तिच्याबरोबर शिंगरू आढळेल; त्यांना सोडून माझ्याकडे घेऊन या. [३]आणि कोणी तुम्हाला काही म्हणेल तर तुम्ही म्हणा, 'प्रभूला त्यांची गरज आहे' आणि तो ती लगेच पाठवील."

[४]आणि हे ह्यासाठी झाले की, संदेष्ट्याकडून जे सांगितले होते ते पूर्ण व्हावे; त्याने असे म्हटले आहे की,

[५]'तुम्ही सियोनकन्येला सांगा,
बघ, तुझा राजा तुझ्याकडे येत आहे;
तो सौम्य आहे,
तो गाढवावर, आणि हो, शिंगरावर,
गाढवीच्या बच्चावर बसून येत आहे.'

[६]तेव्हा ते शिष्य गेले, आणि येशूने त्यांना सांगितले होते तसे त्यांनी केले, [७]आणि ते गाढवी व शिंगरू घेऊन आले. मग त्यांनी त्यांवर आपली वस्त्रे घातली आणि तो त्यावर बसला. [८]तेव्हा लोकांतील बहुतेकांनी आपली वस्त्रे वाटेवर पसरली आणि इतरांनी झाडांच्या डहाळ्या कापल्या आणि वाटेवर पसरल्या. [९]आणि जे लोक त्याच्या पुढे जात होते आणि जे मागोमाग येत होते ते ओरडून म्हणत होते,

"दाविदाच्या पुत्राला होसान्ना! प्रभूच्या नावानं येणारा
धन्य! ऊर्ध्वलोकी होसान्ना!"
[१०]आणि तो यरुशलेमला आला तेव्हा सर्व नगर हालवले
गेले आणि म्हणू लागले की,
"हा कोण आहे?"
[११]आणि लोक म्हणाले,
"हा गालिलातल्या नासरेथचा संदेष्टा येशू आहे."

[१२]**आणि येशू मंदिरात गेला,** आणि मंदिरात जे
कोणी विकीत होते आणि विकत घेत होते त्या सर्वांना
त्याने बाहेर काढले; त्याने सराफांचे मेज, आणि कबुतरे
विकणाऱ्यांचे चौरंग उलथले. [१३]आणि तो त्यांना म्हणतो,
" 'माझ्या घराला प्रार्थनेचं घर म्हणतील', असं
लिहिलं आहे; पण तुम्ही त्याची लुटारूंची गुहा करता."
[१४]आणि अंधळे व पांगळे त्याच्याकडे मंदिरात
आले, आणि त्याने त्यांना बरे केले. [१५]पण वरिष्ठ याजक
व शास्त्री ह्यांनी मंदिरात त्याने केलेली अद्भुते, आणि
'दाविदाच्या पुत्राला होसान्ना!' असे म्हणत ओरडणारी मुले
बघितली, तेव्हा त्यांना राग आला; [१६]आणि ते त्याला
म्हणाले,
"ही काय बोलतात ते तू ऐकतोस काय?"
आणि येशू त्यांना म्हणतो,
"हो, आणि 'बालकांच्या आणि तान्ह्यांच्या तोंडून तू
स्तुती पूर्ण केलीस' हे तुम्ही कधीच वाचलं नाही काय?"
[१७]मग तो त्यांना सोडून नगराबाहेर बेथानीस गेला; आणि
तेथे वसतीस राहिला.

[१८]**आणि तो सकाळी** नगराकडे मागे जात होता, तेव्हा
भुकेला होता. [१९]आणि त्याने वाटेवर एक अंजिराचे झाड
बघितले; तेव्हा तो त्या झाडाजवळ आला आणि त्याला
त्यावर केवळ पानांशिवाय काही आढळले नाही. तेव्हा तो
त्याला म्हणाला,
"आतापासून पुढील काळात तुझ्यावर फळ न येवो."
आणि, लगेच, ते अंजिराचे झाड वाळून गेले.
[२०]आणि शिष्यांनी हे बघितले तेव्हा त्यांनी आश्चर्य
केले आणि ते म्हणाले,
"हे अंजिराचं झाड लगेच कसं वाळलं?"
[२१]तेव्हा येशूने त्यांना उत्तर देऊन म्हटले,
"मी तुम्हाला सत्य सांगतो, तुमच्यात जर विश्वास
असेल, आणि तुम्ही संशय धरणार नाही, तर तुम्ही हे
अंजिराच्या झाडाला कराल एवढंच नाही, पण, तुम्ही जर
ह्या डोंगराला म्हणाल, 'तू इथून काढला जाऊन समुद्रात
टाकला जा' तर तसं होईल. [२२]आणि तुम्ही ज्या काही
गोष्टी प्रार्थनेत, विश्वास ठेवून मागाल, त्या सर्व तुम्हाला
मिळतील."

[२३]**आणि तो मंदिरात येऊन** शिकवीत असता वरिष्ठ
याजक व लोकांचे वडील त्याच्याकडे येऊन म्हणाले,
"तू कोणत्या अधिकारानं ह्या गोष्टी करतोस? आणि,
कोणी तुला हा अधिकार दिला?"
[२४]आणि येशूने त्यांना उत्तर देऊन म्हटले,
"मीपण तुम्हाला एक गोष्ट विचारतो; तुम्ही मला ती
सांगाल, तर मी ह्या गोष्टी कोणत्या अधिकारानं करतो ते
मी तुम्हाला सागेन. [२५]योहानाचा बाप्तिस्मा हा कुठून
होता? स्वर्गाकडून की, मनुष्यांकडून?"
तेव्हा ते आपआपल्यात वाद करू लागले व म्हणाले,
"आपण म्हटलं, 'स्वर्गाकडून', तर तो आपल्याला
म्हणेल, 'मग तुम्ही त्याच्यावर विश्वास का ठेवला नाही?'
[२६]पण आपण जर म्हटलं, 'मनुष्यांकडून', तर आपण
लोकांना भितो. कारण सर्व जण योहानाला संदेष्टा
मानतात."
[२७]आणि त्यांनी येशूला उत्तर देऊन म्हटले,
"आम्हाला माहीत नाही."
तेव्हा तो त्यांना म्हणाला,
"आणि मी ह्या गोष्टी कोणत्या अधिकारानं करतो ते
मीपण तुम्हाला सांगत नाही.
[२८]"पण तुम्हाला काय वाटतं? एका मनुष्याला दोन
मुलगे होते; आणि तो पहिल्याकडे आला, आणि
म्हणाला, 'बाळ, तू आज द्राक्षमळ्यात जा आणि काम
कर.' [२९]आणि त्यानं उत्तर देऊन म्हटलं, 'मी जाईन,
महाराज'; पण तो गेला नाही. [३०]मग तो दुसऱ्याकडे आला
आणि तसंच म्हणाला; आणि त्यानं उत्तर देऊन म्हटलं,
'माझी इच्छा नाही', पण त्याला मागाहून पश्चात्ताप झाला
आणि तो गेला. [३१]ह्या दोघांतून कोणी आपल्या बापाच्या
इच्छेप्रमाणं केलं?"
ते म्हणतात,
"दुसऱ्यानं."
येशू त्यांना उत्तर देऊन म्हणतो,
"मी तुम्हाला सत्य सांगतो, जकातदार आणि वेश्या
तुमच्या पुढं देवाच्या राज्यात जात आहेत. [३२]कारण

योहान तुमच्याकडे नीतिमत्वाच्या मार्गे आला आणि तुम्ही
त्याच्यावर विश्वास ठेवला नाही. पण जकातदारांनी आणि
वेश्यांनी त्याच्यावर विश्वास ठेवला; आणि तुम्ही
बघितलंत तेव्हा आपण त्याच्यावर विश्वास ठेवावा असा
तुम्हाला मागाहून पश्चात्ताप झाला नाही.
३३"आणखी एक दाखला ऐका; एक घरधनी मनुष्य
होता; त्यानं एक द्राक्षमळा लावला, त्याच्या भोवताली
कुंपण घातलं, त्यानं द्राक्षकुंड खोदलं, माळा बांधला
आणि माळ्यांकडे सोपवून दिला; आणि तो दूरदेशी गेला.
३४आणि फळांचा हंगाम जवळ आला तेव्हा माळ्यांकडून
आपल्याला आपली फळं मिळावीत म्हणून त्यानं
त्यांच्याकडे आपल्या दासांना पाठवलं. ३५तेव्हा त्या
माळ्यांनी त्याच्या दासांना धरलं, एकाला पिटलं,
दुसऱ्याला ठार मारलं आणि आणखी एकाला दगडमार
केला. ३६पुन्हा त्यानं दुसऱ्या दासांना पाठवलं. ते
पहिल्यापेक्षा अधिक होते. आणि त्यांनी त्यांना तसंच
केलं. ३७पण 'ते माझ्या पुत्राला मान देतील', असं म्हणून
त्यानं त्यांच्याकडे आपल्या पुत्राला पाठवलं. ३८पण त्या
माळ्यांनी पुत्राला बघितलं तेव्हा ते एकमेकांस म्हणाले,
'हा वारीस आहे. या, आपण ह्याला ठार मारू आणि त्याचं
वतन घेऊ'. ३९आणि त्यांनी त्याला धरलं, द्राक्षमळ्यातून
बाहेर काढलं आणि ठार मारलं. ४०तर द्राक्षमळ्याचा धनी
येईल तेव्हा तो त्या दासांना काय करील?"
४१ते त्याला म्हणतात,

"तो त्या निर्दय लोकांना निर्दयपणे नष्ट करील आणि
जे त्याला हंगामात फळ देतील अशा दुसऱ्या माळ्यांकडे
द्राक्षमळा सोपून देईल."
४२येशू त्यांना म्हणतो,

"तुम्ही हा शास्त्रलेख कधीच वाचला नाही काय?

'बांधणाऱ्यांनी जो दगड नाकारला
तोच कोपऱ्याचा मुख्य चिरा झाला;
हे परमेश्वराकडून झाले
आणि हे आमच्या डोळ्यांना
आश्चर्यकारक आहे.'

४३म्हणून मी तुम्हाला सांगतो, देवाचं राज्य तुमच्याकडून
काढलं जाईल आणि त्याची फळं देणाऱ्या दुसऱ्या राष्ट्राला
दिलं जाईल. ४४जो कोणी त्या दगडावर पडेल त्याचे तुकडे
होतील पण तो ज्या कोणावर पडेल त्याचा भुगा उडवील."
४५आणि वरिष्ठ याजक व शास्त्री ह्यांनी त्याचे दाखले
ऐकले तेव्हा तो हे आपल्याविषयी बोलला हे त्यांनी
ओळखले; ४६आणि ते त्याला धरायला पहात असता ते
लोकांना भ्याले, कारण तो संदेष्टा आहे असे ते मानीत.

२२ तेव्हा येशूने त्यांना उत्तर दिले, आणि
पुन्हा तो त्यांच्याशी दाखल्यांत बोलून त्यांना
म्हणाला,
२"स्वर्गाचं राज्य असं एका राजासारखं आहे; त्यानं
आपल्या पुत्राच्या लग्नाची जेवणावळ केली, ३आणि
लग्नाच्या जेवणावळीला ज्यांना आमंत्रण केलं होतं त्यांना
बोलवायला आपल्या दासांना पाठवलं; पण त्यांची
यायची इच्छा नव्हती. ४त्यानं पुन्हा दुसऱ्या दासांना
पाठवलं आणि त्यांना म्हटलं, 'ज्यांना आमंत्रण केलं आहे
त्यांना सांगा, बघा, मी भोजन तयार केलं आहे; माझे बैल
आणि पुष्ट पशू मारलेत; सर्व काही तयार आहे; आपण
लग्नाच्या जेवणावळीला या.' ५पण त्यांनी दुर्लक्ष केलं,
आणि ते आपआपल्या मार्गाने गेले; एक आपल्या शेतावर
तर दुसरा आपल्या दुकानदारीवर. ६आणि दुसऱ्यांनी
त्याच्या दासांना धरलं, आणि त्यांची हेलना करून त्यांना
ठार मारलं. ७पण राजा संतापला आणि त्यानं आपल्या
पलटणी धाडल्या; आणि त्या खुन्यांना नष्ट केलं; आणि
त्यांचं नगर जाळलं. ८मग तो आपल्या दासांना म्हणाला,
'लग्नाचं भोजन तयार आहे, पण ज्यांना बोलावलं होतं ते
लायक नव्हते. ९म्हणून बाहेरच्या रस्त्यावरील चौकात
जा, आणि तुम्हाला भेटतील तितक्यांना लग्नाच्या
जेवणावळीला आमंत्रण करा.' १०ते दास बाहेरच्या
रस्त्यावर गेले, आणि त्यांना वाईट आणि चांगले जितके
भेटले तितक्या सगळ्यांना त्यांनी जमवलं, आणि लग्नाची
जेवणावळ पाहुण्यांनी भरली. ११पण राजा पाहुण्यांना
बघायला आत आला तेव्हा लग्नाचा झगा ज्यानं पेहरला
नव्हता असा एक जण त्याला दिसला. १२तेव्हा तो त्याला
म्हणतो, 'मित्रा, तू लग्नाचा झगा घातल्याशिवाय इथं आत
कसा आलास?' आणि तो उगा राहिला. १३तेव्हा राजा
आपल्या सेवकांना म्हणाला, 'ह्याचे हातपाय बांधा आणि
ह्याला बाहेरच्या अंधारात टाका; तिथं रडणं आणि दात
खाणं होईल.' १४कारण बोलावलेले पुष्कळ आहेत पण
निवडलेले थोडे आहेत."

१५तेव्हा परोशी गेले व त्यांनी त्याला बोलण्यात कसे
पकडावे म्हणून मसलत घेतली. १६मग ते आपल्या

शिष्यांना हेरोद्यांबरोबर त्याच्याकडे धाडतात, आणि ते
त्याला म्हणतात,
"गुरू, आम्ही जाणतो की, आपण खरे आहा आणि
देवाचा मार्ग खरेपणानं शिकवता, आणि कोणाची पर्वा
करीत नाही; कारण आपण माणसांचं बाह्यरूप पहात नाही;
१७म्हणून आम्हाला सांगा, आपल्याला काय वाटतं?
कैसराला कर देणं योग्य आहे की नाही?"
१८पण येशूने त्यांचा दुष्टपणा ओळखून त्यांना म्हटले,
"अहो, ढोंग्यांनो, माझी परीक्षा का करता? १९मला
एक कराचं नाणं दाखवा."
आणि त्यांनी त्याला एक दिनार आणून दिला. २०तेव्हा तो
त्यांना म्हणतो,
"हा मुखवटा आणि वरचा लेख कोणाचा आहे?"
२१ते त्याला म्हणतात,
"कैसराचा."
तेव्हा तो त्यांना म्हणतो,
"तर कैसराचं आहे ते कैसराला द्या आणि देवाचं आहे
ते देवाला द्या."
२२लोकांनी हे ऐकून आश्चर्य केले, आणि त्यांनी त्याला
सोडले व ते गेले.
२३त्याच दिवशी, जे पुनरुत्थान नाही असे म्हणतात ते
सदोकी त्याच्याकडे आले आणि त्यांनी त्याला प्रश्न
करून २४म्हटले,
"गुरू, मोशेनं म्हटलं आहे की, जर कोणी मनुष्य
त्याला मुलं नसताना मेला तर त्याच्या भावानं त्याच्या
बायकोशी लग्न करून आपल्या भावासाठी संतान उभं
करावं. २५आता, आमच्यात असे सात भाऊ होते;
पहिल्यानं लग्न केलं आणि तो मेला; आणि त्याला संतान
नसल्यामुळं त्यानं आपली बायको आपल्या भावाला
ठेवली. २६त्याप्रमाणंच दुसरा, आणि तिसरा आणि
सातव्यापर्यंत सगळे मेले; २७आणि त्या सगळ्यांच्या
मागून ती बाईपण मेली. २८तर ती पुनरुत्थानात त्या
सातांतून कोणाची बायको होईल? कारण ती त्या सर्वांची
झाली होती."
२९येशूने त्यांना उत्तर देऊन म्हटले,
"तुम्ही शास्त्रलेख आणि देवाचं सामर्थ्य जाणत नाही,
म्हणून चुकत आहा. ३०कारण ते पुनरुत्थानात लग्न करीत
नाहीत किंवा लग्न करून देत नाहीत. पण स्वर्गातील
देवदूतांसारखे होतात. ३१पण मेलेल्यांच्या पुन्हा
उठण्याविषयी देवानं तुम्हाला सांगितलं आहे ते तुम्ही
वाचलेलं नाही काय? त्यानं म्हटलं आहे की, ३२'मी
अब्राहामाचा देव, इसहाकाचा देव, आणि याकोबाचा देव
आहे.' देव हा मृतांचा देव नाही, पण जिवंतांचा आहे."
३३लोकांनी हे ऐकले तेव्हा ते त्याच्या शिक्षणाने थक्क
झाले.
३४पण त्याने सदोक्यांना गप्प केले हे परोश्यांनी ऐकले
तेव्हा ते एकत्र जमले, ३५आणि त्यांच्यातल्या एका
शास्त्र्याने आपण त्याची परीक्षा करावी म्हणून त्याला
विचारले,
३६"गुरू, नियमशास्त्रात कोणती आज्ञा मोठी आहे?"
३७आणि तो त्याला म्हणाला,
" 'तुझा देव परमेश्वर ह्याच्यावर तू आपल्या पूर्ण
अंतःकरणाने, पूर्ण जिवाने आणि पूर्ण मनाने प्रीती कर';
३८ही मोठी आणि पहिली आज्ञा आहे, ३९आणि
हिच्यासारखी दुसरी ही की, 'तू जशी आपल्यावर तशीच
आपल्या शेजाऱ्यावर प्रीती कर'. ४०ह्या दोन आज्ञांवर सर्व
नियमशास्त्र आणि संदेष्टे अवलंबून आहेत."

४१आता, परोशी एकत्र जमले असता येशूने त्यांना
प्रश्न करून ४२म्हटले,
"तुम्हाला ख्रिस्ताविषयी काय वाटतं? तो कोणाचा
पुत्र आहे?"
ते त्याला म्हणतात,
"दाविदाचा."
४३तो त्यांना म्हणतो,
"मग दावीद आत्म्याने प्रेरित होऊन त्याला प्रभू
म्हणून हे कसं म्हणतो,
४४'परमेश्वर माझ्या प्रभूला म्हणाला,
मी तुझे वैरी तुझे पदासन करीपर्यंत
तू माझ्या उजवीकडे बस.'
४५जर दावीद त्याला प्रभू म्हणतो, तर तो त्याचा पुत्र
कसा?"
४६आणि कोणी त्याला एका शब्दानेही उत्तर देऊ शकला
नाही; आणि त्या दिवसापासून कोणी त्याला आणखी प्रश्न
करायला धजला नाही.

२३ मग येशू लोकांशी व आपल्या शिष्यांशी
बोलू लागला, २आणि म्हणाला,

"शास्त्री आणि परोशी हे मोशेच्या आसनावर बसले
आहेत; ३म्हणून ते तुम्हाला जे काही सांगतील ते तुम्ही
करा आणि पाळा, पण, तुम्ही त्यांच्या कामांप्रमाणं करू
नका; कारण ते बोलतात आणि करीत नाहीत. ४कारण ते
जड ओझी बांधतात आणि माणसांच्या खांद्यांवर
लादतात; पण ते स्वतः ती आपल्या बोटानंही हलवू
इच्छीत नाहीत. ५पण ते आपली सगळी कामं लोकांना
दिसावीत म्हणून करतात. ते आपली संरक्षणचिन्हं रुंद
करतात आणि ते आपल्या झग्यांचे काठ अधिक मोठे
करतात; ६त्यांना जेवणावळींत वरच्या जागा आणि
सभास्थानांत पुढच्या जागा घेणं आवडतं; ७त्यांना
बाजारांत मुजरे घेणं, आणि लोकांकडून रब्बी, रब्बी,
म्हणवून घेणं आवडतं. ८पण तुम्ही रब्बी म्हणवून घेऊ
नका, कारण तुमचा गुरू एक आहे; आणि तुम्ही सगळे
भाऊ आहा. ९आणि पृथ्वीवर कोणाला तुमचा पिता म्हणू
नका; कारण तुमचा पिता एक आहे; तो स्वर्गात आहे.
१०तसेच तुम्ही नेते म्हणवून घेऊ नका; कारण तुमचा नेता
एक आहे, तो ख्रिस्त आहे. ११पण जो तुमच्यात सर्वांत
मोठा आहे त्यानं तुमचा सेवक व्हावं. १२जो कोणी
स्वतःला मोठा करील तो लहान केला जाईल, आणि जो
काणी स्वतःला लहान करील तो मोठा केला जाईल.

१३"पण अहो ढोंगी, शास्त्री आणि परोशी, तुम्हाला
हळहळ! कारण तुम्ही लोकांना स्वर्गाचं राज्य बंद करता;
कारण तुम्ही स्वतः आत जात नाही, आणि जे आत जात
आहेत त्यांनाही तुम्ही आत जाऊ देत नाही.

१४-१५"अहो ढोंगी, शास्त्री आणि परोशी, तुम्हाला
हळहळ! कारण तुम्ही एक अनुयायी करायला,
समुद्रावरून आणि जमिनीवरून, इकडे तिकडे जाता
आणि तो झाल्यावर तुम्ही त्याला आपल्याहून दुप्पट असा
नरकपुत्र करता.

१६"अहो तुम्ही अंधळे वाटाड्ये, तुम्हाला हळहळ!
तुम्ही म्हणता की, कोणी मंदिराची शपथ घेईल तर काही
नाही; पण कोणी मंदिरातल्या सोन्याची शपथ घेईल तर तो
बांधलेला आहे. १७अहो तुम्ही मूर्ख आणि अंधळे, कारण
श्रेष्ठ काय आहे? ते सोनं की सोन्याला पवित्र करणारं
मंदिर? १८आणि कोणी वेदीची शपथ घेईल तर काही
नाही; पण कोणी तीवरील दानाची शपथ घेईल तर तो
बांधलेला आहे. १९अहो तुम्ही अंधळे, कारण श्रेष्ठ काय
आहे? ते दान की दानाला पवित्र करणारी वेदी? २०म्हणून
जो वेदीची शपथ घेईल तो तिची आणि तीवरील सर्व
वस्तूंची शपथ घेतो, २१आणि जो मंदिराची शपथ घेईल तो
त्याची, आणि त्यात जो राहतो त्याची शपथ घेतो.
२२आणि जो स्वर्गाची शपथ घेईल तो देवाच्या राजासनाची
आणि त्यावर जो बसतो त्याची शपथ घेतो.

२३"अहो ढोंगी, शास्त्री आणि परोशी, तुम्हाला
हळहळ! कारण तुम्ही पुदिना, बडीशेप आणि जिरं ह्यांचा
दशमांश देता आणि तुम्ही नियमशास्त्रातील न्याय, दया
आणि विश्वास ह्या अधिक मोठ्या गोष्टी वगळल्या
आहेत; पण, तुम्ही त्या करायच्या होत्या आणि दुसऱ्या
सोडायच्या नव्हत्या. २४अहो तुम्ही अंधळे वाटाड्ये,
तुम्ही मुरकूट गाळून काढता आणि उंट गिळून घेता.

२५"अहो ढोंगी, शास्त्री आणि परोशी, तुम्हाला
हळहळ! तुम्ही आपले प्याले आणि थाळे बाहेरून स्वच्छ
करता पण ते आतून अपहार आणि असंयम ह्यांनी भरलेत.
२६अरे, अंध परोश्या, तुझ्या प्याल्याची आतली बाजू
प्रथम स्वच्छ कर म्हणजे त्याची बाहेरची बाजूही स्वच्छ
होईल.

२७"अहो ढोंगी, शास्त्री आणि परोशी, तुम्हाला
हळहळ! कारण तुम्ही चुना लावलेल्या थडग्यांसारखे
आहा. ती बाहेरून सुंदर दिसतात, पण ती आतून मृतांच्या
हाडांनी, आणि सगळ्या घाणीनं भरलेली असतात.
२८तुम्ही सर्व लोकांना तसेच बाहेरून नीतिमान दिसता पण
आतून ढोंगानं आणि अनाचारानं भरलेले आहात.

२९"अहो ढोंगी, शास्त्री आणि परोशी, तुम्हाला
हळहळ! कारण तुम्ही संदेष्ट्यांच्या कबरा बांधता आणि
नीतिमानांची थडगी सजवता; ३०आणि म्हणता, 'आम्ही
आमच्या पूर्वजांच्या दिवसांत असतो तर संदेष्ट्यांच्या
रक्तात त्यांचे भागीदार झालो नसतो'. ३१तर तुम्ही
संदेष्ट्यांना मारणाऱ्यांचे वंशज आहा, अशी स्वतःविषयी
साक्ष देता. ३२तर तुम्ही आपल्या पूर्वजांचं माप भरा.
३३अहो सर्पांनो, सर्पिणींच्या पिलांनो, तुम्ही नरकाच्या
शिक्षेपासून कसे पळाल? ३४म्हणून, मी तुमच्याकडे संदेष्टे,
ज्ञानी आणि शास्त्री पाठवीत आहे. तुम्ही त्यांच्यातल्या
काहींना ठार माराल, आणि वधस्तंभावर खिळाल, आणि
काहींना तुमच्या सभास्थानांत फटके माराल आणि एका
नगरातून दुसऱ्या नगरात तुम्ही त्यांचा पाठलाग कराल.
३५म्हणजे नीतिमान हाबेल ह्याच्या रक्तापासून तुम्ही
ज्याला वेदी आणि पवित्र स्थान ह्यांच्या मध्यंतरी ठार
मारलंत तो बरख्याचा पुत्र जखर्या ह्याच्या रक्तापर्यंत
पृथ्वीवर पाडलेलं सर्व नीतिमान रक्त तुमच्यावर यावं.

३६मी तुम्हाला सत्य सांगतो, ह्या सर्व गोष्टी ह्या पिढीवर
येतील.

३७"अरे यरुशलेमा, यरुशलेमा, संदेष्ट्यांना ठार
मारणाऱ्या, तुझ्याकडे पाठविलेल्यांना दगडमार
करणाऱ्या, कोंबडी जशी आपल्या पिलांना आपल्या
पंखाखाली एकवट करते, तसं मी तुम्हाला एकवट करावं
अशी किती वेळा माझी इच्छा होती; आणि तुमची इच्छा
नव्हती. ३८बघा, तुमचं घर तुमच्यासाठी सोडलेलं आहे.
३९कारण मी तुम्हाला सांगतो, आतापुढं, 'प्रभूच्या नावानं
येणारा धन्य' असं तुम्ही म्हणाल तोपर्यंत तुम्ही मला
बघणार नाही."

२४ आणि येशू मंदिरातून बाहेर येऊन पुढे
जात होता; आणि त्याचे शिष्य त्याच्याकडे
त्याला मंदिराच्या इमारती दाखवायला आले. २तेव्हा त्याने
त्यांना उत्तर देऊन म्हटले,

"ह्या सर्व गोष्टी तुम्ही पाहता ना? मी तुम्हाला सत्य
सांगतो, इथं पाडला जाणार नाही, असा दगडावर दगड
राहू दिला जाणार नाही."

३मग तो जैतुनांच्या डोंगरावर बसला असता त्याचे
शिष्य त्याच्याकडे एकान्ती येऊन म्हणाले,

"आम्हाला सांगा, ह्या गोष्टी केव्हा होतील? आणि
आपल्या येण्याचं आणि युगाच्या समाप्तीचं चिन्ह काय?"

४आणि येशूने त्यांना उत्तर देऊन म्हटले,

"तुम्हाला कोणी फसवू नये म्हणून जपा. ५कारण
माझ्या नावानं पुष्कळ जण येतील, आणि म्हणतील, 'मी
ख्रिस्त आहे', आणि तुम्हाला फसवतील. ६आणि तुम्ही
लढायांविषयी आणि लढायांच्या अफवा ऐकाल पण तुम्ही
घाबरू नका. कारण ह्या गोष्टी झाल्या पाहिजेत. पण अजून
शेवट नाही; ७कारण राष्ट्र राष्ट्रावर उठेल आणि राज्य
राज्यावर उठेल; आणि जागजागी दुष्काळ उद्भवतील
आणि भूकंप होतील. ८पण ह्या सर्व गोष्टी यातनांचा प्रारंभ
होत.

९"आणि ते तुम्हाला छळणुकीसाठी धरून देतील,
आणि तुम्हाला ठार मारतील. आणि माझ्या नावाकरता
सर्व राष्ट्रं तुमचा द्वेष करतील. १०आणि मग पुष्कळांना
अडथळा होईल. ते एकमेकांना धरून देतील आणि
एकमेकांचा द्वेष करतील. ११पुष्कळ खोटे संदेष्टे उठतील
आणि पुष्कळांना फसवतील. १२आणि अनाचाराची वाढ
होऊन पुष्कळांची प्रीती थंडावेल. १३पण जो शेवटपर्यंत
टिकून राहील तोच तारला जाईल. १४आणि सर्व जगात
सर्व राष्ट्रांना साक्ष म्हणून ही राज्याची सुवार्ता गाजवली
जाईल आणि मग शेवट येईल.

१५"तर दानिएल संदेष्ट्यानं उल्लेखलेली ओसाड
करणारी अमंगळ गोष्ट पवित्र जागी ठेवलेली बघाल,
(वाचणाऱ्याला हे समजावे) १६त्यावेळी जे यहुदियात
असतील त्यांनी डोंगरांत पळावं, १७जो धाब्यावर असेल
त्यानं आपल्या घरातील वस्तू घ्यायला खाली येऊ नये.
१८आणि जो शेतात असेल त्यानं आपला अंगरखा
घ्यायला माघारी परत जाऊ नये. १९पण त्या दिवसांत ज्या
गरोदर असतील किंवा अंगावर पाजीत असतील त्यांना
हळहळ! २०आणि हिवाळ्यात किंवा शब्बाथ दिवशी
तुमची पळापळ होऊ नये म्हणून प्रार्थना करा. २१कारण
जगाच्या प्रारंभापासून आतापर्यंत आलं नाही किंवा कधी
येणार नाही असं मोठं संकट त्यावेळी येईल. २२आणि ते
दिवस जर कमी केले गेले नसते तर कोणीही देही वाचला
नसता. पण ते दिवस निवडलेल्यांसाठी कमी केले
जातील. २३तेव्हा जर कोणी तुम्हाला म्हणेल, 'बघा,
ख्रिस्त इथं आहे' किंवा 'तिथं आहे' तर तुम्ही विश्वास ठेवू
नका. २४कारण खोटे ख्रिस्त आणि खोटे संदेष्टे उपस्थित
होतील, आणि अशी महान चिन्हं आणि अद्भुतं
दाखवतील की, निवडलेल्यांनापण, शक्य तर फसवतील.
२५बघा, मी तुम्हाला अगोदर सांगितलं आहे. २६म्हणून ते
जर तुम्हाला म्हणतील, 'बघा, तो अरण्यात आहे', तर
बाहेर जाऊ नका; 'बघा, आतल्या खोल्यांत आहे' तर
विश्वास ठेवू नका. २७कारण जशी वीज पूर्वेकडून बाहेर
येते आणि पश्चिमेपर्यंत प्रकाशते, तसंच मनुष्याच्या पुत्राचं
येणं होईल. २८कारण मढं तिथं गिधाडं जमतील.

२९"त्या दिवसांतल्या संकटानंतर, लगेच, सूर्य
अंधकारमय होईल, चंद्र आपला प्रकाश देणार नाही,
आकाशातून तारे पडतील आणि आकाशातील शक्ती
थरथरतील. ३०आणि मग आकाशात मनुष्याच्या पुत्राचं
चिन्ह प्रगट होईल, आणि पृथ्वीवरील सर्व वंश आपले ऊर
बडवतील. आणि मग ते मनुष्याच्या पुत्राला
आकाशातल्या ढगांत पराक्रमानं आणि मोठ्या गौरवानं
येताना पाहतील. ३१मग तो कर्ण्याच्या मोठ्या आवाजात
आपल्या देवदूतांना पाठवील, आणि ते त्याच्या

निवडलेल्यांना आकाशाच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत चारी दिशांकडून गोळा करतील.

[३२]"आता, अंजिराच्या झाडावरून त्याचा दाखला शिका. त्याची फांदी टवटवीत होते आणि तिला पानं फुटतात तेव्हा तुम्ही जाणता की, उन्हाळा जवळ आहे. [३३]त्याचप्रमाणं तुम्ही ह्या सर्व गोष्टी बघाल तेव्हा हेही जाणा की, तो जवळ, दाराशी आहे. [३४]मी तुम्हाला सत्य सांगतो, ह्या सर्व गोष्टी पूर्ण होईपर्यंत ही पिढी नाहीशी होणार नाही. [३५]आकाश आणि पृथ्वी नाहीशी होतील पण माझी वचनं नाहीशी होणार नाहीत.

[३६]"पण त्या दिवसाविषयी आणि घटकेविषयी केवळ पित्याशिवाय कोणीही काही जाणत नाही. स्वर्गातले देवदूतही जाणत नाहीत, किंवा पुत्रही जाणत नाही. [३७]कारण नोहाच्या दिवसांप्रमाणं मनुष्याच्या पुत्राचं येणं होईल. [३८]कारण महापुराच्या आधीच्या दिवसांत, नोहा तारवात गेला त्या दिवसापर्यंत, ते खात होते, पीत होते, लग्न करीत होते आणि लग्न करून देत होते; [३९]आणि महापूर येऊन त्यांना घेऊन गेला तोपर्यंत त्यांना कळलं नाही. तसंच मनुष्याच्या पुत्राचं येणं होईल. [४०]तेव्हा दोघे शेतात असतील, एक घेतला जाईल आणि एक ठेवला जाईल. [४१]दोघी जात्यावर दळीत असतील, एक घेतली जाईल आणि एक ठेवली जाईल. [४२]म्हणून जागृत रहा; कारण तुमचा धनी कोणत्या दिवशी येईल हे तुम्ही जाणत नाही. [४३]पण हे जाणा की, कोणत्या प्रहरी चोर येईल हे जर घरधनी जाणत असता तर तो जागृत राहिला असता, आणि त्यानं आपलं घर फोडू दिलं नसतं. [४४]म्हणून तुम्ही तयार व्हा. कारण तुम्हाला वाटत नाही अशा घटकेस मनुष्याचा पुत्र येईल.

[४५]"तर ज्याला त्याच्या धन्यानं आपल्या परिवाराला, त्यांना त्यांचं अन्न वेळेवर द्यावं म्हणून नेमलं आहे तो विश्वासू आणि विचारी दास कोण आहे? [४६]जो दास त्याच्या धन्याला तो येईल तेव्हा तसं करताना आढळेल तो धन्य! [४७]मी तुम्हाला सत्य सांगतो, तो आपल्या सर्व मालमत्तेवर त्याला नेमील. [४८]पण, जर तो दुष्ट दास आपल्या मनात असं म्हणेल की, 'माझा धनी विलंब लावीत आहे', [४९]आणि आपल्या जोडीदार-दासांना मारू लागेल आणि झिंगलेल्यांबरोबर खाऊ पिऊ लागेल, [५०]तर त्या दासाचा धनी तो वाट पहात नाही अशा दिवशी आणि जाणत नाही अशा घटकेस येईल. [५१]तेव्हा तो त्याला कापून काढील आणि ढोंग्यांबरोबर त्याचा वाटा नेमील. तिथं रडणं आणि दात खाणं होईल.

## २५

"तेव्हा स्वर्गाचं राज्य असं, दहा कुमारिकांसारखं होईल. त्यांनी आपले दिवे घेतले आणि त्या वराला भेटायला निघाल्या. [२]त्यांच्यातल्या पाच मूर्ख होत्या आणि पाच शहाण्या होत्या. [३]कारण ज्या मूर्ख होत्या त्यांनी आपले दिवे घेतले आणि आपल्याबरोबर तेल घेतलं नाही. [४]पण ज्या शहाण्या होत्या त्यांनी आपल्या दिव्यांबरोबर आपल्या भांड्यांत तेल घेतलं. [५]आता वराला विलंब लागला तेव्हा त्या सगळ्या डुलक्या घेऊन झोपल्या. [६]मग मध्यरात्रीला हाक येते, 'बघा, वर! त्याला भेटायला बाहेर या.' [७]आणि त्या सगळ्या कुमारिका उठल्या, आणि त्यांनी आपले दिवे नीट केले. [८]तेव्हा मूर्ख शहाण्यांना म्हणाल्या, 'तुमच्या तेलातून आम्हाला द्या; कारण आमचे दिवे विझत आहेत.' [९]पण शहाण्यांनी उत्तर देऊन म्हटले, 'ते तुम्हाला आणि आम्हाला कदाचित् पुरणार नाही; त्यापेक्षा तुम्ही विकणाऱ्यांकडे जा आणि तुमच्यासाठी विकत घ्या.' [१०]आणि त्या विकत घ्यायला गेल्या तेव्हा वर आला; आणि ज्या तयार होत्या त्या त्याच्याबरोबर लग्नाच्या जेवणावळीला आत गेल्या, आणि दार बंद केलं गेलं. [११]नंतर दुसऱ्या कुमारिकाही आल्या आणि म्हणाल्या, 'प्रभू, प्रभू, आमच्यासाठी उघडा', [१२]पण त्यानं उत्तर देऊन म्हटलं, 'मी तुम्हाला सत्य सांगतो, मी तुम्हाला ओळखीत नाही.' [१३]म्हणून जागृत रहा; कारण तुम्ही तो दिवस किंवा ती घटका जाणत नाही.

[१४]"कारण हे दूरदेशी जाणार असलेल्या एका मनुष्याप्रमाणं आहे. त्यानं आपल्या दासांना बोलावून त्यांच्या हाती आपली मालमत्ता दिली. [१५]आणि त्यानं एकाला पाच तालान्त दिले, एकाला दोन, आणि एकाला एक दिला. प्रत्येकाला त्याच्या स्वतःच्या योग्यतेप्रमाणं दिलं, आणि तो दूरदेशी गेला. [१६]ज्याला पाच तालान्त मिळाले होते तो लगेच गेला, आणि, त्यानं त्यांवर व्यापार करून आणखी पाच तालान्त केले. [१७]ज्याला दोन मिळाले होते त्यानं त्याचप्रमाणं आणखी दोन मिळवले. [१८]पण ज्याला एक मिळाला तो गेला, आणि त्यानं जमीन खणून आपल्या धन्याचा पैसा लपवला. [१९]आता, पुष्कळ काळानंतर त्या दासांचा धनी येतो, आणि त्यांचा एकत्र

हिशोब घेतो. २०जेव्हा ज्याला पाच तालान्त मिळाले होते
तो आला, त्यानं आणखी पाच तालान्त आणले, आणि तो
म्हणाला, 'धनी, आपण माझ्या हाती पाच तालान्त दिलेत;
बघा, मी आणखी पाच तालान्त मिळवलेत.' २१त्याचा
धनी त्याला म्हणाला, 'छान, भल्या आणि विश्वासू दासा,
तू थोड्या गोष्टींवर विश्वासू राहिलास, मी तुला पुष्कळ
गोष्टींवर नेमीन; तुझ्या धन्याच्या आनंदात ये.' २२ज्याला
दोन तालान्त मिळाले होते तोपण येऊन म्हणाला, 'धनी,
आपण माझ्या हाती दोन तालान्त दिलेत; बघा, मी
आणखी दोन तालान्त मिळवलेत.' २३त्याचा धनी त्याला
म्हणाला, 'छान, भल्या आणि विश्वासू दासा, तू थोड्या
गोष्टींवर विश्वासू राहिलास; मी तुला पुष्कळ गोष्टींवर
नेमीन. तुझ्या धन्याच्या आनंदात ये.' २४मग ज्याला एक
तालान्त मिळाला होता तो येऊन म्हणाला, 'धनी, मी
आपल्याला ओळखीत होतो की, आपण कठिण मनुष्य
आहा; आपण पेरलं नाही तिथून कापता आणि पसरलं
नाही तिथून गोळा करता. २५म्हणून मी भ्यालो; आणि मी
गेलो, आणि मी आपला तालान्त जमिनीत लपवला. बघा,
हा आपला आपल्याला आहे.' २६त्याच्या धन्यानं त्याला
उत्तर देऊन म्हटलं, 'अरे, दुष्ट आणि आळशी दासा! मी
पेरलं नाही तिथून कापतो आणि पसरलं नाही तिथून गोळा
करतो हे तू जाणत होतास; २७म्हणून तू माझा पैसा
सावकाराकडे द्यायला पाहिजे होता, म्हणजे मी आल्यावर
मला माझा तो व्याजासकट मिळाला असता.' २८'तर तुम्ही
त्याच्याजवळून तो तालान्त घ्या आणि ज्याच्याजवळ दहा
तालान्त आहेत त्याला द्या. २९कारण ज्या कोणाजवळ
आहे त्याला दिलं जाईल आणि त्याच्याजवळ विपुल
होईल. पण ज्याच्याजवळ नाही त्याच्याजवळ जे आहे
तेपण त्याच्याकडून काढून घेतलं जाईल. ३०आणि ह्या
निरुपयोगी दासाला तुम्ही बाहेरच्या अंधारात टाका. तिथं
रडणं आणि दात खाणं होईल.'

३१"पण मनुष्याचा पुत्र आपल्या गौरवात येईल आणि
त्याच्याबरोबर सर्व देवदूत येतील तेव्हा तो आपल्या
गौरवी राजासनावर बसेल; आणि सर्व राष्ट्रं त्याच्यापुढं
जमवली जातील. ३२आणि मेंढपाळ जसा शेरडांतून मेंढरं
वेगळी करतो तसा तो त्यांना एकमेकांतून वेगळे करील;
३३आणि मेंढरांना आपल्या उजवीकडे पण शेरडांना
डावीकडे ठेवील. ३४मग राजा आपल्या उजवीकडच्यांना
म्हणेल, 'या, माझ्या पित्याचे आशीर्वादित! तुमच्यासाठी
जगाच्या स्थापनेपासून तयार केलेलं राज्य वतन घ्या.
३५कारण मी भुकेला होतो आणि तुम्ही मला खायला
दिलंत, मी तान्हेला होतो आणि तुम्ही मला प्यायला
दिलंत; मी परका होतो आणि तुम्ही मला आत घेतलंत,
३६उघडा होतो आणि तुम्ही मला वस्त्र पेहरवलंत, आजारी
होतो आणि माझी भेट घेतलीत, अटकेत होतो आणि
माझ्याकडे आलात.' ३७तेव्हा नीतिमान त्याला उत्तर देऊन
म्हणतील, 'प्रभू, आम्ही कधी तुला भुकेला बघितलं आणि
खायला दिलं, किंवा तान्हेला बघितलं आणि प्यायला
दिलं? ३८कधी तुला परका बघितलं आणि आत घेतलं,
किंवा उघडा बघितलं आणि वस्त्र पेहरवलं? ३९आणि
कधी तुला आजारी किंवा अटकेत असता बघितलं, आणि
तुझ्याकडे आलो?' ४०तेव्हा राजा त्यांना उत्तर देऊन
म्हणेल, 'मी तुम्हाला सत्य सांगतो, तुम्ही ते माझ्या
भावांतल्या, ह्या लहानांतल्या एकाला, ज्याअर्थी केलंत,
त्याअर्थी ते मला केलंत.' ४१मग तो डावीकडच्यांना
म्हणेल, 'अहो तुम्ही शापित झालेले; सैतानासाठी आणि
त्याच्या दूतांसाठी तयार केलेल्या सार्वकालिक अग्नीत
माझ्यापुढून जा. ४२कारण मी भुकेला होतो आणि तुम्ही
मला खायला दिलं नाही, मी तान्हेला होतो आणि तुम्ही
मला प्यायला दिलं नाही. ४३मी परका होतो आणि तुम्ही
मला आत घेतलं नाही, उघडा होतो आणि मला वस्त्र
पेहरवलं नाही, आजारी आणि अटकेत होतो आणि माझी
भेट घेतली नाही.' ४४मग तेपण त्याला उत्तर देऊन
म्हणतील, 'प्रभू, आम्ही कधी तुला भुकेला किंवा
तान्हेला, किंवा परका, किंवा उघडा किंवा आजारी किंवा
अटकेत असताना बघितलं आणि तुझी सेवा केली नाही?'
४५तेव्हा तो त्यांना उत्तर देऊन म्हणेल, 'मी तुम्हाला सत्य
सांगतो, तुम्ही ते ह्या लहानांतल्या एकाला, ज्याअर्थी केलं
नाही, त्याअर्थी ते मला केलं नाही.'

४६"आणि ते सार्वकालिक बंधनात जातील पण
नीतिमान सार्वकालिक जीवनात जातील."

२६ आणि असे झाले की, येशूने ही सर्व
वचने समाप्त केली, तेव्हा तो आपल्या
शिष्यांना म्हणाला,

२"तुम्ही जाणता की, दोन दिवसांनी वल्हांडण सण
येईल, आणि मनुष्याच्या पुत्राला वधस्तंभावर खिळायला
धरून देतील."

[३]**मग वरिष्ठ याजक** आणि लोकांचे वडील हे श्रेष्ठ याजकाच्या वाड्यात जमले. त्याचे नाव कयफा होते. [४]आणि त्यांनी मसलत केली की, आपण येशूला युक्तीने धरावे आणि ठार मारावे. [५]पण ते म्हणाले, 'सणात नको, नाहीतर, लोकांत गलबला होईल.'

[६]**आणि, येशू बेथानीत** कुष्ठरोगी शिमोन ह्याच्या घरात असता [७]तेथे एक स्त्री आली; तिच्याजवळ एक अतिमोलवान सुवासिक तेलाची कुपी होती, आणि तो भोजनास बसला असता तिने ते त्याच्या मस्तकावर ओतले. [८]पण त्याच्या शिष्यांनी ते बघितले तेव्हा त्यांना राग आला, आणि ते म्हणाले,

"असा नाश कशाला? [९]हे पुष्कळ किंमतीला विकता आलं असतं, आणि गरिबांना देता आलं असतं."

[१०]येशूला हे कळले तेव्हा तो त्यांना म्हणाला,

"तुम्ही त्या बाईला का त्रास देता? कारण, तिनं माझ्यावर एक उचित क्रिया केली आहे. [११]कारण गरीब तुमच्याबरोबर नेहमी आहेत, पण मी तुमच्याबरोबर नेहमी नसणार. [१२]कारण तिनं माझ्या शरिरावर हे सुवासिक तेल ओतलं ते तिनं मला पुरता यावं म्हणून केलं. [१३]मी तुम्हाला सत्य सांगतो, साऱ्या जगात, जिथं कुठं, ही सुवार्ता गाजवली जाईल, तिथं हेही, जे तिनं केलं आहे ते तिच्या स्मरणार्थ सांगितलं जाईल."

[१४]**तेव्हा ज्याला यहुदा इस्कार्योत** म्हणत तो बारांतला एक जण वरिष्ठ याजकाकडे गेला, [१५]आणि म्हणाला,

"तुमची मला काय द्यायची इच्छा आहे? आणि मी त्याला तुमच्या हाती देईन."

आणि त्यांनी त्याला तीस शेकेल देऊ केले. [१६]आणि त्या घटकेपासून तो त्याला धरून द्यायची संधी पाहू लागला.

[१७]**आता, बेखमीर भाकरींच्या** सणाच्या पहिल्या दिवशी शिष्य येशूकडे येऊन त्याला म्हणाले,

"आम्ही आपल्यासाठी वल्हांडणाचं भोजन करायची कुठं तयारी करावी अशी आपली इच्छा आहे?"

[१८]आणि तो म्हणाला,

"तुम्ही नगरात अमुक मनुष्याकडे जा; आणि त्याला सांगा, 'गुरू म्हणतात की, माझी वेळ जवळ आली आहे; मी माझ्या शिष्यांबरोबर आपल्याकडे वल्हांडण करीन'."

[१९]आणि येशूने शिष्यांना ठरवून दिल्याप्रमाणे त्यांनी केले, आणि त्यांनी वल्हांडणाची तयारी केली.

[२०]आणि संध्याकाळ झाली तेव्हा तो बारा शिष्यांबरोबर भोजनास बसला होता; [२१]आणि ते जेवत असता तो त्यांना म्हणाला,

"मी तुम्हाला सत्य सांगतो, तुमच्यातला एक जण मला धरून देईल."

[२२]तेव्हा ते फार दुःखित झाले आणि त्यांच्यातला प्रत्येक त्याला म्हणू लागला,

"प्रभू, तो मी तर नाही?"

[२३]आणि त्याने त्यांना उत्तर देऊन म्हटले,

"ज्यानं माझ्याबरोबर थाळीत हात भिजवला तोच मला धरून देईल. [२४]मनुष्याचा पुत्र तर, त्याच्याविषयी लिहिल्याप्रमाणं जात आहे, पण ज्या मनुष्याकडून मनुष्याचा पुत्र धरून दिला जाईल त्याला हळहळ! तो मनुष्य जन्मला नसता तर त्याच्यासाठी ते बरं झालं असतं."

[२५]मग, ज्याने त्याला धरून दिले त्या यहुदाने उत्तर देऊन म्हटले,

"रब्बी, तो मी तर नाही?"

तो त्याला म्हणाला,

"तू म्हणालास."

[२६]आणि ते जेवत असता येशूने भाकर घेतली आणि आशीर्वाद मागून मोडली, आणि शिष्यांना देऊन म्हटले,

"घ्या, खा, हे माझं शरीर आहे."

[२७]आणि त्याने प्याला घेतला आणि उपकार मानले, आणि तो त्यांना दिला आणि म्हटले,

"तुम्ही सगळे जण ह्यातून प्या. [२८]कारण हे माझं कराराचं रक्त आहे. हे पापांच्या क्षमेसाठी पुष्कळांसाठी ओतलेलं आहे. [२९]आणि मी तुम्हाला सांगतो, मी माझ्या पित्याच्या राज्यात तुमच्याबरोबर नवा पिईन त्या दिवसापर्यंत मी, ह्यापुढं, हा द्राक्षीचा उपज पिणार नाही."

[३०]आणि त्यांनी एक गीत गाइल्यावर ते जैतुनांच्या डोंगराकडे निघाले.

[३१]**तेव्हा येशू त्यांना म्हणतो,**

"आज रात्री, माझ्यामुळं, तुमच्यातील सगळ्यांना अडथळा होईल; कारण असं लिहिलं आहे की, 'मी मेंढपाळाला मारीन आणि कळपातील मेंढरं पांगतील'.

३२पण मी पुन्हा उठविला जाईन तेव्हा तुमच्या पुढं
गालिलात जाईन."
३३पण पेत्राने उत्तर देऊन त्याला म्हटले,
"सगळ्यांना तुझ्यामुळं अडथळा झाला तरी मला
कधीच अडथळा होणार नाही."
३४येशू त्याला म्हणाला,
"मी तुला सत्य सांगतो, ह्या रात्री, कोंबडा
आरवायच्या आधी, तू मला तीनदा नाकारशील."
३५पेत्र त्याला म्हणतो,
"मला तुझ्याबरोबर मरावं लागलं तरी मी तुला
नाकारणार नाही."
तसेच सगळे शिष्यही म्हणाले.

३६मग येशू त्यांना घेऊन गेथशेमाने नावाच्या बागेत
येतो, आणि आपल्या शिष्यांना म्हणतो,
"मी पुढं जाऊन प्रार्थना करतो तोपर्यंत तुम्ही इथं
बसा."
३७मग त्याने पेत्र आणि जब्दीचे दोघे पुत्र ह्यांना
आपल्याबरोबर घेतले आणि तो खिन्न व कासावीस होऊ
लागला; ३८तेव्हा तो त्यांना म्हणतो,
"माझा जीव फार दुःखित, मरणोन्मुख झाला आहे.
इथं थांबा, आणि माझ्याबरोबर जागे रहा."
३९आणि तो थोडासा पुढे गेला, आणि तोंडावर पडला,
आणि प्रार्थना करीत म्हणाला, 'माझ्या बापा, हे शक्य
असल्यास हा प्याला माझ्यापुढून निघून जाऊ दे; पण
माझी इच्छा आहे ते नको, तर तुझी इच्छा आहे ते होवो.'
४०मग तो शिष्यांकडे येतो आणि त्याला ते झोपलेले
आढळतात. तेव्हा तो पेत्राला म्हणतो,
"काय तुम्हाला माझ्याबरोबर, घटकाभर जागता
आलं नाही? ४१तुम्ही परीक्षेत येऊ नये म्हणून जागे रहा
आणि प्रार्थना करा. आत्मा खरोखर उत्सुक आहे पण देह
अशक्त आहे."
४२तो पुन्हा दुसऱ्या वेळी गेला आणि प्रार्थना करीत
म्हणाला, 'माझ्या बापा, मी हा प्यायल्याशिवाय हा निघून
जाणार नसेल तर तुझ्या इच्छेप्रमाणं होवो.'
४३मग तो पुन्हा आला आणि त्याला ते झोपलेले आढळले
कारण त्यांचे डोळे जड झाले होते.
४४मग तो पुन्हा त्यांना सोडून गेला, आणि तिसऱ्या
वेळी त्याने तेच शब्द बोलून प्रार्थना केली. ४५मग तो
शिष्यांकडे येतो व त्यांना म्हणतो,
"आता झोपा आणि विसावा घ्या. बघा, घटका
जवळ आली आहे; आणि मनुष्याचा पुत्र पाप्यांच्या हाती
धरून दिला जात आहे. ४६उठा, चला. बघा, मला धरून
देणारा जवळ आला आहे."

४७आणि बघा, तो बोलत असतानाच बारा
जणांतला यहुदा आला, आणि वरिष्ठ याजक व लोकांचे
वडील ह्यांच्याकडून एक लोकांचा मोठा घोळका, तरवारी
व काठ्या घेऊन त्याच्याकडे आला. ४८आणि त्याला
धरून देणाऱ्याने त्यांना खूण देऊन म्हटले होते की, 'मी
ज्याचं चुंबन घेईन तोच तो आहे; त्याला धरा.' ४९आणि
लगेच, तो येशूकडे आला आणि म्हणाला,
"रब्बी, जयजय!"
आणि त्याने त्याचे मुके घेतले. ५०तेव्हा येशू त्याला
म्हणाला,
"मित्रा, तू कशाला आलास?"
तेव्हा ते आत आले आणि त्यांनी येशूवर हात टाकले व
त्याला धरले. ५१आणि बघा, येशूबरोबर जे लोक होते
त्यांच्यातल्या एकाने हात लांबवून आपली तरवार उपसली
आणि श्रेष्ठ याजकाच्या दासावर वार करून त्याचा कान
कापून टाकला. ५२तेव्हा येशू त्याला म्हणतो,
"तुझी तरवार तिच्या जागी परत घाल. कारण सगळे
तरवार धरणारे तरवारीनं नाश पावतील, ५३किंवा तुला
कळलं नाही की, मी माझ्या पित्याजवळ मागू शकतो
आणि लगेच तो मला देवदूतांच्या बाराहून अधिक सेना
देईल? ५४मग हे असं झालं पाहिजे असे शास्त्रलेख आहेत
ते कसे पूर्ण होतील?"
५५येशू त्याच घटकेस त्या जमलेल्यांना म्हणाला,
"तुम्ही मला धरायला, जणू एखाद्या चोरावर, तरवारी
आणि काठ्या घेऊन आलात काय? मी दररोज मंदिरात
शिकवीत बसत होतो आणि तुम्ही मला धरलं नाही. ५६पण
संदेष्ट्यांचे शास्त्रलेख पूर्ण झाले पाहिजेत, म्हणून हे सर्व
झालं आहे."
मग सगळ्या शिष्यांनी त्याला सोडले आणि ते पळाले.

५७आणि, ज्यांनी येशूला धरले होते त्यांनी त्याला
श्रेष्ठ याजक कयफा ह्याच्याकडे नेले. तेथे शास्त्री आणि
वडील जमले होते. ५८पण पेत्र दुरून, त्याच्या मागोमाग,
श्रेष्ठ याजकाच्या वाड्यापर्यंत आला, आणि आत जाऊन
शेकत बसायला, कामदारांच्या जवळ बसला.

५९मग वरिष्ठ याजकांनी व संपूर्ण न्यायसभेने येशूला
मरणाची शिक्षा द्यावी म्हणून त्याच्याविरुद्ध खोटे साक्षी
मिळवू पाहिले. ६०आणि, पुष्कळ खोटे साक्षी आले तरी
त्यांना त्यांच्याकडून काही मिळेना. पण नंतर दोघे जण पुढे
आले आणि म्हणाले,

६१"ह्यानं असं म्हटलं की, 'मी देवाचं मंदिर मोडायला
आणि ते तीन दिवसांत उभारायला समर्थ आहे.' "
६२तेव्हा श्रेष्ठ याजक उभा राहिला व त्याला म्हणाला,

"तू काहीच उत्तर देत नाहीस; हे काय तुझ्याविरुद्ध
साक्ष देत आहेत?"
६३पण येशू उगा राहिला. तेव्हा श्रेष्ठ याजक त्याला
म्हणाला,

"मी तुला जिवंत देवाची शपथ घालतो, तू आम्हाला
सांग; तू काय ख्रिस्त, देवाचा पुत्र आहेस?"
६४येशू त्याला म्हणतो,

"तुम्ही म्हणालात! तरी मी तुम्हाला सांगतो, तुम्ही
ह्यापुढं पहाल की, मनुष्याचा पुत्र सामर्थ्याच्या उजवीकडे
बसला आहे, आणि आकाशातल्या ढगांवर येत आहे."
६५तेव्हा श्रेष्ठ याजकाने आपली वस्त्रे फाडली आणि तो
म्हणाला,

"ह्यानं दुर्भाषण केलं आहे. आपल्याला आणखी
साक्षींची काय गरज? बघा, तुम्ही आता त्याचं दुर्भाषण
ऐकलंत. ६६तुम्हाला काय वाटतं?"
आणि त्यांनी उत्तर देऊन म्हटले,

"तो मरणाच्या शिक्षेस पात्र आहे."

६७तेव्हा ते त्याच्या तोंडावर थुंकले, त्यांनी त्याला
बुक्क्या मारल्या, आणि दुसऱ्यांनी त्याला चपडाका
मारल्या. ६८आणि ते म्हणाले,

"अरे ख्रिस्ता, आमच्यासाठी भाकीत कर, तुला
मारणारा कोण आहे?"

६९आणि पेत्र बाहेर वाड्यात बसला होता. आणि एक
दासी त्याच्याकडे येऊन म्हणाली,

"तूपण गालिली येशूबरोबर होतास."
७०पण त्याने त्या सर्वांसमोर नाकारले व म्हटले,

"तू काय म्हणतेस ते मी जाणत नाही."
७१आणि तो बाहेर देवडीवर गेला तेव्हा दुसरीने त्याला
बघितले आणि ती तेथील लोकांना म्हणाली,

"हापण नासोरी येशूबरोबर होता."
७२तेव्हा त्याने पुन्हा शपथ घेऊन नाकारले,

"मी त्या माणसाला ओळखीत नाही."

७३आणि जे जवळ उभे होते ते थोड्या वेळाने येऊन
पेत्राला म्हणाले,

"तू खरोखर त्यांच्यातला आहेस. कारण तुझं बोलणं
तुला उघड करतं."
७४तेव्हा त्याने शाप उच्चारीत शपथ घेतली,

"मी त्या माणसाला ओळखीत नाही."
आणि लगेच कोंबडा आरवला.

७५आणि येशूने पेत्राला म्हटले होते की, 'कोंबडा
आरवायच्या आधी तू मला तीनदा नाकारशील', ते त्याचे
वचन त्याला आठवले; तेव्हा तो बाहेर जाऊन दुःखाने
रडला.

## २७

आणि सकाळ झाली तेव्हा सर्व वरिष्ठ
याजकांनी व लोकांच्या वडिलांनी येशूला
मरणाची शिक्षा द्यायला त्याच्याविरुद्ध मसलत घेतली.

२आणि त्यांनी त्याला बांधून नेले व सुभेदार
पिलाताच्या स्वाधीन केले.

३तेव्हा, ज्या यहुदाने त्याला धरून दिले होते त्याने
जेव्हा बघितले की, त्याला दोषी ठरविण्यात आले तेव्हा
त्याची वृत्ती बदलली आणि त्याने वरिष्ठ याजकांकडे
आणि वडिलांकडे ते तीस शेकेल परत आणले ४आणि
म्हटले,

"मी निर्दोष जिवाला धरून देऊन पाप केलं आहे."
तेव्हा ते म्हणाले,

"आम्हाला त्याचं काय? तू ते पहा!"
५मग त्याने ते पैसे मंदिरात टाकले, तो निघून गेला; आणि
त्याने स्वतःला गळफास लावून घेतला.

६तेव्हा वरिष्ठ याजकांनी ते पैसे घेऊन म्हटले,

"हे दानकोशात टाकणं योग्य नाही, कारण हे रक्ताचं
मोल आहे."
७तेव्हा त्यांनी मसलत घेतली आणि त्यातून परक्यांना
पुरायला कुंभाराचे शेत विकत घेतले. ८म्हणून आजपर्यंत
त्या शेताला रक्ताचे शेत असे म्हणत होते. ९तेव्हा यिर्मया
संदेष्ट्याच्या द्वारे जे सांगितले होते ते पूर्ण झाले. त्याने
म्हटले आहे की,

'आणि इस्राएलाच्या काही वंशजांनी
ज्याचे मोल ठरवले होते,
त्याचे मोल, ते तीस शेकेल, त्यांनी घेतले.
१०आणि परमेश्वराने मला आज्ञा दिल्याप्रमाणे

त्यांनी ते कुंभाराच्या शेतासाठी दिले.'

११आणि येशू सुभेदारापुढे उभा राहिला, आणि
सुभेदाराने त्याला प्रश्न करून म्हटले,
"तू यहुद्यांचा राजा आहेस काय?"
आणि येशू त्याला म्हणाला,
"आपण म्हणाला."
१२आणि जेव्हा वरिष्ठ याजक आणि वडील त्याच्यावर
आरोप करू लागले तेव्हा त्याने काहीच उत्तर दिले नाही.
१३तेव्हा पिलात त्याला म्हणाला,
"तुला ऐकू येत नाही? हे किती गोष्टींची तुझ्याविरुद्ध
साक्ष देत आहेत?"
१४आणि त्याने त्याला उत्तर दिले नाही, त्यांच्या एकाही
आरोपाला नाही. त्यामुळे सुभेदाराने फार आश्चर्य केले.
१५आता ह्या सणात, लोकांसाठी, सुभेदार आपल्या
परिपाठास अनुसरून त्यांची इच्छा असेल त्या
बंदिवानाला सोडीत असे. १६आणि तेव्हा त्यांच्याजवळ
बरब्बा नावाचा एक प्रसिद्ध बंदिवान होता. १७म्हणून ते
एकत्र जमले असता पिलात त्यांना म्हणाला,
"मी तुमच्यासाठी कोणाला सोडावं अशी तुमची
इच्छा आहे? बरब्बाला की, ज्याला ख्रिस्त म्हणतात त्या
येशूला?"
१८कारण त्याला कळले होते की, त्यांनी त्याला मत्सराने
धरून दिले होते.
१९तो न्यायासनावर बसला असता त्याच्या पत्नीने
त्याला निरोप पाठवून कळवले, 'तुमचा आणि त्या
नीतिमान मनुष्याचा संबंध नको, कारण मी त्याच्यामुळं
आज स्वप्नात पुष्कळ गोष्टी सोसल्यात.'
२०आता त्यांनी बरब्बाला मागावे आणि येशूला नष्ट
करावे, म्हणून वरिष्ठ याजक आणि वडील ह्यांनी लोकांचे
मन वळवले. २१पण सुभेदाराने त्यांना उत्तर देऊन म्हटले,
"मी ह्या दोघांतून तुमच्यासाठी कोणाला सोडावं अशी
तुमची इच्छा आहे?"
आणि ते म्हणाले,
"बरब्बाला."
२२पिलात त्यांना म्हणतो,
"मी मग, ख्रिस्त म्हटलेल्या येशूचं काय करावं?"
ते सगळे म्हणतात,
"त्याला वधस्तंभावर खिळा."
२३आणि तो म्हणाला,
"का? त्यानं काय वाईट केलं आहे?"
पण ते आणखीच ओरडून म्हणाले,
"त्याला वधस्तंभावर खिळा."
२४म्हणून पिलाताने जेव्हा बघितले की, आपले काही
चालत नाही, पण उलट गलबला होत आहे, तेव्हा त्याने
पाणी घेतले, आणि लोकांपुढे हात घुतले व म्हटले,
"ह्या नीतिमान माणसाच्या रक्ताविषयी मी निर्दोष
आहे. तुम्ही पहा."
२५आणि सगळे लोक उत्तर देऊन म्हणाले,
"त्याचं रक्त आमच्यावर आणि आमच्या मुलांवर!"
२६तेव्हा त्याने त्यांच्यासाठी बरब्बाला सोडले; पण त्याने
येशूला फटके मारले व त्याला वधस्तंभावर खिळायला
सोपवून दिले.
२७तेव्हा सुभेदाराचे शिपाई येशूला वाड्यात घेऊन
गेले आणि त्यांनी त्याच्यासाठी सगळी तुकडी जमवली.
२८त्यांनी त्याचे कपडे काढून त्याला एक किरमिजी झगा
घातला २९आणि एक काट्यांचा मुगूट गुंफून त्याच्या
मस्तकावर घातला व त्याच्या उजव्या हातात एक वेत
दिला. आणि त्याच्यापुढे गुडघा वाकवून, त्यांनी त्याला
चिडवून म्हटले, 'जयजय! यहुद्यांचे राजे!' ३०आणि ते
त्याच्यावर थुंकले, आणि त्यांनी तो वेत घेऊन त्याच्या
मस्तकावर मारले. ३१आणि त्याला चिडवल्यावर त्यांनी
त्याच्यावरून तो झगा काढला व त्याला त्याचे कपडे
पेहरवून त्याला वधस्तंभावर खिळायला नेले.

३२आणि ते बाहेर आले तेव्हा त्यांना एक, शिमोन
नावाचा, कुरेनेकर मनुष्य भेटला. त्यांनी त्याला
आपल्याबरोबर त्याचा वधस्तंभ घेऊन जायला वेठीस
धरले. ३३आणि ते गुलगुथा, म्हणजे कवटीचे ठिकाण,
असे म्हटलेल्या जागी आले, ३४तेव्हा त्यांनी त्याला पित्त
मिसळलेला द्राक्षारस प्यायला दिला; पण त्याने तो
चाखल्यावर त्याला तो प्यायची इच्छा होईना. ३५आणि
त्याला वधस्तंभावर खिळल्यावर त्यांनी त्याचे कपडे
चिठ्या टाकून वाटून घेतले. ३६आणि ते तेथे बसले व
त्यांनी त्याच्यावर पहारा केला. ३७आणि 'हा यहुद्यांचा
राजा आहे' असे लिहिलेले त्याचे आरोपपत्रक त्यांनी
त्याच्या डोक्यावर लावले. ३८मग दोघा चोरांना
त्याच्याबरोबर वधस्तंभावर खिळण्यात आले - एकाला
उजवीकडे आणि एकाला डावीकडे. ३९आणि जे जवळून
जात होते ते आपली डोकी हलवून, त्याची निंदा करून

[४०]म्हणत, 'अरे मंदिर मोडणाऱ्या आणि तीन दिवसांत उभारणाऱ्या, स्वतःला वाचव; तू देवाचा पुत्र असलास तर वधस्तंभावरून खाली ये.'

[४१]त्याचप्रमाणे वरिष्ठ याजकही शास्त्र्यांबरोबर आणि वडिलांबरोबर त्याची चेष्टा करीत म्हणाले, [४२]'ह्यानं दुसऱ्यांना वाचवलं, हा स्वतःला वाचवू शकत नाही.' 'हा इस्राएलाचा राजा आहे; ह्यानं वधस्तंभावरून आता उतरावं, आणि आम्ही त्याच्यावर विश्वास ठेवू.' [४३]'तो देवावर भाव ठेवतो; त्याला तो पाहिजे असेल तर त्यानं त्याला आता सोडवावं. कारण तो म्हणत होता, मी देवाचा पुत्र आहे.' [४४]आणि ज्या चोरांना त्याच्याबरोबर वधस्तंभावर खिळलेले होते त्यांनीही त्याची तशीच निंदा केली.

[४५]आता सहाव्या तासापासून सर्व देशावर अंधार झाला; तो नवव्या तासापर्यंत होता. [४६]आणि, सुमारे नवव्या ताशी, येशू मोठ्या आवाजात ओरडून म्हणाला,

"एली, एली, लमा सबख्थनी?" (माझ्या देवा, माझ्या देवा, तू माझा त्याग का केलास?)

[४७]तेव्हा जे तेथे उभे होते त्यांच्यातल्या काहींनी हे ऐकून म्हटले,

"हा एलियाला बोलवीत आहे."

[४८]आणि त्यांच्यातला एक लगेच धावत गेला आणि त्याने एक बोळा घेऊन तो आंबेने भरला, आणि एका वेतावर लावून तो त्याला चोखायला दिला. [४९]तेव्हा दुसऱ्यांनी म्हटले,

"असू द्या, एलिया त्याला सोडवायला येतो काय ते आपण बघू."

[५०]आणि येशूने पुन्हा मोठ्या आवाजात ओरडून प्राण सोडला. [५१]आणि बघा, पवित्र स्थानातला पडदा वरपासून खालपर्यंत फाटून दुभागला; पृथ्वी कापली, खडक दुभंगले, [५२]आणि थडगी उघडली; पुष्कळ निजलेल्या पवित्र जनांची शरिरे उठली [५३]व त्याच्या पुनरुत्थानानंतर थडग्यांमधून येऊन, ते पवित्र नगरीत गेले आणि पुष्कळांना दिसले.

[५४]आता शतपतीने व त्याच्याबरोबर येशूवर पहारा करणाऱ्यांनी तो भूकंप व जे काही झाले ते बघितले तेव्हा ते फार भ्याले व म्हणाले, 'हा खरोखर देवाचा पुत्र होता.'

[५५]आणि पुष्कळ स्त्रिया दुरून पहात होत्या. त्या येशूची सेवा करीत गालिलातून त्याच्या मागोमाग आल्या होत्या. [५६]त्यांच्यात मग्दाली मरिया, याकोब व योसे ह्यांची आई मरिया आणि जब्दीच्या पुत्रांची आई ह्या होत्या.

[५७]**आणि संध्याकाळ झाली** तेव्हा योसेफ नावाचा, अरिमथाईचा, एक धनवान मनुष्य तेथे आला. तोही स्वतः येशूचा शिष्य होता. [५८]तो पिलाताकडे गेला आणि त्याने येशूचे शरीर मागितले. तेव्हा पिलाताने ते द्यायची आज्ञा केली. [५९]योसेफाने ते शरीर घेतले, ते स्वच्छ तागाच्या वस्त्रात गुंडाळले, [६०]आणि ते एका खडकात खोदलेल्या आपल्या नव्या थडग्यात ठेवले; आणि थडग्याच्या दारावर एक मोठी शिळा लोटली, आणि तो निघाला. [६१]तेथे मग्दाली मरिया व दुसरी मरिया ह्या त्या थडग्याच्या समोर बसल्या होत्या.

[६२]**आणि तयारीच्या दिवसापुढील** दुसरा दिवस सुरू झाल्यावर वरिष्ठ याजक व परोशी पिलाताकडे बरोबर गेले, [६३]आणि म्हणाले,

"महाराज, आम्हाला आठवण आहे की, तो फसव्या जिवंत होता तेव्हा त्यानं म्हटलं होतं, 'मी तीन दिवसांनी पुन्हा उठेन.' [६४]तर ते थडगं तिसऱ्या दिवसापर्यंत सुरक्षित करायची आज्ञा करा; नाहीतर, त्याचे शिष्य जाऊन त्याला चोरून नेतील आणि लोकांना सांगतील, 'तो मेलेल्यांतून उठला आहे'; आणि शेवटची फसवणूक पहिलीपेक्षा अधिक वाईट होईल."

[६५]तेव्हा पिलात त्यांना म्हणाला,

"तुमच्याबरोबर पहारा घ्या; जा, आणि तुम्हाला करवेल तेवढं ते सुरक्षित करा."

[६६]त्यांनी पहारा घेतला व ते गेले, त्यांनी शिळेवर शिक्का केला आणि थडगे सुरक्षित केले.

## २८

**मग शब्बाथ दिवसाची** संध्याकाळ होऊन आठवड्याचा पहिला दिवस दिसू लागताच मग्दाली मरिया व दुसरी मरिया ह्या थडगे पहायला आल्या. [२]आणि बघा, मोठा भूकंप झाला होता, कारण परमेश्वराचा दूत स्वर्गातून उतरून आला, त्याने दारावरची शिळा लोटली आणि तो तीवर बसला. [३]त्याचे रूप विजेसारखे व त्याचे वस्त्र बर्फासारखे शुभ्र होते. [४]आणि त्याच्या भयाने पहारेकरी कापले व मेल्यासारखे झाले. [५]पण देवदूताने त्या स्त्रियांना उत्तर देऊन म्हटले,

"भिऊ नका; कारण मी जाणतो की, ज्या येशूला
तुम्ही शोधता ६ तो इथं नाही, कारण त्यानं म्हटलं होतं तसा
तो उठला आहे. या, त्याला जिथं ठेवलेलं होतं ती जागा
बघा. ७ आणि आता लवकर जा आणि त्याच्या शिष्यांना
सांगा की, तो मेलेल्यांतून उठला आहे, आणि बघा, तो
तुमच्यापुढं गालिलात जात आहे; तिथं तुम्ही त्याला
पहाल. बघा, मी तुम्हाला सांगितलं आहे."
८ तेव्हा त्या भयाने व मोठ्या आनंदाने त्या थडग्याजवळून
घाईने निघाल्या व त्याच्या शिष्यांना सांगायला धावल्या.
९ आणि बघा, येशू त्यांना भेटला आणि म्हणाला,
"जयजय!"
तेव्हा त्या जवळ गेल्या, त्यांनी त्याचे पाय धरले व त्याला
नमन केले. १० तेव्हा येशू त्यांना म्हणाला,
"भिऊ नका, जा, माझ्या भावांना सांगा, 'त्यांनी
गालिलात जावं, ते तिथं मला पाहतील'."

११ आता, बघा, त्या जात असता पहाऱ्यातले
कित्येक जण नगरात आले आणि त्यांनी जे झाले होते ते
सगळे वरिष्ठ याजकांना सांगितले. १२ तेव्हा ते
वडिलांबरोबर एकत्र जमले आणि त्यांनी मसलत घेतली;
तेव्हा त्यांनी त्या शिपायांना पुष्कळ पैसे दिले १३ व म्हटले,
"तुम्ही म्हणा की, 'त्याचे शिष्य रात्री आले आणि
आम्ही निजलो असताना त्यांनी त्याला चोरून नेलं.'
१४ आणि ही गोष्ट सुभेदारांच्या कानी आली तर आम्ही
त्यांचं मन वळवू आणि तुम्हाला निश्चिंत करू."
१५ तेव्हा त्यांनी पैसे घेतले व त्यांना शिकवल्याप्रमाणे
केले. आणि ही गोष्ट यहुद्यात आजपर्यंत बोलण्यात येते.

१६ तेव्हा अकरा शिष्य गालिलात, येशूने त्यांना
सांगितले होते तेथे डोंगरावर गेले. १७ आणि त्यांनी त्याला
बघितले तेव्हा ते पाया पडले. पण काहींना संशय आला.
१८ तेव्हा येशू जवळ आला व त्यांच्याशी बोलून
त्यांना म्हणाला,
"स्वर्गात आणि पृथ्वीवर सर्व अधिकार मला दिला
आहे. १९ म्हणून तुम्ही जा, आणि सर्व राष्ट्रांना शिकवा;
आणि त्यांना पित्याच्या, पुत्राच्या आणि पवित्र
आत्म्याच्या नावानं बाप्तिस्मा द्या. २० आणि मी ज्या गोष्टी
तुम्हाला नेमून दिल्यात त्या सर्व त्यांना पाळायला
शिकवा; आणि पहा, मी तुमच्याबरोबर, सर्व दिवस,
युगाच्या समाप्तीपर्यंत आहे."